
# मनाची मुशाफरी





९५५६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2032

REFBK-0008871


म. ना. अदवंत

मराठी ग्रंथ संग्र

1834

८४८५९
१४३।८९
2032

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रमांक
अनुक्रम ८४८५९ वि: निबंध
क्रमांक 2032 नों दि १४।३।८९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१५७०

# मनाची मुशाफरी

REFBK-0008871

म. ना. अदवंत

८८७९

किंमत अडीच रुपये

चित्रशाला प्रकाशन : पुणें २

[ आवृत्ति पहिली. जून १९५६. किंमत अडीच रुपये ]

सर्व हक्क सौ. लीला अदवंत यांच्या स्वाधीन

लेखक : प्रा. म. ना. अदवंत, ३५४ नवी पेठ, जळगांव पू. खा.

मुखपृष्ठ : श्री. शि. द. फडणीस, पुणें.

मुद्रक व प्रकाशक : दा. त्र्यं. जोशी, बी. ए. ( टिळक ),
चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें २.

# मनोगत

'मनाची मुशाफरी' हा माझा दुसरा लघुनिबंधसंग्रह. 'मनाचे संकल्प' या माझ्या पहिल्या लघुनिबंधसंग्रहानंतर जवळजवळ सहा वर्षांनी हा संग्रह प्रसिद्ध होत आहे. माझ्या पहिल्या लघुनिबंधसंग्रहाचें मराठी रसिकांनी अतिशय प्रेमाने स्वागत केलें. इंदूरच्या साहित्यसभेने शंभर रुपयांचें पारितोषिक देऊन त्या संग्रहाचा गौरव केला. याबद्दल मी सर्वांचा अतिशय आभारी आहें.

यांतील 'विघ्नसंतोषी माणसें' व 'घड्याळाचे दास' हे दोन लघु-निबंध सोडले तर बाकीचे सर्व लघुनिबंध गेल्या सहा वर्षांत दिवाळी अंकाच्या निमित्ताने लिहिले गेले आहेत. 'घड्याळाचे दास' हा माझा अगदी पहिला लघुनिबंध. अनंत काणेकरांचा 'घड्याळाचे गुलाम' हा याच विषयावरील लघुनिबंध त्यानंतर माझ्या वाचनांत आला. या दोन लघुनिबंधांतील विचारसाम्य लक्षांत घेऊन आणि अनंत काणेकर यांचा लघुनिबंध या निबंधापेक्षा कितीतरी सरस आहे याची जाणीव असूनहि या लघुनिबंधाचा अन्तर्भाव पहिलेपणाच्या प्रेमाने या संग्रहांत केला आहे.

माझे स्नेही, दामुअण्णा रानडे यांनी हा संग्रह इतक्या आकर्षक स्वरूपांत प्रकाशित केला. त्याबद्दल त्यांचे आभार मानणें त्यांना रुचणार नाहीं. पण ज्या आत्मीयतेने त्यांनी हें प्रकाशनाचें कार्य अंगावर घेतलें त्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्यावांचून राहावत नाही; त्याचप्रमाणे श्री. भाऊसाहेब खांडेकर यांनी त्यांची प्रकृति बरी नसतांना व त्यांच्या-मागे अनेक व्यवधानें असूनहि या संग्रहाला चिकित्सक प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचे मानावे तितके आभार कमीच पडतील.

मुखपृष्ठावरील चित्र श्री. शि. द. फडणीस यांनी काढलें आहे. त्याबद्दल त्यांचेंहि मनःपूर्वक आभार मानणें आवश्यक आहे.

'मनाचे संकल्प' या माझ्या पहिल्या लघुनिबंधसंग्रहाप्रमाणे याहि संग्रहाचे वाचक प्रेमाने स्वागत करतील अशी आशा आहे.

२६–४–५६ म. ना. अदवंत

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| ● दोन शब्द– .... | ... | | वि. स. खांडेकर |
| (१) मनाची मुशाफरी | ... | ... | १ |
| (२) खोटीं नाणीं | ... | ... | ८ |
| (३) मुखवटे ... | ... | ... | १७ |
| (४) महिना अखेर | ... | ... | २८ |
| (५) विघ्नसंतोषी माणसें | ... | ... | ३४ |
| (६) अज्ञाताची ओढ | ... | ... | ४८ |
| (७) प्रामाणिक मतें | ... | ... | ५६ |
| (८) घड्याळाचे दास. | ... | ... | ६२ |
| (९) 'सुख पर्वताएवढें' | ... | ... | ६७ |
| (१०) निसर्ग आणि आम्ही | ... | ... | ७५ |
| (११) अहंकाराची प्रेरणा | ... | ... | ८३ |
| (१२) माझा छंद दिवाणा | ... | ... | ९५ |
| (१३) स्वतःची ओळख | ... | ... | १०७ |
| (१४) स्वप्नाची दुनिया | ... | ... | १२२ |

कैलासवासी

ती. सौ. दुर्गाताई

यांच्या स्मृतीस

## म. ना. अदवंत

(१) संजीवनी (लघुकथा)
(२) माणुसकीचा धर्म (लघुकथा)
(३) नसते उपद्‌व्याप (लघुकथा)
(४) मनाचे संकल्प (लघुनिबंध)
(५) मनाची मुशाफरी (लघुनिबंध)
(६) पैंजण (संपादित)

* * *

## दोन शब्द

दिवाळी अंकांचा आढावा घेण्याच्या अथवा अशाच दुसऱ्या कुठल्याहि निमित्ताने 'लघुनिबंध' या वाङ्मयप्रकाराची आपल्याकडे अधून मधून जी ओझरती चर्चा होते, तिचा सूर बहुधा एकच असतो—चांगला लघुनिबंध फार दुर्मिळ झाला आहे! किंबहुना लघुनिबंध हा वाङ्मयप्रकार मराठींत इतका निर्जीव झाला आहे की, त्याच्या नांवामागे, दुःखाने कां होईना, कै. हें अक्षर लिहायला कांही हरकत असूं नये.

सध्याच्या लघुनिबंधाची घाईघाईने कुंडली मांडून हें अशुभ भविष्य वर्तविणाऱ्या वाङ्मयांतील ज्योतिष्यांचें मला हंसूं येतें. साहित्य हें जीवनाचेंच कलात्मक रूप आहे ना? मग जीवनांतल्या इतर क्षेत्रांत जी भरती-ओहोटी आपण नित्य अनुभवतों, तिला साहित्य तरी अपवाद कसें ठरणार? विशिष्ट कालखंडांत एखादा वाङ्मयप्रकार उदय पावतो, दुसऱ्या कालखंडांत त्याचा उत्कर्ष होतो, तिसऱ्या कालखंडांत तो कोमेजल्यासारखा दिसतो. यांत अस्वाभाविक असें काय आहे? कुठलाहि वाङ्मयप्रकार सदैव विकसित होत जाणें अथवा प्रफुल्लित राहणें असंभवनीय आहे. एखाद्या वाङ्मयप्रकाराच्या उत्कर्षाच्या किंवा अपकर्षाच्या मुळाशीं वैयक्तिक प्रतिभेपासून सामाजिक परिस्थितीपर्यंत अनेक कारणें असूं शकतात. तीं सर्व लक्षांत घेऊनच विशिष्ट काळांत एखाद्या वाङ्मयप्रकाराला आलेल्या अवकळेची किंवा लाभलेल्या वैभवाची मीमांसा केली पाहिजे. नाहीतर हिवाळ्यांत द्राक्षांच्या वेलांचे नुसते खुंट दिसत असलेले पाहून त्यांचा सर्पणासाठी उपयोग करूं पाहणाऱ्या विद्वानांच्या पंक्तींतच आपली गणना होईल.

१९२५–१९३५ या दशकांत फडके, बर्वे, काणेकर, दांडेकर प्रभृति लघुनिबंधकारांचा उदय झाला. केवळ नवलाईमुळेच नव्हे, तर विविध गुणांमुळे या नव्या वाङ्मयप्रकाराचें रसिक कौतुक करूं लागले.

१९३५-४५ या दशकांत अनेक लहान मोठ्या निबंधकारांनी (संत, दोडके, कुसुमावती देशपांडे, सरदेसाई, भावे, बोरकर वगैरे) आपापल्या वैशिष्ट्यांनी तो सजविला. त्यामुळे तो अधिकच भरदार वाटूं लागला व लोकप्रिय झाला. १९४५-१९५५ या दशकांत त्याच्या वैभवाला उतरती कळा लागली. फडके-काणेकरांचें लक्ष या वाङ्मयप्रकारांत पूर्ववत राहिलें नाही. असें होणें साहजिकच होतें. 'आता मला जिंकायला जग उरलें नाही.' असें म्हणून शिकंदर रडला अशी एक कथा आहे ना? चांगल्या लेखकालाहि हा अनुभव येतो. त्या त्या वाङ्मयप्रकारांत त्याच्या प्रतिभेला जो कांही श्रेष्ठ प्रतीचा विलास दाखविणें शक्य असतें तो दाखविल्यावर तो पूर्ववत् त्या क्षेत्रांत रमूं शकत नाही. मध्यान्हापर्यंतच सूर्याच्या प्रकाशाची प्रखरता वाढूं शकते, याची जाणीव त्याला पुरेपूर असते! फडके-काणेकरांचें गेल्या दशकांत लघुनिबंधाकडे दुर्लक्ष होण्याचें कारण बहुधा हेंच असावें!

लघुनिबंधाच्या या दोन प्रमुख प्रवर्तकांच्या निवृत्तींत अस्वाभाविक असें कांहीच नाही. खरा प्रश्न हा आहे की, गेल्या दशकांत (१९४५-५५) इतर जुने लघुनिबंधकार-वा. भा. पाठक, सरदेसाई, डॉ. भावे वगैरे- आस्थेने कां लिहीत राहिले नाहीत आणि नवे निबंधकार मोठ्या प्रमाणांत क्षितिजावर कां चमकूं लागले नाहीत? माझ्या मतें या स्थित्यंतराचीं अनेक कारणें आहेत. एक तर लघुनिबंध हा वाङ्मयप्रकार अनेक दृष्टींनी मध्यमवर्गाच्या सुस्थिर जीवनाशीं व त्याच्यावर अवलंबून असलेल्या समतोल मनोवृत्तीशीं संबद्ध आहे. ती स्थिरता १९२५-१९४५ या काळांतल्या लेखकांना लाभली होती. पुढे दुसरें महायुद्ध, त्याने निर्माण केलेल्या अन्नटंचाईसारख्या अवघड समस्या, आर्थिक कुचंबणा, देशाची फाळणी, तीव्रतेने जाणवूं लागलेली वैयक्तिक जीवनांतली विफलता, नव्या सामाजिक स्वप्नांचा अभाव, इत्यादिकांमुळे मध्यमवर्ग गेल्या दशकांत मानसिक दृष्ट्या छिन्नभिन्न आणि म्हणूनच अतिशय अस्थिर

झाला. हळूहळू तो व्याकुळ, विव्हळ आणि अश्रद्ध होत गेला. व्याकुळता, विव्हळता आणि अश्रद्धा हे भावच असे आहेत की, कथेच्या द्वारेंच ते अधिक चांगल्या रीतीने प्रगट करतां येतात. गेल्या दशकांतली कथा, तिच्या विषयांचें क्षेत्र आणि तिचें विश्लेषणात्मक तंत्र पाहिलें, म्हणजे या काळांत लघुनिबंधाची वाढ कां खुंटली हें सहज लक्षांत येईल.

इंग्रजी साहित्यांत लघुनिबंधाची वाढ पिढ्यान् पिढ्या होत आली आहे. एखाद्या वटवृक्षाप्रमाणे त्याचीं पाळेंमुळें इंग्रजाच्या मनोवृत्तींत दूरवर गेलीं आहेत. ती मनोवृत्तिहि मूलतः महाराष्ट्रीय मनोवृत्तीपेक्षा भिन्न आहे. काळ्याकुट्ट मेघाची शुभ्र कडा पाहण्याचें बाळकडू तिला मिळालें आहे. केवळ तीव्रता हा तिचा स्वभावधर्म नाही. त्या तीव्रतेला सदैव विवेकाचें कवच असतें. या विशिष्ट मनोवृत्तीमुळेच दोन महायुद्धांच्या वणव्यांत होरपळून निघालेल्या इंग्रजाच्या मनांत लघुनिबंध फुलत राहिला.

पण मराठी लघुनिबंधाला वाङ्मयीन पूर्वपरंपरा नव्हती. कुंडींतल्या फुलझाडासारखी त्याची स्थिति होती. शिवाय खऱ्याखुऱ्या लोकशाहीने जी मनोवृत्ति निर्माण होते व जी लघुनिबंधासारख्या वाङ्मयप्रकाराच्या विकासाला निःसंशय पोषक असते, ती अजून आपल्याकडे यावयाची आहे. या व अशाच अनेक कारणांमुळे आपला लघुनिबंध गेल्या दशकांत थोडाफार निस्तेज झाला, कोमेजल्यासारखा दिसूं लागला.

पण एवढयावरून मराठी लघुनिबंधाच्या नाकाशीं सूत धरलें आहे असा घाईघाईने निष्कर्ष काढणें चुकीचें होईल. आज त्याचा कृष्णपक्ष सुरू आहे. त्यामुळे त्यांत चंद्राचें दर्शन होत नाही. पण आकाशांत चंद्र नसला तरी चांदण्या चमकत असतातच ! शांताराम, अदवंत, विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर, य. द. भावे, वसंत बापट, भगवंत देशमुख प्रभृतींचे गेल्या कांही वर्षांतले लघुनिबंध ज्यांनी वाचले असतील, त्यांना माझें हें विधान म्हणजे केवळ औपचारिक आशावाद आहे असें मुळीच वाटणार नाही.

× × ×

अदवंतांचा पहिला लघुनिबंध-संग्रह १९५० सालीं प्रसिद्ध झाला. सहा वर्षांनी हा दुसरा संग्रह ते रसिकांना सादर करीत आहेत. त्यांच्या नांवाच्या आद्याक्षरांत 'म. ना.' असल्यामुळे पहिल्या संग्रहाला 'मनाचे संकल्प' असें नांव त्यांनी दिलें होतें. हा नवा संग्रह 'मनाची मुशाफिरी' या नांवाने प्रगट होत आहे. तो वाचून मराठी रसिक म्हणतील—

'म. ना. सज्जना, याचि पंथेचि जावें
तरी शारदा पाविजे ती स्वभावें'

याचें कारण उघड आहे. चतुर लेखक अनेक वाङ्मयप्रकार हौसेने हाताळीत असला तरी त्याच्या मनोवृत्तीला व प्रतिभागुणांना अनुकूल असा एक खास वाङ्मयाचा प्रांत असतोच असतो! यशवंतांनी किंवा बोरकरांनी लघुनिबंध लिहिले, किंबहुना बोरकरांनी 'भावीण' सारखी वरच्या दर्जाची कादंबरी निर्माण केली, तरी या दोघांची प्रतिभा कवीची आहे. हरिभाऊ आपट्यांची प्रतिभा कादंबरीकाराची होती. त्यांनी नाटकें लिहिलीं आणि त्यांतलें 'संत सखुबाई' फार लोकप्रिय झालें, तरी त्या क्षेत्रांत देवलांशी त्यांची तुलना कुणीच करणार नाही. अनेक झाडांना फुलाबरोबर फळें येतात. पण कित्येकांचें वैभव त्यांच्या सुगंधी फुलांत असतें, तर कित्येकांचें रसाळ फळांत असतें. तसेंच थोडेंसें हें आहे. या दृष्टीनेच लघुनिबंध हा वाङ्मयप्रकार अदवंतांच्या आत्माविष्काराला अत्यंत अनुकूल आहे असें मला वाटतें.

इतर ललित लेखकांप्रमाणे लघुनिबंधकार हाहि जीवनाचा टीकाकार आणि भाष्यकार असतो. पण जीवनाकडे पाहण्याची त्याची दृष्टि कवीची, तत्त्वज्ञाची, कादंबरीकाराची किंवा इतिहासकाराची नसते. मात्र त्याच्या प्रतिभेला या सर्वांच्या गुणांचा सोनेरी स्पर्श व्हावा लागतो. गार पाण्यांत टाकलेल्या वाळ्याचा पाण्याला वास यावा ना? तसा तो स्पर्श रसिकांना सहज जाणवतो. तथापि या सर्वांपेक्षा त्याचें कार्य निराळें असतें. जीवनांतल्या सर्व लहान मोठ्या आणि कडूगोड गोष्टी तो पाहतो,

त्या मनांत सांठवितो, त्यांतल्या वैशिष्ट्यपूर्ण अनुभवांचें चिंतन करतो, आणि त्यांचें सौंदर्य व अर्थपूर्णता यांच्यावरून त्याची कल्पना एखाद्या फुलपाखराप्रमाणे भिरभिरत राहते. हें घडत असतांना क्वाचित् तो कवि होतो, क्वचित् तत्वज्ञ होतो, क्वचित् कादंबरीकार किंवा इतिहासकार बनतो. पण यांपैकी कुठल्याहि भूमिकेवरून तो जीवनाचें निरीक्षण, समीक्षण किंवा परीक्षण करीत नाही. वस्तुमात्रांत भरलेलें सुप्त सौंदर्य किंवा त्यांतील स्वाभाविक गोडवा यांचें त्याला अधिक महत्व वाटतें. त्यांच्यावर निर्मळ पण सौम्य प्रकाश टाकण्यांत त्याला आनंद होतो. प्रत्येकाला जीवनावर थोडेंसें अधिक प्रेम करायला लावणें आणि जगांतली विविधता व सुखकारक किंवा दुःखकारक नाट्यपूर्णता यांचा आस्वाद घेण्याची पात्रता मनुष्यमात्राच्या ठिकाणीं वाढविण्याचा प्रयत्न करणें हें तो आपलें ध्येय मानतो.

प्रस्तुत लघुनिबंध-संग्रहांतल्या चवदा निबंधांपैकी कोणताहि निबंध पाहावा. विषयाच्या निवडीपासून अंतिम तत्वचिंतनापर्यंत अदवंतांची हीच मनोवृत्ति आढळून येईल. उदाहरणार्थ 'खोटीं नाणीं' हा लघुनिबंध घ्या. त्यांत लेखकाचें सौम्यशीतल व्यक्तित्व किती सहजासहजी प्रगट झालें आहे. मोड देतांना लोक त्याला फसवितात. मधूनच एखादी खोटी अधेली त्या मोडींत दडपून देतात. जगांतले अनेक लोक लुच्चे असतात, त्यामुळे मोड न बघतां घेतली तर आपण फसविले जाण्याचा संभव आहे, हें लेखकाला कळत नाही असें नाही. तो व्यवहारज्ञ आहे. पण व्यवहारापेक्षा संस्कृतीची मातबरी त्याला अधिक वाटते. तो खराखुरा सभ्य गृहस्थ आहे. दुसऱ्याने दिलेली मोड मोजून अगर पाहून घेणें म्हणजे एकाप्रकारें त्या माणसावर अविश्वास दाखविण्यासारखें आहे असें त्याला वाटतें. अपरिचित रद्दीवाल्यापासून ओळखीच्या गृहस्थापर्यंत आणि रत्नागिरीपासून पुण्यापर्यंत खोट्या नाण्यांचे प्रसाद त्याला मिळतात. असें असूनहि तो म्हणतो, 'तीनतीनदा पैसे मोजून बघणें, शेजारच्या दगडावर रुपया सतरा वेळां वाजवून बघणें,

म्हणजे ज्या व्यक्तीकडून तुम्ही पैसे घेतां त्या व्यक्तीविषयीं अविश्वास प्रगट करण्यासारखे आहे असें माझें आपलें मत आहे. माझ्याकडून पैसे घेतांना ज्या वेळीं एखादी व्यक्ति तीनतीनदा ते मोजून घेते व एखादें नाणें उलटसुलट करून त्याच्या खरेपणाविषयी खात्री करून घेऊ लागते, त्या वेळीं मला त्या व्यक्तीचा खरोखरच राग येतो. मग ज्या गोष्टीचा आपणाला राग येतो तीच गोष्ट आपण दुसऱ्यांच्या बाबतींत करणें कितपत योग्य ठरेल? ' 'Do unto others, as you wish to be done by ' हा उपदेश ऐकतांना आपण कांहीतरी फार गंभीर असें ऐकत असल्याचा भास होतो. पण तेंच तत्वज्ञान लेखकाने इथे किती सहजतेने सांगितलें आहे !

चांगल्या लघुनिबंधकाराचा पहिला प्रमुख गुण अशा प्रकारचें व्यवहारी पण सुसंस्कृत, चिंतनशील पण खेळकर, भोवतालच्या जीवनांतल्या विसंगती जाणणारें पण त्यांच्या दर्शनाने चिडून न जातां कधी विनोदी तर कधी तात्त्विक दृष्टीने त्यांचा स्वीकार करणारें, साध्या गोष्टींतला विशेष आशय सहज पाहूं शकणारें, जीवनाचें स्वरूप गद्यप्राय असलें तरी त्यांत अधुनमधून सुंदर काव्य असतेंच असतें अशी श्रद्धा बाळगणारें आणि कोणत्याहि बाबतींत आत्यंतिक टोकाला न जातां सुवर्णमध्याला चिकटून राहणारें लेखकाचें व्यक्तित्व हा होय. अशा व्यक्तित्वामुळेच लघुनिबंधकाराला दैनंदिन अनुभवांतून नवेनवे विषय सुचतात, ते मजेदार रीतीने फुलवितां येतात. स्वप्नांचीच गोष्ट घ्या. तीं आपणां सर्वांनाच पडतात. पण ' स्वप्नांच्या चंदेरी सृष्टींत विहार करीत करीत अननुभूत जीवनाचा अनुभव घ्यावयाचा, वर्तमान, भूत व भविष्यकाळांत फेरफटका करावयाचा, आपल्या प्रिय व्यक्तींची स्थलकालाच्या सीमा ओलांडूनहि भेट घ्यावयाची आणि आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टीपेक्षाहि अद्भुत घटनांचा आस्वाद घ्यावयाचा यांत जें काव्य आहे, तें अदवंतासारखे लघुनिबंधकारच जाणूं शकतात. ' स्वप्नांची दुनिया ' या लघुनिबंधांत त्यांनी ज्ञानेश्वरांच्या

समाधीचा जो प्रसंग रंगविला आहे तो पाहावा. तो जितका हृद्य तितकाच उदात्त आहे.

गंभीर निबंधांतल्या विषयाला स्वयंसिद्ध असें महत्त्व असतें. त्या विषयासंबंधी वाचकाचे कांही विचार किंवा पूर्वग्रह असू शकतात. त्यांचें खंडनमंडन करणें हा निबंधकाराचा एक प्रमुख हेतु असतो. वाचकाला नवें ज्ञान देणें, त्याच्या जुन्या ज्ञानाची काजळी झाडून टाकणें, त्याला विचारप्रवृत्त करणें, या किंवा अशाच प्रकारच्या प्रेरणा गंभीर निबंध-लेखनाच्या मुळाशीं असतात. 'संपत्तीचे उपयोग,' 'लोकभ्रम' व 'डॉ. जॉन्सन' हे चिपळूणकरांचे तीन निरनिराळ्या प्रकारचे निबंध आतां पाऊणशे वर्षांनी त्यांतील वाङ्मयीन गुणांमुळे वाचनीय वाटतात. केवळ विषयांच्या दृष्टीने ते कुणीच उत्सुकतेने वाचणार नाही. कारण संपत्तीची वांटणी व तिचा उपभोग हा प्रश्न आजहि अगदी जागतिक महत्त्वाचा असला, तरी आपल्या देशांत समाजवादी सहकारी समाजाचा घोष सुरू होण्यापर्यंत परिवर्तन झालें असल्यामुळे त्या विषयाचें स्वरूप पार बदललें आहे. आजचे लोकभ्रम चिपळूणकरांच्या काळापेक्षा कितीतरी निराळे आहेत. आणि डॉ. जॉन्सन हा इंग्रजींतील केवढाहि श्रेष्ठ पंडित असला तरी प्रीस्टले, हेमिंग्वे किंवा इऱ्हेनबुर्ग यांच्याविषयीच्या चर्चेत हिरिरीने भाग घेणाऱ्या आजच्या पिढीला त्याच्याविषयी फारसें कुतूहल वाटत नाही हें उघड आहे.

या बाबतींत लघुनिबंधकार निबंधकाराहून अधिक भाग्यवान असतो. कारण त्याचे विषय सहसा शिळे होत नाहीत. ते मानवी मनाच्या सनातन भागाशीं संबद्ध असतात. किंबहुना निबंधांत ज्या अर्थाने आपण विषय पाहतों त्या अर्थाने लघुनिबंधांत विषयच नसतो! निबंध हा वृक्ष आहे; लघुनिबंध ही वेल आहे. भव्यपणा हा वृक्षाच्या सौंदर्याचा आत्मा तर नाजुकपणा हा वेलीच्या सौंदर्याचा विशेष. वृक्षाचें महत्त्व त्याच्या फळांवरून ठरतें. वेलीला महत्त्व येते तें तिच्या फुलांमुळे; किंबहुना त्या फुलांच्या सुगंधामुळे!

लघुनिबंध हा अनेकदा कथेशीं थोडाफार जवळचा वाटतो तो त्याच्या या लालित्यप्रधान स्वरूपामुळे, स्वैर आत्माविष्काराला त्यांत भरपूर अवसर असल्यामुळे. टांचणीपासून चांदणीपर्यंत किंवा मुंगीपासून लुंगीपर्यंत लघुनिबंधाला कुठलाहि विषय चालतो असें जें म्हटलें जातें तें याचमुळे. अदवंतांनी सुद्धा हरघडी प्रत्येकाला येणाऱ्या अनुभवांतून आपले विषय कसे कुशलतेने टिपून घेतले आहेत तें पाहण्याजोगें आहे. व्यवहारांत खोटीं नाणीं ज्याच्या पाकिटांत प्रवेश करीत नाहीत असा कोण भाग्यवान् मनुष्य या जगांत आहे? महिन्याची तिसावी तारीख उजाडली म्हणजे प्रत्येक महिना एकोणतीस दिवसांचाच असता तर फार बरें झालें असतें असा विचार कुणाच्या मनांत येत नाही? दारांत टांग्यांतून पाहुण्यांचें लटांबर उतरत असलेलें पाहून कपाळाला पडलेल्या आठ्या आपल्या कृत्रिम हास्यांत लोपवून टाकून 'या, या' असे उद्गार कोण काढीत नाही? निरनिराळ्या वर्तमानपत्रांत येणाऱ्या भविष्यांतलीं परस्परविरुद्ध विधानें वाचून पोटभर हंसतां हंसतां या आठवड्यांतले आपल्या राशीचें अनुकूल भविष्य खरें होईल अशी आशा कोण बाळगत नाही? 'खोटीं नाणीं,' 'महिना अखेर,' 'मुखवटे,' 'अज्ञाताची ओढ' इत्यादि अदवंतांचे सरस लघुनिबंध तुमच्या-आमच्यासारख्या प्रत्येक सामान्य माणसांच्या अशा साध्यासुध्या अनुभवांवरच उभारले आहेत. अशा अनुभवांत लघुनिबंधांचीं बीजें सहज दिसायला आणि तीं फुलवायला लेखकापाशी जशी चमत्कृतिप्रिय कल्पकता हवी तशी हरतऱ्हेच्या विसंगतीचें हंसतमुखाने स्वागत करणारी विनोददृष्टिहि त्याला हवी. हे दोन्ही गुण अदवंतांच्या लेखनांत आहेत. 'मनाची मुशाफरी' या पहिल्याच लघुनिबंधांत ते म्हणतात,–'(फलाटावर उभें राहून) आगगाडीच्या धुराबरोबर कल्पनाशक्ति स्वैर सोडण्यांत व आग्र्याच्या ताजमहालांत किंवा काश्मीरच्या नंदनवनांत सहल करण्यांत मला आनंद वाटतो.' 'महिना-अखेर,' 'अज्ञाताची ओढ,' 'स्वप्नांची दुनिया' वगैरे त्यांचे लघुनिबंध

रोचक झाले आहेत ते त्यांच्या या विशेषामुळेच. ‘ खोटीं नाणीं, ’ ‘ मुखवटे, ’ ‘ महिनाअखेर, ’ ‘ अज्ञाताची ओढ ’ इत्यादि निबंधांतील त्यांच्या संयमित आणि मार्मिक विनोदाचे तुषार मोठे सुखावह वाटतात.

लघुनिबंधकार अदवंत हे व्यक्तिजीवन व समाजजीवन यांचे सहानुभूतिपूर्ण टीकाकार आणि चिंतनशील भाष्यकार आहेत. ‘अहंकाराची प्रेरणा ’, ‘ सुख पर्वताएवढें ’, ‘ विघ्नसंतोषी माणसें ’, ‘ प्रामाणिक मतें ’ इत्यादि निबंधांत त्यांचा हा पैलु स्पष्ट झाला आहे.

या लघुनिबंधांतून व्यक्त झालेलें आत्मनिवेदन आणि जीवनचिंतन लेखकाच्या संपन्न व्यक्तित्वाची आपल्याला जाणीव करून देतें. ‘आम्ही चांदण्या रात्रीं विजेच्या दिव्याच्या कृत्रिम प्रकाशांत रमी खेळण्यांत रमून गेलेले असतों ! ’ ‘आपणां सर्वांचें व्यक्तिमत्व अहंकाराच्या उभ्या व आडव्या धाग्यांनी विणलेलें असतें ’, ‘ जुन्या संस्कृतींतील माणसाला घरांत देवघर नसल्यावर जितकें ओकें वाटत असेल तितकें मला घरांत पुस्तकांचें कपाट किंवा शेल्फ नसलें तर वाटतें ’, ‘ परिपूर्णतेने कुणीच मनुष्य कुणाला जाणूं शकत नाही ’, ‘ दुर्दैवी व्यक्तीचा स्वप्न हाच विरंगुळा आहे ! ’, ‘ पर्वताच्या शिखरावर चढलें म्हणजे ज्याप्रमाणे जगाचा फार मोठा विस्तार आपणाला दिसतो, त्याचप्रमाणे दुःखाच्या पर्वतशिखरावर चढलें म्हणजे आपल्या मनाचीं क्षितिजें विशाल होतात’ –हिरवळींत अधुनमधून फुललेल्या फुलांप्रमाणे अशीं अनेक वाक्यें आपणांला या लघुनिबंधांत आढळतात आणि आनंदित व अंतर्मुख करतात.

वळणें घेत घेत घाटांतून एखादी मोटार जशी उतरते आणि अशा प्रत्येक वळणावर जसें निराळेंच सुंदर दृश्य दिसतें, तशीं अदवंतांच्या अनेक लघुनिबंधांची रचना आहे. ‘ अज्ञाताची ओढ ’ या लघुनिबंधाच्या प्रारंभीं ते जयंताची ओळख करून देतात तेव्हा त्याच्या भविष्याच्या वेडाची थट्टा करतात. पण बुद्धिवादी दृष्टीने भविष्यावरील श्रद्धेवर जेवढे आक्षेप घेतां येण्याजोगे आहेत तेवढे सर्व घेतल्यानंतर, माणसाला आपलें

भविष्य जाणून घेण्याची होणारी इच्छा किती स्वाभाविक आहे आणि माणसाच्या जीवनाला आधारभूत असणाऱ्या रम्य स्वप्नांचा पुरवठा भविष्य-कथन कसें करूं शकतें, हें ते जेव्हा मोठ्या सहानुभूतीनें सांगतात तेव्हा ती कलाटणी मोठी मजेदार वाटते.

कल्पनेला कलाटणी देण्याच्या या शक्तीमुळे अदवंतांना दुसरी एक मोठी देणगी मिळाली आहे. ती म्हणजे आशावादी मनोवृत्तीची. वास्तवाकडे पाठ फिरवून या वृत्तीची जोपासना त्यांनी केलेली नाही. पण ते एक गोष्ट पुरेपूर जाणून आहेत. ती म्हणजे जग नानाप्रकारच्या काट्यांनी भरलें असलें, तरी त्यांत वायुलहरींवरून वाहत येणारा सुगंधाहि आहे. अमावास्येच्या अंधारांतहि आकाशांत चांदण्या चमकत असतातच !

अदवंतांचे निबंध अशा अनेक विशेषांनी नटलेले असल्यामुळे फडक्यांनी चांगल्या लघुनिबंधकाराचें केलेलें वर्णन त्यांनाहि लागू पडतें. फडके म्हणतात, 'उत्कृष्ट निबंधकार आपल्याला भेटला की ज्याचे अनुभव बहुतांशीं आपल्यासारखेच आहेत, परंतु जो त्यांचें वर्णन आपल्याला साधत नाही इतक्या मनोज्ञ रीतीने करतो, अशा एका सोबत्याची संगति आपल्याला मिळाल्यासारखी वाटते; आणि मग जीवनमार्गावरची सहल करण्यास आपल्याला नवा हुरूप येतो.'

येत्या दशकांत मराठी लघुनिबंधाला नवें वळण लागेल हें उघड आहे. या संधिकाळांत ज्यांचें कर्तृत्व या वाङ्मयप्रकाराच्या विकासाला उपयोगी पडूं शकेल अशा हाताच्या बोटांवर मोजतां येण्याजोग्या लेखकांपैकी अदवंत एक आहेत. म्हणून 'शुभास्ते पन्थानः सन्तु' असा वडीलकीच्या नात्याने मी त्यांना आशीर्वाद देतों व त्यांच्या कलेला दीर्घकाळ अधिक चांगला बहर येत राहो असें मनःपूर्वक इच्छितों.

कोल्हापूर,
१०-४-'५६ } वि. स. खांडेकर

८८७१

# १ : मनाची मुशाफरी

कंटाळा आला की, संध्याकाळीं स्टेशनवर जाऊन आगगाडीची मजा पाहत बसणें हा माझा अतिशय आवडता व्यवसाय आहे. माझ्या या आवडीची माझे मित्र खूप चेष्टा करतात. " पंडितरावांचें बालपण तिशी उलटून गेली तरी अद्याप संपलं नाही. " असा माझा ते उपहासहि करतात. माझी पत्नी माझ्या या विचित्र षोकाबद्दल अनेकदा नापसंती व्यक्त करते; पण तरीहि संध्याकाळ झाली कीं, नकळतच माझीं पावलें नेहमी स्टेशनकडे वळतात.

तेथे एका कोपऱ्यांत माझी बसण्याची आवडती जागा आहे. जागा कांहीशी बाजूला असल्यामुळे गाडीच्या गर्दीची फारशी झळ न लागतां त्या गर्दीची गंमत मनसोक्त पाहतां येते. मुंबईकडे जाणारी गाडी आली की, बहुधा त्याचें एंजिन त्या जागेसमोर येतें. त्यामुळे पाणी घेण्यापासून जाण्याची शिट्टी होईपर्यंतच्या एंजिनच्या सर्व क्रियाहि मला स्वस्थपणें अवलोकन करतां येतात. उतारूंची चढण्याउतरण्याची धांदल, गार्डाची, हमालांची होत असलेली धांवपळ, फायरमन व एंजिनड्रायव्हर यांच्या हालचाली इत्यादि अनेक गोष्टी पाहण्यांत मी इतका रमून जातों की, त्यामुळे अनेकदा वेळेचें भानहि मला राहत नाही. गाडीची शिट्टी झाली व गाडी धुराचे भपकारे सोडीत माझ्यासमोरून निघून गेली की, एखाद्या स्वप्नांतून जागा झालेल्या माणसाप्रमाणे मी उठतों व हळू हळू प्रवाशांच्या गर्दीत मिसळून मी घराकडे चालूं लागतों.

आगगाडीविषयी मला वाटणाऱ्या या आकर्षणाबद्दल अनेकांना आश्चर्य वाटतें. ' काय हो, एवढं काय तुम्हाला आगगाडीविषयी आकर्षण

वाटतं ?' असा प्रश्नहि ते मला पुष्कळदा विचारतात. त्या प्रश्नाच्या मागे असलेला उपहासाचा सूराहि मला पुष्कळ वेळां समजतो; पण त्या प्रश्नाचें मी त्यांना उत्तर देत नाही. आणि जरी मीं उत्तर दिलें तरी तें त्यांना पटणार नाही अशी माझी खात्री असल्याने मी तसा प्रयत्नहि करीत नाहीं.

पण माझा मीच ज्या वेळीं मला वाटणाऱ्या या आकर्षणाबद्दल विचार करतों, त्या वेळीं माझ्या मनांत वास करीत असलेल्या अद्‌भुताच्या आवडींत या आकर्षणाचें मूळ आहे असें मला अनेकदा वाटतें. आपल्या रोजच्या जीवनाची चाकोरी एकदा ठरली म्हणजे 'त्याच त्याच' पणाच्या दैनंदिन रुक्षतेंतून आपलें मन थोडें तरी बाहेर निघावें—चाकोरीबाहेर स्वैर पक्ष्याच्या स्वच्छंदाने विहार करावा—न पाहिलेल्या सृष्टिसौंदर्याचें निरीक्षण करून डोळ्याची तृष्णा थोडी तरी शमवावी—न ऐकलेले मधुर बोल ऐकून कानाची कांही अंशीं तृप्ती करावी अशी मनांत दुर्दम्य इच्छा होऊं लागते. आणि मग मन कसें कोंदल्यासारखें होतें. जिवाची तडफड होऊं लागते.

कोठुनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला
काय बोचतें हें समजेना
हृदयाच्या अन्तर्हृदयाला,

अशी बालकवीने वर्णन केल्यासारखी मनाची स्थिति होते. माझे आवडते कवि किंवा लेखकहि माझ्या मनाला अशा वेळीं रिझवूं शकत नाहीत—माझ्या प्रिय पत्नीचा नेहमी सुखद वाटणारा सहवासहि मला अशा वेळीं भुलवूं शकत नाही—आणि हा मनाचा कोंडमारा असह्य झाला म्हणजे मी उठतों व स्टेशनवर माझ्या आवडत्या जागेवर जाऊन बसतों.

एखाद्या निसर्गरमणीय अशा स्थलाकडे जाण्याऐवजी स्टेशनच्या बजबजपुरींत येऊन बसण्याची माझी आवड विचित्र तर खरीच, पण

त्या घाईगर्दीत, त्या बजबजपुरींत माझें ‘हरपलें श्रेय’ सांपडल्याचा भास होतो मला. कल्पनाशक्तीला चालना मिळून माझं मन त्या कोंदटलेल्या शहरांतून बाहेर पडून स्वैर भराऱ्या मारूं लागतं. आगगाडीच्या सरळ दिसणाऱ्या रुळाबरोबर तें पुढे पुढे अज्ञात प्रदेशांत जातं. तेथील विविध सृष्टिसौंदर्याचे नमुने कल्पनेनं पाहूं लागतं. तेथील अज्ञात व्यक्तींशी संभाषणहि करूं लागतं. अनेक वेळां फलाटावर गाडीची वाट पाहत बसलेल्या प्रवाशांकडे माझं लक्ष जातं. त्यांच्या चेहऱ्यावरील विविध भाव नजरेला पडतात, त्यांच्या आपापसांतील संभाषणाचे तुकडेहि मधून मधून कानावर येतात आणि त्यावरच माझं मन कल्पनेचे इमले उभारूं लागतं. कधी कधी त्या फलाटावरील उतारूंबरोबर ते नंदुरबारला त्यांच्या राहत्या वाड्यांत जातं व त्यांच्या घरांत चाललेल्या त्यांच्या मुलाच्या लग्नाच्या उत्सवांत व आनंदांत तें सामील होतं. तर कधी कधी मुंबईत आजारी असलेल्या त्यांच्या मुलाच्या गलिच्छ खोलींत त्यांच्याबरोबरच तें मन घोटाळूं लागतं. कधी तें आपल्या प्रिय पत्नीला भेटावयास निघालेल्या एखाद्या तरुणाबरोबर नागपूरला धन्तोलीमधील एखाद्या बंगल्यांत शिरून प्रेमळ पति-पत्नीच्या आनंदांत सहभागी होतं, तर कधी प्रथमच सासरीं निघालेल्या नववधूच्या भयमिश्रित आतुरतेचा अनुभव घेतं. भोवतालचे प्रवासी फलाटावरच असतात, मीहि फलाटावरच असतों; पण माझं मन मात्र सगळीकडून स्वैर संचार करून येतं.

माझ्या निरनिराळ्या गांवीं विखुरलेल्या माझ्या मित्रमंडळींची व नातेवाइकांची आठवण मला याच वेळीं होते. पुष्कळ दिवसांत न भेटलेल्या स्नेह्यांना भेटण्याची, त्यांच्याशीं मनसोक्त हास्यविनोद करीत गप्पा मारण्याची तीव्र इच्छा अशा प्रसंगीं होते; पण जड शरीराला जरी तें शक्य नसलं, तरी माझं मन मात्र सुरू झालेल्या गाडीच्याहि पुढे धावतं आणि गाडी पहिल्या सिग्नलच्या बाहेर पडण्याच्या आंतच तें पुणें-मुंबईची सफर करूनहि येतं. कधी मुंबईला तें माझ्या मित्रांच्यासमवेत चौपाटीवर

समुद्राची शोभा पाहत असेल, तर कधी पुण्याला तें लक्ष्मीरोडवरून माझ्या मेहुण्याबरोबर स्वैर भटकताहि असेल. कधी केव्हाहि न पाहिलेल्या बनारस विश्वविद्यालयांत एका खोलींत माझ्या तिसऱ्या एका मित्राशीं हितगुज करण्यांत तें दंग झालेलं असेल, तर कधी अहमदनगरला माझ्या चुलतबंधूच्या घरीं वहिनींशीं तुंबळ वादविवादहि करीत असेल. त्या माझ्या सर्व जिव्हाळ्याच्या मंडळींना भेटावयाचें आगगाडी हें साधन असल्याने त्या साधनाच्या केवळ दर्शनानेच साध्य तावडतोब घडून येतें. साध्य व साधनाची इतकी निगडितता इतरत्र क्वचितच अनुभवाला येत असेल.

पुष्कळ वेळां अज्ञात माणसांच्या दुःखांतहि माझं मन सहभागी होतं. देशाची ज्या वेळीं फाळणी झाली व निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे आगगाडींतून येऊं लागले, त्या वेळीं त्यांच्या चेहेऱ्यावरील भाव व त्यांची दीन अवस्था पाहत असतां माझं मन किती तरी वेळां पंजाबमधील त्या भीषण वातावरणांत वावरत असे. फलाटावर चेंगराचेंगरींत गाडीची वाट पाहत बसलेली मानवांची ती अलोट गर्दी–गाडी येतांच आंत शिरण्याची त्यांची ती धडपड, मध्येच गाडी थांबली की, हल्ल्याच्या भीतीने इकडे तिकडे पाहणारी त्यांची कावरीबावरी नजर इत्यादि सर्व चित्रें माझ्या मनश्चक्षूपुढं त्या वेळीं स्पष्ट दिसत असत. आपली सर्व नेतां येण्यासारखी मालमत्ता आपल्या पाठीशीं बांधून आपल्या राहत्या घराला व जन्मभूमीला कायमचा राम राम ठोकून निघालेल्या निर्वासितांच्या रांगा–त्यांवर मधूनच होणारे हल्ले व आपल्या प्रिय पत्नीला किंवा प्रिय पतीला मृत स्थितींत तेथेच सोडून अश्रु पुसण्याचीहि उसंत न घेतां सरहद्द जवळ करणारे मुशाफीर यांचीं दृश्यें वर्तमानपत्रांतील वर्णनं वाचून जितकीं माझ्या कल्पना-चक्षूंसमोर आलीं नसतील तितकीं निर्वासितांनी भरून जात असलेल्या त्या आगगाड्या व त्यांतील निर्वासितांच्या चेहऱ्यावरील भाव पाहून माझ्या मनश्चक्षूसमोर आलीं. तो सर्वच महिना मी अत्यंत विषण्ण मन-

स्थितींत काढला; पण स्टेशनवर माझ्या आवडत्या स्थळीं येण्याचा क्रम त्या वेळींहि मी सोडला नाही.

अनेक वेळीं आगगाडी सुरू झाली की, तिच्याबरोबर माझें मनहि पुढे पुढे जाऊं लागतें. उत्तर हिंदुस्थानांत प्रवास करावयाची माझी इच्छा मनांत खूप आहे. नागपूर, आग्रा, बनारस, दिल्ली या ठिकाणीं सफर काढून येण्याचं कितीदा तरी मनांत ठरवितों, पण प्रत्यक्ष शरीर जरी त्या गांवीं जात नसलं तरी माझं मन आगगाडीबरोबर गांवोगांव हिंडत असतं. आज तें नागपूरला माझे स्नेही डॉ. कोलते यांच्याकडे जाईल, तर उद्या तें आग्र्याच्या ताजमहालाची चांदण्यांतील शोभा पाहात असेल. कधी नव्या दिल्लीची शोभा पाहत रस्त्या-रस्त्यांतून हिंडत असेल तर पंढरपूरच्या वारकऱ्यांसमवेत चंद्रभागेच्या तीरावरील विटेवरचं परब्रह्म तें कधी डोळे भरून पाहत असेल. प्रा. फडक्यांची जेहलम् कादंबरी वाचल्यावर तर एकदा तें काश्मीरच्या नंदनवनांत विहारहि करून आलं. माझ्या मनाची ही मुशाफरी नित्य चालते आणि सुदैवाने या मुशाफरीला तिकीट पडत नसल्याने तिला कोणताच प्रतिबंध नसतो. त्यामुळे शरीराने जरी मी फलाटावर असलों, तरी मनाने मी त्या वेळीं कुठं असेन हें सांगणें कठीण असतें.

रत्नागिरीस असतांना तेथे आगगाडी नव्हती; पण समुद्रकिनारीं बसून आगबोटी पाहण्यांत तेथे माझा किती तरी वेळ जाई. मुंबईहून येणारी व मुंबईकडे जाणारी अशा दोन्ही आगबोटी पाहिल्याशिवाय मी बंदरावरून उठत नसे. साधारण काळोख पडला असतांना समुद्रांतून दूरवरून प्रकाशाची रांग तरंगत येतांना दिसावी, आपणासमोर अधांतरीं ती उभी असतांना तिच्या प्रकाशकिरणांनी समुद्राच्या लाटांवर आकर्षक नृत्य करावें आणि कांही वेळाने ती रांग तशीच तरंगत तरंगत जाऊन क्षितिजावर अदृश्य व्हावी, हें दृश्य दररोज पाहूनसुद्धा मला कधी कंटाळा आला नाही. त्या प्रकाशाच्या रांगेबरोबर माझं मनहि जणू कांही तरंगत तरंगत

जात असें, समुद्राच्या लाटांवर त्या प्रकाशकिरणांबरोबर जणूं कांही नृत्य करीत असें. या साऱ्या अनुभवांत एक प्रकारचें काव्य भरलें आहे असें मला वाटे. रत्नागिरी सोडली, त्या वेळीं मला कशाबद्दल सर्वांत अधिक वाईट वाटलें असेल, तर तें या काव्यात्म आनंदाला मुकल्याबद्दल.

पण तेथील तो आनंद आज जळगांव स्टेशनवरील फलाटहि मला देत आहे. समुद्राची अथांगता येथे नसेल. प्रकाशलहरींचें तरंगतें सौंदर्यहि येथे नसेल. किंबहुना जळगांव स्टेशनचा फलाट अत्यंत सौंदर्यहीन असल्याची साक्षहि पुष्कळ वेळां येई. पण रत्नागिरीच्या अथांग सागराची उणीव येथे मानवी मनाच्या सागराने भरून काढली आहे. लाटांच्या संगीताऐवजी मानवी भावनांचें संगीत मला येथे ऐकूं येतें व त्यावर मन तरंगूं लागतें. निसर्गाच्या भव्यतेचा मला रत्नागिरीला प्रत्यय येत होता; तर जीवनाच्या भव्यतेचा व विशालतेचा प्रत्यय मला येथे येतो. जीवन हें सुखदुःखाच्या लाटांनी भरलेलें असल्याची जाणीव येथे होते व त्या लाटांचें संगीत मनाला प्रत्यही ऐकूं येतें आणि म्हणूनच येथे बसलों की, जीवनाच्या रुक्ष चाकोरींतून माझं मन बाहेर निघतं व पक्ष्याप्रमाणे अन्तराळीं स्वैर संचार करूं लागतं.

प्रत्यक्ष केलेल्या विहारापेक्षाहि फलाटावर बसून आगगाडीच्या धुराबरोबर कल्पनाशक्ति स्वैर सोडण्यांत व आग्र्याच्या ताजमहालांत किंवा काश्मीरच्या नंदनवनांत सहल करण्यांतच मला आनंद वाटतो. उद्या जर कुणी मला खरोखरच आग्र्याला किंवा काश्मीरला जाण्याचा आग्रह केला, तर तें मला रुचेल असें वाटत नाही. त्यापेक्षा कल्पनासृष्टींतील ताजमहालांत केलेला विहारच मला अधिक प्रिय वाटेल. आणि त्याहिपेक्षा माझ्या शेजारीं बसलेल्या शेतकऱ्याच्या शेतावर तो पेरणी करीत असतांना, कारभारणीबरोबर सुखदुःखाच्या गोष्टी करीत असतांना व लाल तिखट आणि जाड भाकरी खात असतांना त्यांच्याभोवती रेंगाळणें मला अधिक आवडेल.

निर्जीव ताजमहालाच्या सौंदर्यापेक्षा सजीव ताजमहालांतील हें सौंदर्य मला किती तरी आकर्षक वाटतें.

आणि जीवनाच्या या अनुभूतीचा प्रत्यय मला फलाटावरील त्या माझ्या आवडत्या जागीं बसल्या बसल्या येत असतो. तो प्रत्यय घेत असतांना क्षणभर जीवनाच्या रुक्ष चाकोरींतून मन मुक्त होऊन तें स्वैर विहार करूं लागतं व 'हरपलें श्रेय' सांपडल्याचा आनंद मनाला होऊं लागतो. माझ्या मनाचा हा विहार खऱ्या विहारापेक्षाहि मला अधिक आनंद देतो. हा विहार करीत असतांना आजच्या दुःखाचा विसर पडतो, उद्याच्या चिंता क्षितिजापार होतात व बालकवीप्रमाणे

सुंदरतेच्या मोहनांत मन आमुचेंहि नाचे
बंधहि होती शिथिल, हरपतें भानहि जगताचें.

अशी मनाची स्थिति होते. मनाभोंवतींच्या अंधाराचे पाश नाहीसे होतात व कोणत्या तरी दिव्य प्रकाशांत मन तरंगत असल्याचा भास होऊं लागतो.

आगगाडीचें आकर्षण मला वाटतें तें याचसाठी! हें मी माझ्या मित्रांना किंवा माझ्या पत्नीला सांगितलें तर त्यांना तें पटणार नाही. पण—

'अपूर्ण अपुलें ईप्सित झालें
पूर्ण दिसे जेथे'
'मनुजाचें मन सहज पावतें
आकर्षण तेथें'

अशी बालकवींच्या शब्दाची साक्ष दिली तर माझ्या आगगाडी-विषयीच्या आकर्षणाची मीमांसा त्यांना पटेल असं मला वाटतं. आणि नाही पटली तरी त्यांच्यासाठी स्टेशनवर जाण्याचा व त्या अभिनव सृष्टींतील मनाच्या मुशाफरीचा अनुभव घेण्याचा माझा क्रम मी सोडणार आहे थोडाच?

## २ : खोटीं नाणीं

साधारणपणें घरांत ट्रंकेला किंवा कपाटाला कुलूप लावणें मला बिलकूल आवडत नाही. एक तर प्रत्येक वेळीं एखादी गोष्ट हवी असल्यास ती घेण्यासाठी कुलूप उघडणें व त्यासाठी अगोदर किल्ली कुठे ठेवली हें शोधणें हें माझ्यासारख्या गैरशिस्त अव्यवस्थित माणसाला अतिशय कठीण जातें. अन् शिवाय अशा रीतीने ट्रंकांना किंवा कपाटांना कुलुपें लावून सर्वत्र कडेकोट बंदोबस्त करणें म्हणजे आपल्याकडे येणाऱ्या जाणाऱ्या मंडळीवर अविश्वास दाखविण्यासारखें आहे, असेंहि मला वाटतें. त्यामुळे घरांत तरी कशालाहि कडीकुलुपें लावण्याच्या मी विरुद्ध आहें.

असें असूनहि माझ्या टेबलाच्या उजव्या बाजूला जो खण आहे त्याला नेहमी कुलूप असतें. कुठेहि बाहेर जायचें असलें म्हणजे त्या खणाला कुलूप लावलें आहे अशी खात्री करून घेतल्यावर मी बाहेर जातों. यावरून त्यांत मी कांहीतरी मौल्यवान वस्तु ठेवीत असल्याचा तर्क कुणी केला तर तो मात्र पार चुकीचा ठरेल. कुणी खटपटीने तो कप्पा उघडलाच तर त्यांत किरकोळ कागदच सांपडतील; आणि त्या कागदपत्राखाली एका कोपऱ्यांत एक लहानशी डबी मात्र त्याला दिसेल. मोठ्या अपेक्षेने त्याने ती उघडलीच तर मात्र त्याचा चांगलाच अपेक्षाभंग होईल. कारण कोणताहि मौल्यवान जिन्नस त्यांतून बाहेर पडण्याच्या ऐवजी एक रुपयापासून तों एक आण्यापर्यंत जवळजवळ वीस पंचवीस खोटीं नाणीं मात्र बाहेर पडतील. आणि मग त्याला वाटेल, "हेंच का पंडितरावांचें रहस्य? यासाठीच का टेबलाच्या कप्प्याला कुलूप लावण्याची एवढी काळजी ते घेतात?"

माझं हें रहस्य सर्वांपासून—माझ्या पत्नीपासूनहि गुप्त ठेवण्याची दक्षता मी घेतों हें तर खरंच ! पण त्याला कारणं अगदी निराळीं आहेत. एक तर तीं सर्व खोटीं नाणीं माझ्या भिडस्तपणाचे व माझ्या व्यवहारशून्य-स्वभावाचे साक्षीदार आहेत असें मला वाटतें. आणि अगोदरच मी ' फार भोळा ' असल्याची माझ्या सर्व परिचित मंडळींत पसरलेली कीर्ति पुन्हा अधिक पसरूं नये अशी माझी इच्छा आहे. " आपण व्यवहारशून्य आहोंत. लोक आपल्या भोळेपणाचा फायदा घेतात. " अशी स्वतःची दुष्कीर्ति झालेली मला तरी आवडणार नाही. आणि दुसरं म्हणजे ज्या अंधविश्वासाने व माणसांत असलेल्या चांगुलपणाच्या श्रद्धेने मी लोकांकडून मिळालेले मोडीचे पैसे न पाहतांच खिशांत घालतों, त्या माझ्या अंधविश्वासाची व श्रद्धेची हीं नाणीं टिंगल करतात असा मला नेहमी भास होतो. ' जग हें भोळ्या माणसासाठी नाहीं. व्यवहारी जगांत शठाला महाशठच झालं पाहिजे. ' असा संदेश देत तीं जणू मला सतत हिणवतात असें मला वाटत असल्याने तीं नाणीं मी नेहमी माझ्या दृष्टि-आड ठेवण्याची खबरदारी घेत असतों.

ज्या ज्या प्रसंगीं हीं नाणीं माझ्या गळ्यांत मारलीं गेलीं ते प्रसंग मला चांगलेच आठवतात. कांही भाजीवाल्याकडून, कांही व्यापाऱ्याकडून, कांही रद्दीविक्याकडून, कांही गवळ्याकडून तर कांही परिचितांकडून — अशा अनेक व्यक्तींकडून हीं नाणीं मला मिळालीं आहेत. आणि तीं सुद्धा एका गांवांतून नव्हे ! तर रत्नागिरीपासून ते पुण्यापर्यंत अनेक लहान-मोठ्या गांवांतून हीं नाणीं मीं जमा केलीं आहेत. प्रत्येकांनी ती जाणून बुजून माझ्या गळ्यांत मारली असतील असें मला अद्यापिहि वाटत नाही. चुकून मोड देतांना त्यांना न कळत हीं नाणीं त्या मोडींत आलीं असा-वींत असंच मला वाटतं. पण चुकून मलाच दिलेल्या मोडींत कशीं खोटीं नाणीं नेहमी यावींत या योगायोगाचें मात्र मला कौतुक वाटतें.

कुणाजवळूनहि मोड घेतांना किंवा पैसे घेतांना मी ते सहसा मोजून घेत नाहीं, किंवा न्याहाळूनहि घेत नाहीं. तीनतीनदा पैसे मोजून बघणें, शेजारच्या दगडावर सतरा वेळां ते वाजवून बघणें म्हणजे ज्या व्यक्तीकडून तुम्ही पैसे घेतां त्या व्यक्तीविषयी अविश्वास प्रगट करण्यासारखें आहे असें माझें आपलें मत आहे. 'हा येतो केव्हा व आपणाजवळचीं खोटीं नाणीं आपण याच्या गळ्यांत बांधतों केव्हा' अशा निश्चयाने तो मनुष्य आपल्याला फसविण्यासाठी टपून बसला आहे अशी त्याच्याविषयी कल्पना आपण कां करावी? माझ्याकडून पैसे घेतांना ज्या वेळीं एखादी व्यक्ति तीनतीनदा ते मोजून घेते व एखादें नाणें उलटसुलट करून त्याच्या खरेपणाविषयी खात्री करून घेऊं लागते त्या वेळीं मला त्या व्यक्तीचा खरोखरच राग येतो. मग ज्या गोष्टीचा आपणाला राग येतो तीच गोष्ट आपण दुसऱ्याच्या बाबतींत करणें कितपत योग्य ठरेल?

माझ्या या तत्त्वज्ञानाबद्दल मला अनेक वेळां प्रायश्चित्त मिळतें हें खरें आहे. परवाच पाहा; माझ्या घरांतील बरीचशी सांचलेली रद्दी मीं विकायला काढली होती. त्यासाठीं रस्त्यावरून जाणाऱ्या एका रद्दीविक्याला मीं घरांत बोलावलें. माझ्या अपेक्षेपेक्षा त्याने भाव बराच कमी सांगितला. आणि मी कांही घासाघीस करण्यापूर्वीच त्याने आपल्या जीवनाची करुण कहाणी मला ऐकवली. '—आजकाल रद्दीचा भाव कसा उतरला आहे, अनेक मैल खांद्यावर ओझं घेऊन पायपिटी केली म्हणजे दिवसाच्या शेवटीं कसे चार किंवा आठ आणे सुटतात आणि आजच्या महागाईच्या काळांत घरीं असलेल्या तीनचार कच्च्या—बच्च्यांच्या तोंडीं पोटभर घास घालणं सुद्धा कसं कठीण झालं आहे—' अशा त्याच्या करुण कहाणीने माझं मन द्रवलं व त्याने सांगितलेल्या भावांत त्याला मीं रद्दी विकली. रद्दी वजन करून, ताब्यांत घेऊन पैसे देण्यासाठी कमरेचा कसा त्याने काढला आणि अडीच रुपयांची मोड माझ्यासमोर ठेवली. "साहेब, मोजून घ्या नीट, नाहीतर मागून म्हणाल, या रद्दीवाल्यानं फसवलं म्हणून! हां!

पोटाला दोन पैसे मागून घेईन. पण खोटेपणा करायचा नाही!" असं पुन्हा पुन्हा तो म्हणत असतां पैसे तसेच उचलून टेबलावर ठेवीत मीं म्हटलें, "ठीक आहे रे! जा. तुझ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे." तीन-तीनदा मला सलाम करीत तो निघून गेला. आणि नंतर मीं मोड पाहिली त्या वेळीं त्यांतील दोन पावल्या चक्क खोट्या असल्याचें मला दिसून आलें. त्याने तीनतीनदा केलेल्या सलामाचं व मानभावीपणानं केलेल्या स्तुतीचं रहस्य मला त्या वेळीं कळलं! पण तरीहि मला त्याचा संताप आला नाही. अगोदर त्यानं पैसे पाहून घेण्याविषयीं तीनतीनदा बजावलं असतां ते पाहून न घेणें ही माझी चूक होती. आणि दुसरं म्हणजे त्या बिचाऱ्याच्या गळ्यांत अशीच कुणीतरी हीं खोटीं नाणीं बांधलीं असतील. तेव्हा त्याने तें लोण माझ्यापर्यंत आणून पोहोंचविलें तर त्यांत त्याला कां म्हणून दोष द्यावयाचा? आणि त्याच्या जीवनांत आठ आण्यांचं जितकं महत्त्व होतं तितकं माझ्या जीवनांत नव्हतं.

पण मला पुष्कळदां राग येई तो मोठमोठ्या व्यापाऱ्यांचा. माझ्या या भिडस्तपणाचा जास्तींत जास्त फायदा कुणीं घेतला असेल तर त्यांनी. अनेक वेळां एखादा किरकोळ जिन्नस आणण्यासाठी मी दुकानांत जाई. माझं त्या वेळीं मोठं स्वागत होई. हवा, पाणी, महागाई इत्यादि अनेक विषयांची चर्चा करतां करतां तो व्यापारी माझ्या हातांत तो जिन्नस व पांच किंवा दहा रुपयांची मोड देई. इतक्या सलगीने व अगत्याने बोलणाऱ्या माणसाने दिलेली मोड त्याच्या देखत मोजून पाहणें मला तर कधीच जमत नसे. 'नीट मोजून घ्या हं पैसे.' असें जरी त्याने म्हटलें, तरी संकोचाने मी ते पैसे तसेच खिशांत ठेवत असे. पण ते खिशांत ठेवत असतांना 'या मोडींत एक दोन नाणीं तरी खोटीं असणारच.' ही खूणगांठहि मी मनाशीं बाळगून ठेवींत असे. आणि शेकडा साठ प्रसंगीं माझ्या मनाची ती खूणगांठ खरी ठरत असे. पण पुन्हा तीं खोटीं नाणीं घेऊन परत त्या व्यापाऱ्याकडे जाण्याचें किंवा तीं बदलून मागण्याचें धैर्य

मात्र मला कधींच झालें नाही. पण अशा व्यापाऱ्यांच्याकडे पुन्हा जातांना शक्य तों आवश्यक तेवढे पैसेच बरोबर घेण्याची दक्षता मात्र मी बाळगत आलों आहें. आणि गंमत म्हणजे माझ्याकडून पैसे घेतांना हेच व्यापारी तीनतीनदा पाहून व वाजवून घ्यायला कमी करीत नाहीत. आपण दिलेल्या नाण्यांपैकीच एखादें 'साभार परत' येण्याची भीति त्यांना वाटत असल्यास नकळे.

माझ्या परिचितांकडूनहि असे आहेर मला कांहीं वेळां आलेले आहेत. पण ते चुकून आले असावेत असें मला वाटतें. खोटीं नाणीं चालवावयाचें एक हक्काचें ठिकाण म्हणून कुणीं माझा उपयोग करीत असल्याचें मला वाटत नाही. अगदी परवाच माझ्या ओळखीच्या एका गृहस्थाने माझ्याकडून उसने नेलेले दहा रुपये परत केले. नेतांना त्यांनी दहा रुपयांची नोट नेली होती. परत आणतांना मात्र वाण्याच्या दुकानाप्रमाणे दहा रुपयांचा खुर्दा त्याने माझ्यासमोर ठेवला. माझ्या नेहमींच्या संवयीप्रमाणे न मोजतांच तो मीं बाजूला ठेवला. माझ्या पत्नीला नंतर त्यांत एक अधेली खोटी असल्याचें आढळून आलें, आणि मोड नीट पाहून न घेतल्याबद्दल तिने माझी खूप हजेरी घेतली. 'नजरचुकीने ती त्यांत आली असावी अशी तिची बरीच समजूत घालूनहि तिला तें पटलें नाही. ती अधेली मीं परत करावी असा तिचा आग्रह मात्र मीं खोडून टाकला. कारण ती अधेली परत करावयास जाणें म्हणजे एका दृष्टीने त्या परिचिताला अपराधी ठरविण्यासारखेंच होतें. आणि तेवढें नैतिक धैर्यहि माझ्या अंगीं नव्हतें.

आणि तें नैतिक धैर्य माझ्या ठिकाणीं असतें तर माझ्या त्या टेबलाच्या खणांतील डबींत इतकीं खोटीं नाणीं कशाला सांचलीं असतीं ? कितीतरी वेळां मीं ठरविलं असेन कीं, आज एक चवली तरी चालवावयाचीच; पण प्रत्यक्ष बाजारांत जातों त्या वेळीं खिशांतून चुकूनसुद्धा ती चवली बाहेर पडत नाही. अनेक वेळां हाताला लागलेली चवली मी पुन्हा मागे

ढकलतों – शेवटीं ती जशीच्या तशी घरीं परत आणतों. ती मला कुठे चालवितां आली नसती अशांतला भाग नाही; पण आपण कुणाला ती दिली व खोटी म्हणून त्याने ती परत केली तर मला किती शरमिंदल्या-सारखें होईल त्याचें चित्र माझ्या मनश्चक्षूपुढे उभें राहतें आणि माझा हात मागें येतो. असें खोटें नाणें जाणूनबुजून दुसऱ्याला देतांना आपण कांहीतरी अपराध करीत आहोंत, दुसऱ्या व्यक्तींच्या विश्वासाचा गैर फायदा घेत आहोंत याचीहि सारखी जाणीव मला टोचत असते. त्यामुळे एखाद्या वेळीं असें नाणें चालवण्यांत मला यश आलेंच तर मला किती-तरी दिवस चैन पडणार नाही, ज्या व्यक्तीला तें नाणें दिलें त्या व्यक्तीच्या डोळ्याला डोळा भिडविण्याचें धैर्य होणार नाही, अशी मला खात्री वाटते आणि म्हणूनच मी असा प्रयत्न करावयाचा टाळतों.

माझ्या मनाचें पृथक्करण जेव्हा मी करतों त्या वेळीं अशीं खोटीं नाणीं चालविण्याला लागणारें बेडर धैर्य माझ्यामध्ये नाही हें मला उघड दिसून येतें. अशीं खोटीं नाणीं चालविण्याला खरोखरच अलोट धैर्याचा मनुष्य हवा. येरा गबाळ्याचें तें काम नाही. अशा वृत्तीचीं माणसें खोटें नाणेंच काय पण वाटेल तें खपवूं शकतील. भोवताली आपण अशा प्रवृत्तीचीं माणसें थोडी का बघतों? निर्भेळ दुधाची छातीठोकपणें ग्वाही देणाऱ्या गवळ्याच्या दुधांत शेराला पावशेर तरी पाणी असतेंच, यांचा अनुभव कुणाला नाही? लोणकढें तूप म्हणून वनस्पति तूप मिसळलेलें मिश्रण आपल्या गळ्यांत बांधण्याचा प्रयत्न थोडे का करतात? शुद्ध खोबरेल म्हणून व्हाइट आइल मिसळलेलें तेल आज थोडें का विकलें जातें?

अस्सल म्हणून नक्कल खपविण्याची प्रवृत्ति जोंपर्यंत समाजांत आहे तोंपर्यंत एखादें दुसरें खोटें नाणें चालविण्याचा प्रयत्न करण्याच्या प्रवृत्तीला दोष कां द्यावा? आणि ही प्रवृत्ति तरी समाजांत सर्वत्रच दिसत नाही काय? आज प्रामाणिकपणाने केवळ सत्याचीच कास धरणारे धर्मराज

समाजांत किती सांपडतील? आणि अशा 'धर्मराजां'ना आज समाजांत मानाने राहतां येणें शक्य आहे काय? आज जवळ जवळ प्रत्येक जण आपला खरा खोटा माल दुसऱ्याच्या गळ्यांत बांधण्याचा प्रयत्न करतांना आपणाला दिसतो. आपल्या अंगीं नसलेले गुण लोकांच्या गळीं उतरवून आपली प्रतिष्ठा वाढविणारा दांभिक वृत्तीचा मनुष्य व आपल्या मालाची खोटी जाहिरात करून तो गिऱ्हाइकाच्या गळीं उतरविणारा व्यापारी एका दृष्टीने खोटींच नाणीं चालवत नाहीत काय?

मला आठवतं, एकदा आमच्या कॉलेजमध्ये एक कलावंत आला होता. उत्कृष्ट तऱ्हेच्या नकला करण्याबद्दल त्याचा लौकिक असल्याचा त्याचा दावा होता. बरोबर त्याने मुंबईच्या मुख्य प्रधानापासून ते नशिराबादच्या हेडमास्तरपर्यंत अनेकांनी दिलेल्या प्रशस्तिपत्रकांचें भेंडोळें आणलें होतें. त्यांनी स्वतःच्या गुणाच्या केलेल्या वर्णनावरून व त्या प्रशस्तिपत्रकां-वरून आमची तर अशीच खात्री झाली की, जन्माला यावं आणि याच्या नकला पाहाव्यात. पैकी जन्माला येण्याचा कार्यभाग अगोदरच उरकला असल्याने फक्त नकला पाहण्याचा कार्यभाग शिल्लक उरला होता. मोठ्या अपेक्षेने आम्हीं तो कार्यक्रम ठरविला—त्याचा प्रचार केला आणि नंतर काय? त्यांनी नकलांना सुरुवात केली आणि इकडे प्रत्येकाला जांभया यायला सुरुवात झाली! प्राध्यापकवर्ग हजर होता, म्हणूनच बिचारा सुटला—नाहीतर पोरांच्या कचाट्यांत सांपडल्यावर त्याचें काय झालें असतें हें सांगणें कठीण. आपल्या कलेचं हें बेगडी नाणंच त्यांनी आपल्या गळीं उतरण्याचा प्रयत्न केला नव्हता काय?

त्याचप्रमाणे 'अखिल भारतांत गाजलेला', 'सर्व रसिकांनी नांवाजलेला', 'उत्पन्नांचें रेकॉर्ड मोडणारा' असा 'अभिनव क्रान्तिकारक बोलपट पाहायला जावं आणि कांहीतरी बेगडी कलाकृति पडद्यावर दिसून पदरीं निराशा यावी असा अनुभव आपणांपैकी प्रत्येकाला कितीदा तरी आला असेल. महाराष्ट्रांत 'खळबळ उडविणारी व आपल्या शैलीने रसिकांच्या

मनाची पकड घेणारी ' कादंबरी मोठ्या अपेक्षेने वाचावयास घ्यावी आणि ती अगदी सामान्य निघावी हाहि अनुभव आज थोड्यांना आला नसेल. ' मराठीचा इब्सेन ' म्हणून स्वतःची प्रसिद्धि करून घेणाऱ्या नाटककाराच्या नाटकांत ज्या वेळीं इब्सेनच्या बाह्य नाटयतंत्राचीच केवळ भ्रष्ट नक्कल दृष्टीस पडते, तेव्हा तशाच तऱ्हेची निराशा आपल्या वांटयाला येत नाही काय ?

अशा तऱ्हेचीं खोटीं नाणीं आज समाजांत जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत चालविलेलीं आपण पाहतों. ' खोटीं नाणीं ' तयार करणाऱ्याला निदान कायद्याने शिक्षा तरी ठेवली आहे. पण समाजांत उजळ माथ्याने चालविलीं जाणारीं वरील खोटीं नाणीं कायद्याच्या कक्षेंत येऊं न शकल्याने अधिक फसवीं आणि अनिष्टकारक आहेत असें वाटत नाही काय ? अशीं खोटीं नाणीं चालविणाऱ्या व्यक्तीच्या ठिकाणीं असणारें सामाजिक धैर्य आणि बेडर वृत्ति याचें मात्र कौतुक करावेंसें वाटतें. आपलें नकलीं नाणें खऱ्या नाण्याच्या मोलाने खपविण्याचें कौशल्य त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळे एका दृष्टीने खरीं नाणीं ज्यांच्याजवळ आहेत अशा व्यक्तीवरसुद्धा ते कुरघोडी करूं शकतात, याचा प्रत्यय तर आपणाला पावलोपावलीं येतो. आणि अशा खोटया नाण्यावर भुलणारे, खोटयाचाच खरा म्हणून स्वीकार करणारे जगांत आहेत म्हणूनच अशा लोकांचें महत्त्व जगांत वाढलें आहे हेंहि नाकबूल करून चालावयाचें नाही.

शिवाय माझ्यासारखे भिडस्त लोक खोटयाचा खोटेपणा कळूनहि तसें जाहीर करण्याचें नैतिक धैर्य त्यांच्याजवळ नसल्याने स्वस्थ बसतात; क्वचित् ते स्वतःशीं जळफळतात पण स्वतःशीं केलेल्या जळफळीमुळे अशा लोकांचें थोडेंच नुकसान होणार ? संकोची वृत्तीमुळे कांही लोक तर त्या खोटया नाण्याचें कौतुकहि करतात. त्या नकलाकाराला मिळालेली तीं प्रशस्तिपत्रांचीं भेंडोळीं दुसऱ्या कशाची साक्ष देतात ? त्या प्रशस्तिपत्रांतील प्रत्येक शब्द खरा मानायचें ठरविलें तर तें प्रशस्तिपत्र देणाऱ्या

व्यक्तींच्या रसिकतेचें नाणें खोटें असलें पाहिजे असा निष्कर्ष काढावा लागेल आणि तें खोटें नाणें आमच्या गळीं उतरविल्याबद्दल त्यांना दोष द्यावा लागेल.

अशीं खोटीं नाणीं समाजांत प्रत्यही एकमेकांच्या गळीं मारण्याचा प्रयत्न चाललेला दिसत असतां मलाच पांच-पंचवीस खोटीं नाणीं माझ्याजवळ जमलीं म्हणून स्वतःला दोष देण्याचें कारण नाही. प्रत्येकाच्याच गळ्यांत केव्हाना केव्हातरी अशा प्रकारचीं खोटीं नाणीं पडलेलीं असतात. 'पण भोळेपणामुळे आपण फसलों' असं सांगण्याची प्रत्येकालाच लाज वाटते. मी तरी त्याला अपवाद कसा असेन? तीं सर्व खोटीं नाणीं मीं टेबलाच्या कप्प्यांत अगदी कोपऱ्यांत दडवून ठेवलीं आहेत त्याचें कारण तरी हेंच नाही का?

• • •

आपणांला जीवनांत अनेक वेळां अभिनयकुशल नटाची भूमिका करावी लागते. आपल्या मनांत निर्माण झालेल्या भावना दडपून निराळ्याच भावनेचा मुखवटा आपणाला चेहेऱ्यावर चढवावा लागतो आणि त्या चढवलेल्या मुखवट्याशीं सुसंगत असा अभिनयहि करावा लागतो.

त्या दिवशींचीच गोष्ट पाहा! संध्याकाळीं साडेसहा वाजतां 'दीदार' या चित्रपटाला जाण्याचा बेत आम्हीं सकाळपासून ठरविला होता. त्यासाठी मीं कॉलेजांतून लौकर घरीं यावयाचें–तिनेहि घरांतलें सर्व काम आटोपून तयारींत राहावयाचें आणि बरोबर सहाला आम्हीं घरांतून बाहेर पडावयाचें, अशी योजनाहि आखून तयार झाली होती. त्याप्रमाणे कॉलेजांत त्या वेळीं एक समारंभ असतांनाहि कांही तरी निमित्त सांगून मी लवकर घरीं सटकलों. सौभाग्यवतीहि पण खाद्यपदार्थ वगैरे तयार करून माझी वाटच पाहत होत्या. खाणें वगैरे आटोपून आम्ही बाहेर जाण्यासाठी चपला पायांत चढविल्या–

–इतक्यांत दारावरची घंटा वाजली. आम्हीं एकमेकांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिलें. दोघांच्याहि कपाळावर आंठ्यांचें जाळें उमटलें. 'कोण धडपडलं बुवा या वेळीं?' अशा त्रासिक विचाराने मीं दरवाजा उघडला! बाहेर भुसावळचा माझा मित्र बाळू व त्याची पत्नी उभी होती.

'काय? आलों ना आकस्मित तुला कबूल केल्याप्रमाणे?' आंत येत हसत हसत बाळू म्हणाला, 'आज ऑफिसला दांडी देऊन मुद्दाम तुझ्याकडे येण्याचा बेतच ठरविला होता आम्हीं. झालास की नाही आश्चर्यचकित?'

आश्चर्यचकित तर खरंच झालों होतों मी. पण तसं कांही न दाखवितां सुहास्य मुद्रेने दोघांनाहि मीं आंत बोलावलें. माझ्या पत्नीनेहि सुहास्य मुद्रेने त्यांचें स्वागत केलें. आम्ही दोन तीन तास खूप गप्पाहि मारल्या. गप्पा मारतांना, चहा कॉफी घेतांना व ते निघाले त्या वेळीं त्यांना निरोप देतांना आम्ही सतत भासवीत होतों की ते दोघं अल्यानं आम्हाला फारच आनंद झाला. आमच्या चेहेऱ्यावरचा उल्हास व हास्य शेवटपर्यंत आम्हीं ढळूं दिलं नाहीं. त्या हास्याच्या मागे केवढी तीव्र निराशा व चीड दडलेली होती याची त्या दोघांनाहि कल्पना नसेल. बोलपटाचा ठरविलेला कार्यक्रम चुकला म्हणून तर निराशा झाली होतीच, पण बाळ व त्याची पत्नी यांनी आम्ही भुसावळला गेलों असतांना आमची जी संभावना केली होती व पांचच मिनिटांत आम्हांला घराबाहेर काढून ते जे एका कार्यक्रमाला निघून गेले होते तो प्रसंग आमच्या स्मरणांत ताजा होता. त्यांनीं येऊन आमच्या कार्यक्रमाचा विचका करावा याची आम्हां दोघांनाहि चीड आली होती. तरी पण चेहेऱ्यावर हास्याचे मुखवटे चढवून आम्ही त्यांचें स्वागत करावयास सिद्ध होतों. केवळ शिष्टाचारासाठी व लौकिकासाठीं हे मुखवटे आम्हाला चेहेऱ्यावर चढवावे लागले होते. एका अभिनयकुशल नटाची भूमिका आम्हीं त्या वेळीं पार पाडली होती.

पण याचशा काय–जीवनांत अनेक प्रसंगीं आपणाला ही अशी भूमिका करावी लागते व खोटे मुखवटे चेहेऱ्यावर चढवावे लागतात. जीवनांतील अगदी क्षुल्लक प्रसंगापासून ते अगदी गंभीर प्रसंगापर्यंत हे खोटे मुखवटे चेहऱ्यावर चढविल्याशिवाय आपणास गत्यंतरच नसतें. आपले खरे मनोभाव जर प्रत्येक वेळीं चेहेऱ्यावर प्रगट होऊं लागले तर आपणाला जीवन असह्यच होईल.

परवाचा अगदी क्षुल्लक प्रसंग पाहा! बस चुकल्याने मी चालतच कॉलेजला निघालों होतों. नुकताच पाऊस झाला होता. रस्त्यावर खूप चिखल झाला होता. कॉलेजच्या जवळ आलों तशी एक मोटार खूप

वेगाने माझ्याजवळून गेली आणि गेली ती माझ्या अंगावर चिखलाचा संपूर्ण शिडकावा करून. माझे सर्व कपडे त्यामुळे चिखलानें बरबटले. तोंडावरहि थोडासा चिखल उडाला. मनांत मी अतिशय चिडलों. इतक्या लांब घरीं जाणें आता अशक्य होतें. शेवटीं तसाच कॉलेजांत गेलों. पण कॉलेजांत जो तो माझ्या कपड्यांकडे कुतूहलाने पाहूं लागला. कुणी हसूं लागले. प्रोफेसर्स, 'काय हो, काय उडालें हें तुमच्या कपड्यावर?' अशी खोचक पृच्छा करून हसत होते. या सर्वांना मला चेहेऱ्यावर हास्याचा मुखवटा चढवून तोंड द्यावं लागलं. मनांतील चीड चेहेऱ्यावर दाखविणें शक्यच नव्हतें. दाखविली असती तर अधिकच हास्याचा विषय बनलों असतों. मनांतून जरी मी संतापलों होतों तरी मला याची गंमतच वाटते आहे, असंच मी वरवर दाखवीत होतों.

असे स्वतः हास्यास्पद बनण्याचे प्रकार ज्या ज्या वेळीं माणसावर येतात त्या त्या वेळीं हे मुखवटे माणसाला चेहेऱ्यावर चढवावेच लागतात. मनांत कितीहि संताप असला तरी मित्रांच्या चेष्टेला तुम्हांला हास्याचा बुरखा घालूनच तोंड द्यावें लागतें. तो बुरखा त्या वेळीं जरा निसटला तर तुम्हाला अधिकच हास्याचा विषय व्हावें लागतें.

नको असलेले लोक ज्या वेळीं आपणाकडे येतात त्या वेळीं तर हे चेहेऱ्यावर चढविलेले मुखवटे मोठ्या कसोशीने सांभाळावे लागतात. कारण जरा मुखवटा बाजूला झाला की, भेटायला आलेल्या किंवा पाहुणा म्हणून आलेल्या व्यक्तीचा अपमान होईल की काय अशी सारखी भीति वाटत असते. तसा अपमान झाल्याने आपलें नुकसान होत नसलें तरी आपल्या भिडस्त मनाला तें पटत नाही. माझी पत्नी या बाबतींत मोठी कुशल आहे. मला जें साधत नाही तें ती अनेकदा साधून दाखविते. मला अप्रिय वाटणारी व्यक्ति आली तर मी हास्यमुद्रेने स्वागत करीन, पण हळू हळू तें हास्य लोप पावून त्या जागीं कंटाळा येऊं लागेल. जांभया येऊं लागतील. काय बोलावें तें सुचेनासें होईल. त्या

अप्रिय व्यक्तीला सूचना मिळण्याइतका बदल पटकन् माझ्या चेहेऱ्यांत होतो. माझ्या चेहेऱ्यावरील खोटा मुखवटा मी फार वेळ टिकवूं शकत नाही. पण माझ्या पत्नीच्या कौशल्याचें व चिकाटीचें मात्र मला कौतुक वाटतें. तिला ज्या स्त्रीविषयी अत्यंत तिटकारा आहे, अशी स्त्री एकदा तिच्याकडे आली. मी मोठ्या अपेक्षेने आंतील संभाषणाकडे कान लावून बसलों. आता या दोघींची खडाजंगी ऐकूं येईल अशी माझी अपेक्षा होती. पण दोन तास झाले तरी स्वर चढलेला ऐकूं येईना. म्हणून आंत जाऊन पाहतों तों दोघीहि हास्यमुद्रेने गप्पा मारीत बसल्या होत्या. माझ्या पत्नीनं विणकाम, भरतकाम दाखविलं होतं व तिचं त्या स्त्रीनं कौतुक केलं होतं. आता ती त्या स्त्रीला चहाचा जोराचा आग्रह करीत होती व ती स्त्री 'नको नको' म्हणतांना समोर ठेवलेलं खाद्य-पदार्थ खाण्याचा ती तिला आग्रह करीत होती. फार दिवसांनी जिवाभावाच्या मैत्रिणी भेटाव्या असें तें दृश्य होतें. दोघींनाहि एकमेकीं-विषयीं काय वाटतें ते दोघीहि ओळखून होत्या—पण चेहेऱ्यावर मात्र त्याची छटाहि नव्हती. अभिनय-कौशल्यांत त्या दोघीहि एकमेकींशीं चढाओढ करीत आहेत की काय असाच मला क्षणभर भास झाला.

त्याच्या उलट माझं मत ज्याच्याविषयी विशेष चागलं नव्हतं असा एक विद्यार्थी माझ्याकडे आला. 'या वेळीं मी कामांत आहें, मला वेळ नाही, मला कॉलेजांत भेटा.' असं सांगून अर्ध्या मिनिटांतच त्याला मीं वाटेला लावलें. माझ्या पत्नीला तें तितकेसें आवडलें नाही. एखादी व्यक्ति आपणाला कितीहि आवडत नसली तरी तसं आपण दाखवितां कामा नये असं तिचं स्पष्ट मत होतं. आपल्या मनोभावना इतक्या उघडपणें व इतक्या प्रामाणिकपणें आपण जर दाखवूं लागलों तर व्यवहारी जगांत आपण टिकणार नाहीं—जगांत सगळीकडेच अशी फसवणूक चालली आहे, त्यांत आपणालाच प्रामाणिक राहणं कसं जमेल? असें ती नेहमी बोलून दाखवी.

या तिच्या विधानाचा अनुभव खरोखरच योगायोगाने मला आला. एकदा एका लहान गांवांत व्याख्यानासाठी मला आमंत्रण आलें होतें. त्याप्रमाणे मी त्या गांवीं गेलों. संध्याकाळीं व्याख्यान झाल्यावर रात्रीच्या गाडीने मीं निघण्याचें ठरविलें. ज्या गृहस्थांकडे मी उतरलों होतों, ते त्या व्याख्यानमालेचे चिटणीस होते. रात्रीची गाडी गैरसोयीची होती. पाऊसहि थोडा पडत होता. तेव्हा त्या गृहस्थाने रात्रीं तेथेच मुक्काम करण्याचा मला खूप आग्रह केला. माझ्यासारख्या विद्वान् माणसाचे (?) पाय नाही तरी त्याच्या घराला कशाला लागणार होते ? रात्रीं मुक्काम केला तर तेवढाच अधिक सहवास लाभेल व अधिक आदरातिथ्य करतां येईल असेंहि आर्जवाने तो सांगूं लागला. त्याच्या चेहेऱ्यावरील ती उत्कटता व आर्जवीपणा पाहून माझेंहि मन डळमळूं लागलें. जेवण झाल्यावर हात धुण्यासाठी मी अंगणांत गेलों. पण तपेली विसरल्याने परत फिरलों. तेवढ्यांत स्वयंपाकघरांत खालील संवाद मला ऐकूं आला.

'कशाला ही पीडा ठेवून घेताय् ! जाऊं द्या ना त्याला रात्रीं !—' चिटणीसांची पत्नी त्याला दबलेल्या आवाजांत म्हणत होती.

'अग कोण ठेवून घेतोय् ! मी आपलं आग्रहाचं चंद्रबळ आणलंय् ! हवाय कुणाला ही कटकट घरीं !' चिटणीसाचा आवाज आला.

मनाशींच हसत मी पाऊल न वाजवतां परत मागे आलों व तेथूनच ओरडून चिटणीसाला हात धुण्यासाठी तपेली नसल्याचें सांगितलें.

ताबडतोब तो धांवत तपेली घेऊन बाहेर आला. आपल्या पत्नीच्या वेंधळेपणाबद्दल जरा स्वर चढवून त्याने नापसंती व्यक्त केली व जणू कांही तपेली ठेवण्याचें विसरण्यांत आपण पाहुण्याचा किती अनादर केला असा भाव चेहेऱ्यावर आणून तो उभा राहिला.

'मी जाणार बरं का आज रात्रीच्या गाडीने.' मी हात धुतांधुतां आपला निर्णय जाहीर केला.

'आँऽ!' तोंडावर आत्यंतिक आश्चर्याचा मुखवटा चढवून त्याने म्हटलें, 'अहो, असं कुठं झालंय्! कधी नव्हे ते आमच्याकडे तुम्ही आलांत. इतक्या घाईनं आम्हीं कसं सोडूं तुम्हाला? बरं कां ग, प्रोफेसरसाहेब आताच्या गाडीनं निघायचं म्हणतात! मीं साफ सांगितलं की आज आता राहायलाच पाहिजे म्हणून!'

'अय्या! आत्तांच्या गाडीने?' त्याच्या पत्नीनेहि त्याच्या अभिनयाला साथ दिली 'छेः छेः! रात्रीं बेरात्रीं कुठे जाताय्? आमच्या गरिबाच्या घरची मीठभाकरसुद्धा धड खाल्ली नाही तुम्हीं. उद्या पुन्हा तुमच्यासाठी चक्का सांगून ठेवलाय्....'

दोघांनी राहण्याचा आग्रह करण्यांत अहमहमिका चालविली होती. मी मात्र मनांतल्या मनांत हसत होतों. एकदा तर यांची चांगली जिरविण्या-साठी करावाच मुक्काम! असाहि दुष्ट बेत मनांत येऊन गेला. पण तो क्षणभरच. मीं त्यांना अनेक सबबी सांगून माझें रात्रींचें निघण्याचें महत्त्व पटवून दिलें. माझ्या चेहेऱ्यावर मी असा कांही भाव आणला होता की त्यांना वाटावें यांचा आग्रह मोडून जाण्यांत मला केवढें तरी दुःख होत आहे. शेवटीं नाइलाजाने त्यांनी टांगा आणला व माझें सामान त्यांत टाकलें.

'पाहा बुवा! आम्हांला फार वाटतं तुम्ही अद्याप राहावं असं! अहो, तुमच्यासारख्या थोरांचा सहवास आम्हाला तरी कधी मिळायचा? काय ग?' त्यांनी दुजोऱ्यासाठी पत्नीकडे पाहून म्हटलें.

'हो तर काय! पण प्रोफेसरसाहेबांनी आमचं अगदी ऐकायचंच नाही असं ठरवलेलं दिसतंय्!' तिने दीर्घ सुस्कारा टाकीत, नवऱ्याला साथ केली. मीं त्यावर हसत कांहीतरी उत्तर दिलें. टांग्यांत बसलों. दोघांनी मला नमस्कार करून म्हटलें, 'आता पुन्हा जरूर आलंच पाहिजे हं!'

मी कांही उत्तर देण्याच्या आंतच टांगा चालू झाला अन् माझी खात्री आहे की टांगा दृष्टिआड होतांच त्या दोघांनी आपल्या तोंडावरील खोटे मुखवटे काढले असले पाहिजेत व एकमेकांना म्हटलं असलं पाहिजे,

'गेली पाडा एकदांची!' मला त्या दोघांचा अभिनय आठवून गाडींत सारखें हसूं यत होतें.

संकटाच्या किंवा आत्यंतिक दुःखाच्या प्रसंगीं मात्र सामान्य माणसाला खोटे मुखवटे चेहेऱ्यावर चढविणें कठीण जातें. अंतःकरणांत निर्माण झालेली भीति किंवा उत्पन्न झालेला शोक चेहेऱ्यावरून पुसून टाकून त्यावर हास्याचा, गांभीर्याचा मुखवटा चढविणें हें सोपें काम नाही. पण तेंहि अनेकदा माणसांना करावें लागतें. माझा एक मित्र या बाबतींत फार कुशल नट आहे. एकदा त्याला त्याची पत्नी अतिशय आजारी असल्याची तार आली. ही बातमी समजल्यावर आम्ही सर्वजण त्याच्या खोलीवर जमलों. त्याला धीर देऊन त्याचें समाधान करावें हाच आमचा त्याच्या खोलींत जमण्याचा उद्देश होता. पण गंमत अशी झाली की आम्हां सर्वांचीं तोंडें रडकीं होतीं, तर त्याच्या चेहेऱ्यावरचें हास्य कांही ढळलें नव्हतें. एकीकडे आपल्या प्रवासाची तयारी करीत असतांना दुसरीकडे त्याचे नेहमीचे हास्यविनोद चाललेच होते. एकदा तर आमच्या वृत्तींतील गांभीर्य पाहून तो विनोदाने म्हणाला, 'हें काय लेकांनो, स्वतःची बायकोच मरणाच्या दारांत असल्यासारखे सुतकी चेहेरे करून बसलां आहांत!' आपल्या पत्नीवर त्याचें किती प्रेम आहे, याची आम्हाला कल्पना नसती तर खात्रीने आम्ही त्याची दगडांत गणना केली असती. आणि त्यामुळेच त्याच्या या अभिनयाने आम्ही दिपून गेलों. आम्ही थोड्या वेळाने बाहेर पडलों आणि त्याचक्षणीं त्याने धाड्दिशीं दार लावून घेतलें. माझी खात्री आहे की इतका वेळ अतिप्रयासाने दाबून ठेवलेल्या अश्रूंना आमची पाठ फिरताक्षणींच त्याने वाट करून दिली असेल. पण त्याचा निग्रह मात्र अलौकिक खराच. संकटाच्या प्रसंगीं गडबडून गेले

असतांनासुद्धा धैर्याचा मुखवटा चेहेऱ्यावर चढविणें फार थोड्यांना साधतें. शोकप्रसंगीं तर सहानुभूतीच्या साध्या चार शब्दांनी आपल्या डोळ्यांतून गंगायमुना येऊं लागतात. अशा प्रसंगीं शांत व धीरोदात्त मुद्रा ठेवणाऱ्या व्यक्तीविषयी मला आतिशय कौतुक वाटतें. आणि मला तें कधींच जमत नाही. म्हणून त्यांच्याबद्दल मला थोडाफार हेवाहि वाटूं लागतो. संकटाचा लहानसा ढग जरी माझ्या मस्तकावर आला तरी माझा चेहेरा गोरामोरा होतो–प्रयत्न करूनहि माझ्या भावना मला लपवितां येत नाहींत. ज्यांना तें साधतें त्यांच्याविषयी त्यामुळे साहजिकच मला कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही.

दररोजच्या जीवनांत तर असे निरनिराळे मुखवटे चेहेऱ्यावर चढविण्याचे प्रसंग कितीतरी वेळां माणसावर येत असतात. अधिकाऱ्याने अपमान केला असतांनाहि लाचारीचें हास्य चेहेऱ्यावर ठेवणारे कारकून, एकमेकींच्याविषयी एकमेकींच्या मनांत संतापाचा ज्वालामुखी धुमसत असतांनाहि चेहेऱ्यावर हास्याचा मुखवटा चढवून एकमेकींशीं बोलणाऱ्या जावाजावा, तीव्र संतापाची ऊर्मि मनांतल्या मनांत दाबून चेहेऱ्यावर नम्र भाव धारण करून खाष्ट सासूपुढे काम करणाऱ्या सुना–एक ना दोन–जरा भोवताली नजर टाकली की राजकारणाच्या क्षेत्रापासून तों शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रापर्यंत जिकडेतिकडे खोटे मुखवटे चढविलेले चेहरे दिसतील. अभिनयसंपन्न नटाची भूमिका करण्याचा प्रसंग दिवसांतून कितीतरी वेळां माणसावर येत असतो.

चेहेऱ्याला मनाचा आरसा समजतात. पण तें कितपत खरें आहे याचा मात्र हे मुखवटे पाहतांना प्रश्न पडतो. आपल्या अंतःकरणांतील भावनांचें प्रतिबिंब चेहेऱ्यावर उमटूं न देण्याचाच प्रयत्न आजचा मानव अधिक करीत असतो. त्यामुळे माणसाच्या चेहेऱ्यावरून त्याच्या मनांतील भावना आपणाला आज कळतीलच असें नाही. त्याच्या चेहेऱ्यावर आपणाविषयी आदराची भावना दिसत असली तर मनांत आपणाविषयी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमे
अनुक्रम ७४५९ वि: निबंध
क्रमांक 2032 नों. दि: १७/३/७१


द्वेषाची भावना असण्याचा संभव अधिक. त्यामुळे आपलें जीवन अधिकच गुंतागुंतीचें झालें आहे. आपल्या भोवतालच्या माणसाची खऱ्या स्वरूपांत ओळख पटणें आपणाला अशक्य झालें आहे. 'दिसतें तसें नसतें,' ही म्हण आज यथार्थतेने माणसांच्या बाबतींत अधिक खरी ठरूं लागली आहे.

धूर्त व लबाड माणसांच्या बाबतींत तर हे मुखवटे फारच धोक्याचे ठरतात. त्यांच्या चेहेऱ्यावरील निष्पाप भावावर, सौजन्याच्या भावनेवर विश्वास ठेवणाऱ्या भोळ्या लोकांना अनेकदा, त्याबद्दल अद्दल घडली असेल. माझ्या ओळखीच्या एका गृहस्थाला त्यामुळे नौकरीला मुकण्याचा प्रसंग आला. त्यांच्या ऑफिसांतील एक गृहस्थ सतत त्यांच्याकडे येत असे, त्याच्याबद्दल आस्था, सहानुभूति दाखवीत असे, त्याच्यावर अन्याय झाला तर त्याबद्दल चीड व्यक्त करीत असे, अधिकाऱ्यांबद्दलच्या त्याच्या तक्रारी अगदी सहानुभूतिपूर्वक ऐकून घेत असे. त्यामुळे आपला अत्यंत जिव्हाळ्याचा मित्र म्हणून त्या गृहस्थांनी याला वागविण्यास सुरुवात केली आणि एक दिवस त्याच्या हातांत नोटीस पडली. कारण माझ्या त्या ओळखीच्या गृहस्थाची जागा आपणाला मिळावी म्हणून पद्धतशीर रीतीने तो गृहस्थ याच्या संभाषणांतील शब्द न् शब्द त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पोहोंचवीत असे. आणि इतके करून नोकरी गेल्याबद्दल सहानुभूति दाखविण्यास यावयालाहि या गृहस्थाने कमी केलें नाही. तेव्हा असे मुखवटे मोठे धोक्याचेच समजावयास हवेत. आयागोने स्नेहाचा मुखवटा घालूनच नाही का ऑथेल्लोच्या जीवनाचा विध्वंस केला? असे आयागो भोवतालच्या जीवनांत थोडे का असतात?

पण अशीं कांहीं उदाहरणें सोडून दिलीं तर आपल्या दररोजच्या जीवनांत या मुखवटयाचें महत्त्व आपणाला मान्यच करावें लागेल. मनांतील भावनावर ताबा ठेवणें, नियंत्रण ठेवणें जसें सुसंस्कृतीचें लक्षण आहे, त्याचप्रमाणे भावनाविष्कारावर ताबा ठेवणें हेंहि तितकेंच सुसंस्कृतीचें

लक्षण आहे. हरघडी आपल्या मनांतील भावना आपण चेहेऱ्यावर दाखवूं लागलों तर मोठा कठीण प्रसंग येईल. प्रा. चिं. वि. जोश्यांच्या चिमणरावांना स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग करतांना जो अनुभव झाला तो आपणाला सतत येऊं लागेल—आणि तो फारसा सुखदायक ठरणार नाहीं हें निश्चित.

पशूंमध्ये व मानवामध्ये हाच तर फरक आहे. संतापला की कुत्रा भुंकूं लागतो. मांजर फिसकारूं लागतें. बैल शिंगें रोखतो. नाग फणा उभारतो. पण रागावलेला माणूस अनेक वेळां हास्यमुद्रेने आपल्या प्रतिपक्षाचें स्वागत करतो. अंतःकरणांत संतोष असेल तर चेहेऱ्यावर कधी तो राग दाखवील. शोक असेल तर चेहेऱ्यावर गांभीर्य, कदाचित् हास्यहि दाखवील. भीतीची भावना मनांत असेल तर चेहेऱ्यावर बेडर वृत्ति दाखवील. आपल्या मनाचा ठाव लागूं न देणाऱ्याला आंतल्या गांठीचा असें म्हणण्याची पद्धत आहे. पण कमीअधिक प्रमाणांत प्रत्येकाला असा मुखवटा घ्यावा लागतोच, क्षणाक्षणाला आपल्या अंतःकरणांतील भावनांचें चेहेऱ्यावर प्रतिबिंब पाडणारा मनुष्य उथळ असतो आणि व्यवहारांतहि तो फारसा यशस्वी होतोच असें नाही. मग 'साधा भोळा' म्हणून त्याची तुम्ही स्तुति करा हवी तर.

म्हणून माणसाची व्याख्या करावयाची झाली तर मुखवटे घालणारा प्राणी अशी मी तरी करीन. मुखवटे कृत्रिम असतात. खऱ्या स्वरूपाची ते ओळख होऊं देत नाहीत. हें खरें असलें तरी अनेक वेळा हे मुखवटे त्यामागील अत्यंत कुरूप चेहेरा झाकून टाकतात हें तरी आपणाला मान्य करावयास हवें. आपल्या अन्तःकरणांतील अनिष्ट भावनांना हे मुखवटे असेच झाकून टाकतात आणि त्यामुळेच मानवास जीवन जगणें शक्य होतें.

नाही तर अनपेक्षित येऊन सिनेमाला जाण्याच्या आमच्या कार्यक्रमाचा विचका केल्याबद्दल बाळूला पाहतांच मीं कपाळाला आंठ्या घातल्या

असत्या तर त्याच्या व माझ्या मैत्रींत खंड तर पडला असताच, पण माणुसघाणा म्हणून माझी कीर्तिहि सगळीकडे झाली असती.

आपल्या जीवनांतील अनेक प्रसंग असे आठवून पाहा. तुम्हांला निश्चित आढळेल की आपल्या अंतःकरणांतील खऱ्या भावना आपण चेहेऱ्यावर त्या त्या प्रसंगीं व्यक्त केल्या असत्या तर नाही नाही त्या प्रसंगांना आपणांला तोंड द्यावें लागलें असतें. सतत खटके उडाले असते. स्वतःच्या पत्नीचाहि रोष अनेकदा तुम्हाला ओढवून घ्यावा लागला असता. थोडक्यांत तुम्हाला जीवन असह्य झालें असतें.

या सर्व प्रसंगांतून या खोट्या मुखवट्यांनी तुम्हाला वांचवलं आहे आणि आपण अभिनयकुशल नटाची भूमिका किती कुशलतेने करतों, याची तुम्हाला जाणीव झाली आहे.

'मानव म्हणजे खोटे मुखवटे धारण करणारा प्राणी' ही व्याख्या आता तरी मान्य होईल ना तुम्हाला?

• • •

'एक तारीख उजाडली म्हणजे आपणाला बुवा फार आनंद होतो.' माझे एक मित्र कॉमनरूममध्ये पगाराच्या नोटा मोजत व त्या खिशांत ठेवीत म्हणाले, 'आपण खूप श्रीमंत आहोंत असं या दिवशीं आपणाला वाटायला लागतं. चैन करण्याची, सिनेमाला जाण्याची इच्छा याच दिवशीं होते आणि एकंदर जगाकडे जरा उद्दामपणें पाहण्याइतकी बेफिकिरीहि खिसा गरम असल्याने या दिवशीं येते.'

'मला बुवा महिना अखेरीची तारीखच जास्त आवडते.' मीं त्याच्या विधानावर प्रतिविधान केलें. माझा मित्र आपल्या वक्तृत्वाचा ओघ आवरून माझ्याकडे पाहतच राहिला.

'महिना अखेरीची तारीख?' त्याने साश्चर्य माझ्याकडे पाहत मला विचारलें, 'ज्या दिवशीं आत्महत्या करावयाची म्हटली तरी अफूलाहि जवळ पैसा नसतो ती तारीख? कमालच आहे तुझ्या आवडीची.'

'कमाल आहे तर खरीच!' मीं म्हटलें, 'पण मला ही तारीख का आवडतें हें नाही विचारलेंस?'

'कांही तरी तुझें नेहमीचें तऱ्हेवाईक कारण असेल.' माझ्या मित्राने टीका केली. 'पण सांग तर खरं!'

'या तारखेला मी सगळ्यांत जास्त श्रीमंत असतों आणि म्हणून ती तारीख मला आवडते.' मी त्याला हें कारण सांगतांच त्याने हसायला सुरुवात केली.

'एकतीस तारखेला तूं श्रीमंत असतोस हें मला नव्हतं माहीत! पुढल्या एकतीस तारखेला मला तुझ्याकडे पैसे उसने मागायला यायला हवे!' तो म्हणाला.

'आणि मी ते देऊंहि शकणार नाहीं–पण असं पाहा, महिना अखेरीला आपण एकदा आपलं काम संपवलं की एकदम आपल्या महिन्याच्या पगाराने श्रीमंत होतों की नाहीं? त्या दिवशीं कॉलेजकडे आपले दोनशे रुपये येणें असतात. म्हणजे पर्यायाने आपण या दिवशीं धनको असतों आणि कॉलेज ऋणको असतें, नाही का? अरे, जन्मांत कधी आपण धनको बनण्याचा संभव नाही–पण तें समाधान तरी या दिवशीं मिळतें. नाही का? आणि एक तारीख तर मला बिलकूल आवडत नाही. आताच पाहाना. पगार मिळतांच चहाच्या क्लबचे, निरनिराळ्या मंडळांच्या वर्गणीचे मिळून दहा रुपये कापले गेले. घरीं जाईपर्यंत वाटेंतल्या व्यापाऱ्यांना पैसे वाटत वाटत त्यांतले निम्मे तरी शिल्लक राहतात की नाही देव जाणे. आणि घरीं गेल्यावर एक तारखेची वाट पाहत असलेल्या निरनिराळ्या गरजा पुढे येतात. मग सांग–आजच्यापेक्षा मी काल श्रीमंत होतों की नाही?'

माझ्या मित्राला हें कितपत पटलें कोण जाणे! कांही तरी पुटपुटत तो घंटा झाल्यामुळे तासावर निघून गेला. एक तारखेच्या पगाराच्या पैशांतून आणलेल्या सिगारेटचीं धूम्रवलयें सोडीत मीहि आरामखुर्चीवर पडून राहिलों.

आणि सिगारेटच्या वर्तुळाकार वलयाकडे पाहत असतांना माझ्या मनांत सहज आलें, 'खरंच, आपण वाद घेण्याकरिता म्हणून महिना अखेरीच्या तारखेची तरफदारी केली. पण खरोखरच त्या तारखेंत कांही तरी अद्भुत जादू आहे. विलक्षण आकर्षण आहे. नोकरदार वर्गाला तरी त्याचें विलोभन आहे.

पटणार नाही पुष्कळांना हें! महिना अखेरची तारीख म्हणजे अत्यंत ओढाताणीचा दिवस. मग त्यांत कसली आली आहे जादू? क्वचित अर्धपोटी काढाव्या लागणाऱ्या व आपल्या सर्व इच्छा मारून टाकणाऱ्या

या दिवसाविषयी मला किंवा एकंदर नोकरदार वर्गाला आकर्षण वाटावें म्हणजे मनुष्याला आजार प्रिय असावा, प्रिय व्यक्तीचा विरह आवडावा असें म्हणण्यासारखेंच आहे असें पुष्कळांना वाटेल. पण त्याचें असें पाहा–

मनुष्य हा नेहमी आशेवर जगत असतो ना? मग जो दिवस त्याच्या मनांत जास्तींत जास्त आशा निर्माण करील त्या दिवसाविषयी त्याला जिव्हाळा नको का वाटायला? कोणता दिवस मग जास्तींत जास्त आशा निर्माण करतो? पगाराचा? छे! पगाराच्या दिवशीं तो निम्माशिम्मा संपूनहि जातो. अन् मग पुढे काय? आता यापुढे तीस दिवस एक पैसाहि आपणाला नाही कुणाकडून मिळणार ही निराशा! पण महिना अखेरीच्या दिवशीं आपला आनंद निराळाच असतो. त्या दिवसाचें सगळें काम संपलें आहे, घरीं यायला आपण निघालों आहोंत, आता फक्त चोवीस तासांनी आपल्या खिशांत दोनशे रुपये असणार, या कल्पनेने मनाला गुदगुल्या नाही होत? एक तारखेला एकदा पगार मिळाल्यावर मग पुन्हा पगार आपणापासून एक महिना दूर जातो. महिना अखेरच्या दिवशीं तो दिवस उद्यावर–चोवीस तासांवर आलेला असतो. प्रत्यक्ष फलपूर्तीच्या आनंदापेक्षा फलपूर्तीच्या आशा करीत त्या क्षणाच्या जवळ जवळ जाण्याचा आनंद अधिक असतो, नाही का?

आणि महिना अखेरच्या दिवशीं आपण जी स्वप्नसृष्टि उभारतों ती मोहक नसते असें कोण म्हणेल? आपला उद्या पगार होणार–उद्या आपणाला दोनशें रुपये मिळणार. ही कल्पनाच अगोदर सुखद असते. पण त्याहिपेक्षा ते मिळाल्यावर आपण ते कसे खर्च करणार, याचीं चित्रें काढतांना नव्या नव्या योजनांची स्वप्नसृष्टि उभारतांना आपला वेळ किती मजेंत जातो याची कल्पनाच येणार नाही कुणाला. मला एका दुकानांतलं सुटाचं कापड फार आवडलं आहे. उद्या पगार झाला की तें घेऊन शिंप्याकडे त्याचा सूट करायला टाकायचाच असा मी प्रत्येक महिना अखेरच्या दिवशीं निश्चय करतों. माझ्या पत्नीला अत्यंत आवडलेलें,

पण या ना त्या कारणामुळे घेण्याचें पुढे ढकललें गेलेलें पातळ उद्या घ्यायचेंच असाहि मी त्या दिवशीं निश्चय करतों. बेवारशी मुलांप्रमाणेच इतस्ततः विखुरलेल्या पुस्तकांची कपाटांची मागणीहि माझ्या चटकन नजरेसमोर येते अन् मी ठरवतों, ‘ छे ! उद्या पगार झाला की, सुताराकडे जाऊन कपाटाची ऑर्डर द्यायचीच.’ अन् हे सर्व निश्चय करतांना अननुभूत आनंद माझ्या मनाला होत असतो. त्या नव्या कापडाचा सूट माझ्या शरीरावर असलेला मला स्वप्नसृष्टींत दिसतो. माझ्या पत्नीचा, आवडतें पातळ मिळाल्यामुळे आनंदाने फुलून गेलेला चेहेरा माझ्या दृष्टीसमोर तरळतो. माझ्या अभ्यासाच्या खोलींतील सर्व पुस्तकें अगदी व्यवस्थित एका सुंदर कपाटामध्ये बसलीं असल्याचें दृश्य माझ्या डोळ्यां-समोरून जाऊं लागतें.

आणि दुसरे दिवशीं पगार मिळाल्यावर यापैकी मी कांही करीत नाही. पगारांच्या नोटा हातीं पडल्याबरोबर वाण्याचीं बिलं, डॉक्टरांचीं बिलं, क्लब्स्, सर्कल, उत्सवादींच्या वर्गण्या इत्यादींच्या रूपाने अनेक आंकडे माझ्यासमोर थैमान घालूं लागतात. तें सूटचें कापड, तें पातळ, तें कपाट या सर्व मनाच्या मागच्या कप्प्यांत ज्या पार लुप्त होतात त्या थेट दुसऱ्या महिना अखेरपर्यंत. अपेक्षाभंगाचा इतका तीव्र धक्का एक तारखेइतकी कोणतीच तारीख देत नाही आणि म्हणून मला त्या तारखेचा फार राग येतो. ‘ दुरून डोंगर साजरे ’ ही म्हण यथार्थतेने एक तारखेइतकी दुसऱ्या कोणत्याहि दिवसाला लागूं पडेल असें वाटत नाही. एखादी गोष्ट आपणापासून दूर आहे तोंपर्यंतच आपणाला तिचें आकर्षण वाटत असतें. ती प्राप्त झाली की तिच्यांतील सर्व काव्य नाहीसें होतें. हा जगाचा सर्वसामान्य अनुभव एक तारखेलाहि लागूं नाही काय ?

मला महिनाअखेर आणखीहि एका कारणासाठी आवडते. आपल्या जीवनांत अत्यावश्यक गोष्टी कोणत्या व अनावश्यक गोष्टी कोणत्या याची शिकवण महिनाअखेरचा दिवस देत असतो. त्या दिवशीं सिगरेट

ओढणें म्हणजे भयंकर व्यसन आहे, असें मला वाटूं लागते. बसने कॉलेजाला जाण्यापेक्षा पायीं जाण्यांत व्यायामहि होतो व भूकहि चांगली लागते हा शोध मला त्या दिवशीं लागतो. चहा फक्त सकाळीं एक वेळां घेतला तरी पुरतो, दोनदा घेण्याची गरज नाही हेंहि मी माझ्या मनाला याच वेळी बजावतो. हॉटेलवरून जात असतां हॉटेल-मधील पदार्थ किती गलिच्छ असतात याबद्दलचीं वर्णनें मला आठवूं लागतात. एखाद्या नव्या बोलपटाची जाहिरात दिसली तर त्या बोलपटा-विषयी वर्तमानपत्रांत आलेली प्रतिकूल टीका एकदम माझ्या नजरेसमोर येते. असे एक ना दोन! पगार झाल्यानंतर ज्या गोष्टींचा मी पहिल्या चार पांच दिवस अतिरेक करतों त्या सर्व मला अगदी अनावश्यक व वाईट अशा वाटूं लागतात. पण केवळ मलाच नव्हे तर माझ्या पत्नीलाहि या दिवशीं अनेक शोध लागतात.

मी बसने न जातां चालत जाणार हें कळल्यावर ट्रंकेंतील पातळाच्या घडींत असलेल्या पैशाचा तिला शोध लागतो तो याच दिवशीं! बाजारांतून भाजी आणली नाही तरी घरांतील कडधान्यावर भागवून घेतां येत असल्याचा शोधहि लागतो तो याच दिवशीं! सारखं हें आणा, तें आणा असं सांगून नवऱ्याला सतावूं नये ही नवी जाणीव तिच्या मनांत निर्माण होते ती याच दिवशीं! आणि म्हणून मी तरी या दिवसावर बेहद्द खूष आहे.

महिना अखेरीचा दिवस कुटुंबांतील घटकांना निःस्वार्थी बनवून जवळ जवळ आणण्याचें कार्य करतो असें म्हटलें तर पुष्कळांना आश्चर्य वाटेल. पण तसें होतें हें अमान्य करून चालायचें नाही. मधल्या वेळेला खावयास केलें तर आपल्या मुलांना भरपूर मिळावें म्हणून पोट बरोबर नसल्याची सबब याच दिवशीं आईबापांना सुचत नाही काय? 'भाजी पातेल्यांत पुष्कळ आहे. तुम्ही भरपूर घ्या.' असें म्हणून पातेलें पतीच्या नजरेपासून लपवून ठेवणारी गृहिणी याच दिवशीं आपणाला

दिसेल व हट्टाने तें पातेलें पाहण्याचा आग्रह धरून भाजी पानांत ठेवणारा पतिहि याच दिवशीं दिसेल. एखाद्या वेळीं या दिवशीं घरांत अनेक आवश्यक वस्तु नसतात. पण त्यांच्या अभावाची झळ मोठ्या आनंदाने सोसण्याची शिकवण हाच दिवस आपणाला देतो. मला आठवतें, किती तरी वर्षांपूर्वी पुण्याला असतांना या महिना अखेरच्या दिवशीं आमच्या घरांत चहा अजीबात नव्हता. उसनें मागावयाचें नाही हा आमचा दोघांचा बाणा. चहाची संवय तर विलक्षण! शेवटीं आदल्या दिवशीं फेकून देण्याकरिता कोपऱ्यांत टाकलेला चहाचा चोथा आम्हीं परत उकळवला व तें पेय मिटक्या मारीत प्राशन केलें. त्या चहांत आम्हाला जी गोडी मिळाली तशी अद्याप कोणत्याच चहांत आम्हाला मिळाली नसेल.

असा असतो महिना अखेरीचा दिवस! दुसऱ्या दिवशींच्या पगाराची गोड धुंदी याच दिवशीं आपणावर येऊं लागते. त्या चोवीस तासांनी मिळणाऱ्या पगारांत आपण जणूं सर्व सृष्टिच विकत घेण्याचीं स्वप्नें रचीत असतों. मनांतील अतृप्त इच्छा पूर्ण करून घेत असतों. नव्या नव्या आनंदाचा उपभोगहि घेत असतों. आणि हें सर्व कुठें? तर घरीं इझिचेअरवर बसून!

नाही तर एक तारखेला पगार घेऊन येताहेत आपले घरीं, जातात आपले बाजारांत सामानाची लांबलचक यादी घेऊन आणि वाटताहेत आपला पगार सर्व दुकानदारांना आणि देणेकऱ्यांना. अशी ही एक तारीख ज्यांना आवडेल ती आवडो. मी आपला महिनाअखेरीची तारीख पसंत करीन.

• • •

## ५ : विघ्नसंतोषी माणसें

'ए सायकल, खडे रहो.' रात्रीं दोनच्या अंधारांत जानेवारीच्या गारठ्याने कुडकुडत मी रास्तापेठेच्या वळणावर सायकल वळवली असतां एकदम माझ्या कानावर वरील शब्द येऊन आदळले. आतिशय चिडलेल्या मनःस्थितींत मी सायकलचा ब्रेक दाबला अन् खाली उतरलों.

एरवीं 'ए सायकल, खडे रहो' या शब्दांची मीं बिलकूल पर्वा केली नसती किंवा त्यांनी चिडूनहि गेलों नसतों. पण माझ्या त्या चिडखोर मनोवृत्तीच्या मागे अशीच विशेष कारणपरंपरा होती.

मुंबईहून त्या दिवशीं मीं ५-२० च्या पूना-मेलने निघालों होतों. रात्रीं ९-९॥ पर्यंत घरीं पोहोंचूं या कल्पनेने मी पोटांत ओरडणाऱ्या कावळ्याकडे विशेष लक्ष दिलें नव्हतें किंवा हवेंत पडलेल्या गारठ्याचीहि विशेष फिकीर केली नव्हती. पण नेमकी त्याच दिवशीं खडकीच्या अलीकडे मालगाडीचा एक डबा रूळावरून घसरल्याने गाडी चार तास देहूरोडला खडी होती. त्यामुळे रात्रीं दीडला पुणें स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर मी पाऊल टाकलें तें चिडलेल्या मनःस्थितींतच! निदान आता तरी लवकर घरीं जाऊन कांही तरी खाऊन गरम रग अंगावर घेत निद्रेच्या आधीन होऊं अशीं स्वप्नें मनाशीं बाळगीतच मी स्टेशनच्या सायकल स्टँडवरून सायकल बाहेर काढली आणि अतिशय वेगाने मार्ग आक्रमूं लागलों. रास्तापेठेच्या वळणावर मध्ये एक खांब होता. वास्तविक दिवसा नेहमी त्याला प्रदक्षिणा घालून जात असें मी! पण आज सबंध रस्ता निर्जन होता—म्हणून बेफिकीरपणें तशीच उजव्या बाजूने मीं सायकल

घेतली. आणि तितक्यांत कानावर शब्द येऊन आदळले, "ए सायकल, खडे रहो."

सायकलवरून खाली उतरतांच डगला घातलेली एक पोलिसची आकृति माझ्या रोखाने येतांना मला दिसली. जवळ येऊन त्या पोलिसाने माझ्या सायकलचें हँड्ल् धरलें.

"काय राव, त्या खांबाच्या डाव्या बाजूने सायकल मारायची ठाऊक नाही वाटतं?" त्याने विचारलें, "चक्क उजव्या साइडीने सायकल नेताय्—कायदाबियदा कांही माहीत आहे का?"

"अहो पण—" मी त्याला सांगूं लागलों, "रस्त्यावर आता चिटपांखरूं तरी आहे का? रस्त्यावर रहदारी असतांना अपघात होऊं नये म्हणून या खांबाच्या डाव्या बाजूने सायकल नेणें ठीक आहे—"

"हें पहा—त्या गोष्टी मला शिकवूं नका." तो पोलिस उर्मटपणाने म्हणाला, "डाव्या बाजूने जाण्याचा कायदा करणारे मूर्ख, अन् तुम्हीच तेवढे शहाणे होय? कायदा मोडतां ते मोडतां, अन् मला वर गोष्टी शिकवतां?"

"पण कायदे तरी लोकांच्या सोयीकरितांच केले आहेत ना?" मीं जरा चिडून म्हटलें, "रात्रीं सारा रस्ता रिकामा असतांना सायकलने डाव्याच बाजूने जायला पाहिजे असा तुमचा अट्टाहास कां? तुम्ही तरी पब्लिकची सोय पाहायला नको का!"

"पब्लिक् बिब्लिक्च्या गप्पा, राव, मला सांगूं नका." तो पोलिस म्हणाला, "चला आतां माझ्या बरोबर फरासखान्यांत अन् तिथे इन्स्पेक्टरसमोर करा या गप्पा."

फरासखान्यांत जाऊन कांही होणार नाही हें वास्तविक मला माहीत होतें—पण विलक्षण थंडी आणि पोटांत ओरडणारे कावळे यामुळे मी 'पोलिसांशीं हुजत घालण्याचा कधीहि प्रयत्न करूं नये' हें साधें तत्त्व विसरलों

व चिडून त्याच्याशीं वादविवाद करायला सुरुवात केली. पंचवीस मिनिटें आमची शाब्दिक झटापट चालली होती. तो पोलिस मला फरासखान्यांत नेण्याचा अट्टाहास सोडीना—मी माझें नांव देत असतांना तें नांव खोटें असलें पाहिजे या सबबीवर तें उतरून घेण्यास तयार होईना. आणि तो जसजसा कायद्याची जास्त जास्त भीति दाखवूं लागला व गारठ्याने मी कांकडून गेलों असतांना सुद्धा फरासखान्यांत नेण्याची भाषा जास्त जोरांत बोलूं लागला तसतसा माझ्या जिभेवरचा ताबाहि हळू हळू सुटूं लागला. या शाब्दिक झटापटीचा परिणाम शेवटीं काय झाला असता हें सांगणें कठीण आहे—पण तेवढ्यांत पूना—मेलने प्रवास करणारे दोन सायकल-स्वार तेथे आले—आमची चाललेली हुजत पाहून खाली उतरले अन् शेवटीं कसं तरी ' दादाबाबा ' करून त्यांनी त्या पोलिसाला शांत केलें.

" हीं भलीं माणसं आलीं म्हणून—नाही तर राव दाखवला असता तुम्हाला इंगा ! " पोलिस मिशीवर ताव देत म्हणाला, " कायद्याची भाषा माझ्याजवळ करतां होय ? "

मी कांहीच उत्तर न देतां सायकलवर टांग टाकली. ते दोघे सायकल-स्वार माझ्या बरोबर होतेच.

" चुकलां तुम्ही मिस्टर. " त्यांपैकी एकजण म्हणाला, " पोलिसाशीं वाद घालण्याच्या कधीं भरीला पडूं नये ! अहो, मनांत आणलं असतं तर खरोखर फरासखान्यांत नेऊन तुमचे एक दोन तास त्याने खाल्ले असते. "

" विघ्नसंतोषी असला पाहिजे लेकाचा. " दुसरा म्हणाला, " स्वतः थंडींत कुडकुडत होता म्हणून आपल्याबरोबर दुसऱ्यानेहि थंडींत कुड-कुडावें ही इच्छा ! नाहीतर बाब ती किती क्षुल्लक आणि त्याचा बाऊ केला केवढा ! "

त्या दुसऱ्या माणसाच्या बोलण्याचा विचार करीतच मी मार्ग आक्रमूं लागलों. विघ्नसंतोषीच नाही तर काय ? स्वतःला थंडींत काकडत फिरावें

लागतें याचा राग कुणाहि तावडींत सांपडलेल्यावर काढावयाचा—आणि त्यांतच असुरी समाधान मानावयाचें या वृत्तीला दुसरें कोणतें नांव देणार? त्या पोलिसाच्या मनोवृत्तीच्या मुळाशीं हेंच कारण असावें हें निश्चित! मला सायकलवरून वळतांना पाह्यल्यावर त्याच्या मनांत बहुधा विचार आला असेल, ' काय न्याय आहे पाहा! हा गृहस्थ पांच मिनिटांनी घरीं जाऊन पांघरुणांत गुरफटून झोपणार—आणि मला या ठिकाणीं सबंध रात्रभर कुडकुडत पहारा करावा लागणार! या माणसाला आपल्याबरोबर थोडंसं थंडींत कुडकुडायला लावलं तर काय बहार होईल?" आणि माझ्या बाबतींत सुदैवाने त्याला चांगलें कारणहि मिळालें!

पण त्या पोलिसाचेंच उदाहरण कशाला? आपल्या आजुबाजूच्या जगाचें आपण जर सूक्ष्म निरीक्षण केलें तर अशा विघ्नसंतोषी माणसाचे किती तरी नमुने आपल्याला आढळतील! त्यांतील कांही माणसं परिस्थितीने तशी बनलेलीं असतात—कांहींची मूळ मनोवृत्तीच विकृत असते. एखाद्या माणसाला दुर्दैवाचे तडाखे सारखे सहन करावे लागले तर साहजिक तो जगावर चिडतो आणि दुसऱ्याचा उत्कर्ष त्याला पाहवत नाही. आपल्याच वेळीं दैवाचे फांसे उलटे पडावेत आणि इतरांच्या वेळेला मात्र दैवाने अगदी सढळ हाताने दान द्यावें या विषमतेची त्याला चीड येते. अशा वेळीं अशा उत्कर्षाच्या मार्गावर असणाऱ्या व्यक्तींचा तो द्वेष करूं लागतो—व त्याच्या मार्गांत निदान कांटे पेरतां आले तर पहावे या दृष्टीने तो खटपट करीत असतो. यांत त्याचा स्वतःचा फायदा कांहीच नसतो—पण निदान आपल्यासारखा दुःखाच्या भोवऱ्यांत तो सांपडला आहे हें समाधान त्यांना पुष्कळ असतें. दुसऱ्या वर्गांतील व्यक्तींना दुर्दैवाचे तडाखे बसलेले असोत वा नसोत, किंवा त्यांच्या बाबतींत दैव कितीही सढळ हाताने दान देवो, त्यांना दुसऱ्यांचा उत्कर्षच सहन होत नाही. आपला कांही फायदा होत नसला तरी दुसऱ्याचा कांही तोटा करतां आला तर ते स्वतःला धन्य समजतील. दुसऱ्याची आपत्ति हेंच

त्यांचें आनंदाचें स्थान, दुसऱ्याचें नुकसान हा त्यांचा फायदा, दुसऱ्याचा अपमान हा त्यांचा मान, अशी विचित्र मनोवृत्ति अशा माणसांची असते. अर्थात् ते या भावना उघड करून दाखवतील असं मात्र समजूं नका. अभिनयकलेंत तर ते पक्के मुरलेले असतात. दुसऱ्याचें नुकसान झालें तर ते असें दाखवतील की, त्यांच्या इतकें दुःख कुणाला झालें नाही. पण मनांत मात्र यांच्या इतका आनंद कुणालाच झाला नसेल.

अशा विघ्नसंतोषी लोकांना कारण नसतांना व आपला बिलकूल फायदा नसतांना दुसऱ्याच्या कार्यांत विघ्नें आणण्यांत, दुसऱ्याच्या यशाला काळिमा फासण्यांत किंवा दुसऱ्याच्या उत्कर्षावर व सुखी संसारावर निखारे ठेवण्यांत मोठा विलक्षण आनंद वाटत असतो. जीवनाच्या प्रत्येक प्रान्तांत असे लोक पदोपदीं दिसून येतील आपणाला.

परवाच्याच मुंबईच्या प्रवासांत अशी एक व्यक्ति मला दिसली. गाडीला त्या दिवशीं खूप गर्दी होती. मुंबईला तिकिटविक्री बंद झाली होती. त्यामुळे कित्येक प्रवासी तिकिटाशिवायच गाडींत चढले होते. माझ्या पलीकडे एक बाक सोडून एक मजूर बसलेला होता. त्याच्याजवळ तिकिट नव्हतें–आणि ही गोष्ट डब्यांतील जवळजवळ प्रत्येक व्यक्तीला माहीत होती. बिचारा अगदीच गरीब दिसत असल्याने डब्याच्या त्या भागांत बसलेल्या सर्वांनी त्याला साहाय्य करण्याचें ठरविलें. शेजारच्या डब्यांत तिकिटचेकर आल्याचें कळतांच लोकांनी त्याला दोन बाकांच्यामध्ये निजवलें अन् सगळे लोक अशा दाटीवाटीने व अशा रीतीने पाय ठेवून बसले कीं तो तिकिटचेकरला बिलकूल दिसूं नये. तिकिटचेकर आला– त्याने सर्व डब्याचें चेकिंग केलें व तो पुढल्या डब्यांत जाणार तोंच एक सूट बूट घातलेला खप्पड चेहेऱ्याचा काळाकभिन्न गृहस्थ उठला अन् त्या चेकरला म्हणाला, "Look here, there's one man travelling without ticket in this compartment." (हें पाहा, या डब्यांत तिकिटाशिवाय एक आदमी प्रवास करीत आहे.) त्याबरोबर चेकर पुन्हा

मागे वळला. त्या मजुराजवळ तिकिटापुरते पुरेसे पैसे नसल्याने त्याला पुढच्याच स्टेशनवर उतरावें लागलें. पण त्या गांवठी साहेबाला मात्र पुढील प्रवास असह्य झाला. पण निलाजरेपणाने तो प्राणी पुन्हा पुन्हा म्हणत होताच, "कांही झालं तरी मीं माझं कर्तव्य केलं ऽ!" लोकांनी उपरोधपूर्ण बोलून त्याचे वाभाडे काढले तरी त्या प्राण्याला मात्र त्याचें कांहीच वाटत नव्हतें.

दुसरे असेच एक शिष्ट मला आठवतात. वाचनमंदिराचा तो वर्गणीदार होता. असाच विघ्नसंतोषी. त्या वाचनमंदिरांत तीन चार दिवस एक इसम वर्तमानपत्रें वाचावयास येत असलेला त्याला दिसला—त्यांनी आसपासच्या लोकांजवळ तो वर्गणीदार आहे कीं नाही याबाबत चौकशी केली. दोघांतिघांना त्याची माहिती होती. या गृहस्थाचा उद्देश न समजून त्यांनी सांगितलं की तो एक दरिद्री व बेकार गृहस्थ होता व wanted च्या जाहिराती पाहण्यासाठी दहा पंधरा मिनिटें तो वाचनमंदिरांत येत असतो. झालंऽ. या माहितीच्या जोरावर त्यांनी पांचव्याच दिवशीं सेक्रेटरीकडे 'वर्गणी न देतां एक गृहस्थ आज पांच दिवस सतत वाचनमंदिरांत' येत असल्याबद्दल तक्रार केली. सेक्रेटरीने त्याची समजूत घालायचा प्रयत्न केला. त्यालाहि त्या गृहस्थाच्या परिस्थितीची थोडी कल्पना होती. त्याबरोबर या शिष्टांनी एकदम 'वाचनमंदिरा' च्या नियमाकडे बोट दाखविलें व हें 'मोफत वाचनालय' नसल्याची सेक्रेटरीला जाणीव करून दिली. त्या गृहस्थाला वाचनमंदिरांतून घालवलें नाही तर आपण अध्यक्षाकडे लेखी तक्रार करूं असाहि दम भरायला त्यांनी कमी केलें नाही. तेव्हा सेक्रेटरीचा अगदी नाइलाज झाला व त्या शिष्टासमोर त्याने त्या गृहस्थाला बोलावून सौम्य शब्दांत वाचनमंदिराचा नियम सांगितला. पण तेवढ्याने या गृहस्थाचें कुठलें समाधान व्हायला? "हें काय मोफत वाचनालय समजलांत होय?" तो त्या गृहस्थाला म्हणाला, "पुन्हा वाचनमंदिरांत फुकट शिरला तर पोलिसाच्या ताब्यांत देऊं!

सगळ्या गोष्टी यांना फुकट पाहिजेत म्हणे ! बापाचाच माल की नाही!" त्यांच्या या उर्मट भाषणाची त्या सेक्रेटरीला फार चीड आली—उपरोधपूर्ण शब्दांत त्याने त्यांची कानउघडणीहि पुष्कळ केली! पण तो उपरोध त्यांना कुठला समजायला ? "आपलें कर्तव्य" केल्याच्या उच्च आनंदांतच ते मग्न होते. त्या माणसाला वाचनमंदिरांत येण्याला बंदी करून त्यांनी कोणता लाभ साधला हें त्यांचें त्यांनाच माहीत !

पण पूर्ण अपरिचित माणसांच्या मार्गांत अशीं विघ्नें आणणारे लोक फार कमी. ज्यांची आपणाला कांहीच माहिती नाही अशा माणसांच्या कारभाराकडे लक्ष देण्याची माणसाची विशेष प्रवृत्ति नसते. विघ्नसंतोषी माणसें 'परिचित' व्यक्तींचेच काळ असतात. मग त्या माणसाचा परिचय ओझरता असो, दाट असो किंवा समव्यवसायामुळे झालेला असो. आपल्या सभोवतालच्या परिचित व्यक्तींच्या सुभाग्याचा अशा माणसांना हेवा वाटत असतो—त्यांना लॉटरींत बक्षीस मिळालें की यांच्या पोटांत दुखूं लागतें—त्यांचा धंदा तेजींत चालला असला की यांच्या छातींत कळा येऊं लागतात. त्यांना व्यापारांत ठोकर बसल्याचें कळलें की यांना पुत्र-जन्मोत्सवाचा आनंद वाटूं लागतो. कित्येक वेळां तर त्यांच्या मार्गांत विघ्नें यावींत, त्यांचा लौकिक कमी व्हावा, त्यांच्यावर कोणती ना कोणती तरी आपत्ति कोसळावी म्हणून यांचे गुप्तपणें प्रयत्न चाललेले असतात आणि त्यांचीं साधनें तरी किती तरी प्रकारचीं असतात. 'निनांवीं पत्रें,' 'कान भरविणें', 'खोडसाळ प्रचार करणें', 'निंदा करणें' अशा कितीतरी साधनांचें साहाय्य घेऊन ते आपलें कार्य साधण्याचा प्रयत्न करीत असतात.

केवळ व्यापारांत किंवा नोकरींतच अशा विघ्नसंतोषी माणसांची करामत दिसून येते असें नाही—तर 'लग्न—प्रेम' इत्यादि नाजुक बाबतींत सुद्धा ते आपला पराक्रम दाखवतात. 'निनांवी पत्रें' हें या बाबतींत त्यांचें

प्रभावी साधन ! या उपद्व्यापी लोकांनीं कितीतरी ठरलेले विवाह मोडल्याचे माझ्या ऐकिवांत आहेत. एके ठिकाणीं लग्न दोन दिवसांवर आलें असतांना वरपित्याला एक निनांवी पत्र आलें. त्यांत त्याने पृच्छा केली होती, "मुलीच्या मामे बहिणीने पुनर्विवाह केला हें आपणाला माहीत आहे का ?" आणि तो वरपिता कट्टर सनातनी असल्याने त्याने दोन दिवसांवर आलेलें तें लग्न मोडून टाकलें. दुसऱ्या एका विवाहाच्या अगोदर एक दिवस नवऱ्या मुलाला निनांवी पत्र आलें. त्यांत त्याने पृच्छा केली होती. "मुलीच्या पूर्वचारित्र्याची आपण पूर्ण चौकशी केलीत का ?" तो नवरा मुलगा बराच विचारी होता व त्याने त्या निनांवी पत्राला केराची टोपली दाखवली म्हणून ठीक–नाहीं तर तें लग्न मोडावयास फारसा विलंब लागला नसता. तिसऱ्या एका ठिकाणीं एका विघ्नसंतोषी माणसाने गंमतच केली. लग्नाच्या याद्या वगैरे झाल्यावर तो वधूपित्याकडे गेला. वधूपित्याची व त्याची अजीबात ओळख नव्हती. नमस्कार चमत्कार वगैरे झाल्यावर त्या गृहस्थाने म्हटलें, "आपली अन् माझी प्रत्यक्ष ओळख नाही. पण आपल्या मुलीचं ××× च्या मुलाशीं लग्न ठरल्याचं ऐकलं तें खरं का ?"

"हो खरं आहे !" वधूपित्याने जरा आश्चर्याने म्हटलें. या गृहस्थाच्या चौकशीचा रोख त्याच्या लक्षांत आला नव्हता, "कालच याद्या वगैरे होऊन तिथिनिश्चिय सुद्धा ठरला."

"पण आपण त्या मुलासंबंधी नीट चौकशी केलीत का ?" त्याने विचारलें, "त्या मुलाच्या प्रकृतींत गंभीर दोष आहे हें आपल्याला माहीत आहे का ? आपल्या मुलीच्या हिताच्या दृष्टीने मी बोलतों आहें–माफ करा."

"पण आपणाला ही माहिती कुठून कळली ?" त्या वधूपित्याने विचारलें.

"हें पाहा–अशी माहिती कुठून कळली हें विचारूं नये." तो गृहस्थ म्हणाला, "तुम्हांला जागं करावं या उद्देशाने मी आलों होतों–या माहितीचा तुम्हांला काय उपयोग करून घ्यायचा तो घ्या!"

"बरं, पण आपलं नांव कळेल का?" वधूपित्याने विचारलें.

"मला वाटतं नांवाशीं कांहीच कर्तव्य नाही. तुम्हांला आपली हिताची गोष्ट म्हणून सांगितली. ठीक आहे. नमस्कार." असें म्हणून तो गृहस्थ निघून गेला. वधूपित्याने पुढे बारकाईने चौकशी केली. मुलामध्ये तसा कोणताच दोष त्याला आढळला नाही. एक दोष मात्र होता. तो म्हणजे वधूपित्याला माहिती सांगायला आलेल्या गृहस्थाची मुलगी त्याने नाकारली होती.

केवळ विवाहांतच नव्हे–तर प्रेमांत देखील विघ्न आणण्याचें पवित्र कार्य अशीं माणसें करीत असतात. एखाद्या तरुण-तरुणीचें एकमेकांवर प्रेम बसल्याचें कळलें की, त्यांच्या हृदयाचा जळफळाट सुरू होतो. वास्तविक तसा त्यांच्या हृदयाचा जळफळाट होऊन कांही उपयोग नसतो. त्या तरुण-तरुणीचें बिनसलें तरी त्या तरुणीच्या प्रेमाचा ओघ आपणाकडे वाहणार नाही, अशी त्यांची खात्री असते. तरी पण त्यांच्या प्रेमांत विघ्नें आणण्यांत त्यांना अपरिमित आनंद होत असतो. त्याकरितां ते मुलाच्या बापाला किंवा मुलीच्या बापाला अप्रत्यक्षपणें भेटतील, त्या तरुणाला किंवा तरुणीला निनांवी पत्रें पाठवून त्यांचीं मनें एकमेकांविषयी कलुषित करण्याचा प्रयत्न करतील. किंबहुना त्यांच्या प्रेमाची परिणति विवाहांत होऊं नये म्हणून 'आकाश-पाताळ' एक करतील. तीं तरुण-तरुणी सुविद्य व विचारी असतील तर ती या विघ्नसंतोषी माणसांच्या भुंकण्याकडे यत्किंचितहि लक्ष देणार नाहीत. पण कांही कांही वेळां मात्र त्या विघ्नसंतोषी माणसाला दुर्दैवाने यश येतें. अशा वेळीं मात्र त्या तरुणीने त्यांच्याशीं विवाह केल्याइतका आनंद त्यांना होत असेल यांत शंका नाही. मी कॉलेजांत असतांना असाच एक प्रकार

झाल्याचें मला माहीत आहे. एफ्. वाय्. मधील एका सुंदर मुलीचें प्रेम बी. ए. मध्ये असणाऱ्या एका क्रिकेटच्या खेळाडूवर बसलें होतें. दोघेंहि एकमेकांना अनुरूप होतीं आणि त्यांचें एकमेकांवरील प्रेम हें कॉलेजांतील उघड 'गुपित' झालें होतें. पण एफ्. वाय्. चें वर्ष संपलें आणि ती मुलगी 'इंटर' ला एकदम मुंबईला गेली. वास्तविक तिचे वडील पुण्यालाच राहत असत व त्यांचा बंगला डेक्कन जिमखान्यावर असल्याने फर्ग्युसन कॉलेजला नजीक होता. अशा स्थितींत कांही कारण नसतां एकदम त्या मुलीची उचलबांगडी शिक्षणासाठी मुंबईला होण्यांत कोणा तरी विघ्न-संतोषी माणसाचा हात असला पाहिजे हें उघड होतें. त्या दोन प्रेमी युग्मांच्यामध्ये येऊन त्या बिचाऱ्या माणसाला काय लाभ झाला तो त्याचा तोच जाणे.

आपल्या नोकरीच्या मार्गावर देखील असे किती चहाडखोर आपलं कल्याण करण्याच्या इच्छेने बसलेले असतात. वरिष्ठाच्या कानाशीं लागून चहाडी करणें, कुणाला अधिकाराची जागा मिळत असेल तर त्याच्या मार्गांत विघ्नें आणणें, कुणाला चांगली नोकरी मिळत असेल तर त्याच्या त्या नोकरीच्या आड या ना त्या प्रकाराने येणें हेंच त्यांचें जीवितकार्य! अर्थात् हें कार्य करतांना कांहीं वेळेला स्वार्थ त्यांच्या नजरेसमोर असतो, तर कांही वेळेला निःस्वार्थी बुद्धीने हें कार्य करीत असतात. माझा एक मित्र एका शाळेंत शिक्षक होता. त्या शाळेंत असिस्टंट सुपरिंटेंडेंटची जागा एकदा रिकामी झाली आणि सीनियर म्हणून व कार्यक्षम म्हणून माझ्या त्या मित्रालाच जागा मिळणार याबद्दल कुणालाच शंका वाटत नव्हती. पण नेमणूक झाली त्या वेळीं सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. कारण त्याच्यापेक्षा पुष्कळच नंतर शाळेंत आलेला व शिकवितां येत नाही म्हणून विद्यार्थ्यांच्या चेष्टेचा विषय झालेला असा शिक्षक असिस्टंट सुपरिंटेंडेंटच्या खुर्चीवर बसलेला दिसला. त्या साऱ्या प्रकारचें कारण नंतर कळलें. या शिक्षकाचे एक नातेवाईक शाळेच्या अॅड-

व्हायसरी बोर्डमध्ये होते. त्यांनी माझ्या मित्राच्या विरुद्ध खोट्या कागाळ्या बोर्डाच्या सभासदांमध्ये पसरविण्यास सुरुवात केली आणि त्याबरोबर आपल्या नातेवाइकाचें गुणवर्णनहि चालू ठेवलें. बोर्डाच्या मीटिंगच्या वेळीं सुपरिंटेंडेंटनी माझ्या मित्राची बाजू पुढे मांडण्याचा खूपच प्रयत्न केला. पण जिथे सर्व बोर्डच उलटलेलें, तिथे तो एकटा काय करणार? अशा रीतीने ज्याचें जन्मांत तोंड पाहिलें नाही अशा एका गृहस्थाने माझ्या मित्राचा दावा साधला.

पण या प्रकारांत त्याचा थोडा स्वार्थ तरी होता; पण दुसऱ्या एका प्रकारांत कुणाचा कांहीच फायदा नसतां कांही तरी खोटीच गोष्ट उठवून माझ्या एका मित्राला कुणी तरी गोत्यांत आणण्याचा प्रयत्न केलेला मला माहीत आहे. तो त्या वर्षीं मॅट्रिकला परीक्षक होता. त्याच्याकडे पेपर्स आले व तो तपासायला सुरुवात करतो न करतो तोंच रजिष्ट्रारची तार आली. 'Stop examining papers and see me at once.' (पेपर तपासण्याचें थांबवा व मला ताबडतोब भेटा.) ती तार पाहतांच तो आश्चर्यचकित झाला. त्याच दिवशीं तो मुंबईला गेला. आणि तिथे त्याला सर्व घोटाळा समजला. कुणी तरी रजिस्ट्रारला खोटेंच कळविलें होतें की, ××× चा मेहुणा मॅट्रिकच्या परीक्षेला बसला आहे. त्यावर रजिस्ट्रारने त्याला तार करून पेपर तपासण्याचें थांबविण्याबद्दल कळविलें होतें. माझ्या मित्राचा कुणीच नातेवाईक परीक्षेला बसला नसल्याने त्याला रजिस्ट्रारची तशी खात्री करून देण्यास वेळ लागला नाही. पण हे उपकार कुणी आपणावर केले असावेत याचा मात्र त्याला शेवटपर्यंत पत्ता लागला नाही.

हेंच काय, पण वाङ्मयक्षेत्रांत देखील अशा विघ्नसंतोषी माणसांचा बुजबुजाट आढळतो असें मीं विधान केलें तर आश्चर्य वाटेल पुष्कळांना! पण बारकाईने त्या क्षेत्राचें आपण निरीक्षण केलें तर या विधानाची सत्यता आपणाला पटून येईल. एखाद्या लेखकाचें नावीन्यपूर्ण असें

एखादें पुस्तक प्रसिद्ध झालें–तें अतिशय लोकप्रिय झालें व त्याचा अतिशय गाजावाजा झाला तर त्या लेखकाला मिळालेल्या प्रसिद्धीमुळे मस्तकांत तिडीक उठलेला एक वर्ग असतोच. अशा वर्गाचें ध्येय मुळी हेंच. कोणत्या ना कोणत्या तरी उपायाने तें पुस्तक हिणकस आहे असें सिद्ध करावयाचें. मग अर्थात् कुणी एखाद्या परकीय भाषेंतील पुस्तकाशीं त्याचें साम्य दाखवून त्या लेखकावर चोरीचा आरोप करील, कुणी त्यांतील कल्पना अगदींच सामान्य आहेत असें सांगून पुस्तकाला मिळालेल्या मानाबद्दल संशय व्यक्त करतील, कुणी त्यांतील क्षुल्लक दोष प्रामुख्याने नजरेला आणून त्या पुस्तकावर टीका करतील, तर कुणी त्या लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोन संकुचित आहे या सबबीवर पुस्तक टाकाऊ ठरवतील. कोणतेंहि लोकप्रिय नाटक किंवा कोणताहि लोकप्रिय बोलपट बाहेर पडला की, त्याबरोबर त्याला खाली ओढणाऱ्या टीकाकारांचा वर्गहि निर्माण होत असतो. त्यांतील फारच थोडे टीकाकार प्रामाणिक असतात. बाकीचे बहुतेक त्या लेखकाचें यश डोळ्यांत सलत असल्याने त्याला खाली ओढण्याच्या प्रयत्नांतच असतात. अर्थात् त्याच्या मागे वैयक्तिक हेवेदावे, स्वतःची प्रतिष्ठा कमी होण्याची भीति इत्यादि अनेक कारणें असूं शकतात. शारदेचें मंदिरसुद्धा अशा विघ्नसंतोषी लोकांपासून अलिप्त नसावें हें खरोखर आश्चर्यजनक आहे.

पण त्यांत आश्चर्य तरी कसलें? गांव तेथे 'महारवाडा' या म्हणीप्रमाणे विघ्नसंतोषी माणसांचें अस्तित्व तिच्याहि मंदिरांत आपणाला मान्य केलेंच पाहिजे. दुसरा यशाच्या पायऱ्या चढतो आणि आपण अद्याप खालीच आहोंत ही जाणीव जोंपर्यंत माणसाच्या मनांत उद्वेग उत्पन्न करते तोंपर्यंत या विघ्नसंतोषी माणसांची परंपरा कमी अधिक प्रमाणांत तशीच राहणार. आणि अशीं जगांत किती माणसं आढळतील की, ज्यांना दुसऱ्याचें दिव्य यश पाहून मनांत त्यांचा हेवा वाटत नाही? आपल्या एका मित्राला लॉटरीचें एक लाखाचें पहिलें बक्षीस मिळाल्याचें

ऐकून आपणाला आनंद होईल हें खरें आहे. पण त्याबरोबर त्या मित्राच्या भाग्याचा हेवा वाटणार नाही असे किती लोक आढळतील? आपल्या एखाद्या मित्राने पैशाच्या जोरावर अलौकिक यश मिळविलें तर आनंदाबरोबर वैषम्याच्या लाटा मनांत उठणार नाही, असा माणूस क्वचितच आढळेल. आपण सारीं सामान्य माणसं आहोंत. राग, द्वेष, हेवा, असूया इत्यादि मनोविकार आपल्याहि मनांत वास करीत असतात. आणि एका दृष्टीने आपणहि विघ्नसंतोषी माणसांच्याच रांगेंतले! फरक एवढाच की, आपण मनांत उद्‌भूत होणारे क्षुद्र मनोविकार दाबतों व त्यांच्यावर विजय मिळवितों. पण विघ्नसंतोषी माणसाला अशा विकारावर विजय मिळवितां येत नाहीत. त्या विकाराच्या प्रवाहांतच ते वाहून जातात आणि यशस्वी व्यक्तीच्या मार्गांत विघ्नें आणण्यास प्रवृत्त होतात.

'आपणासारखीं सामान्य माणसें विघ्नसंतोषी माणसांच्याच रांगेंतील असतात' हे माझें विधान पुष्कळजण मान्य करावयास तयार होणार नाहीत. पण प्रत्येकाने प्रामाणिकपणाने आपल्या मनोविकारांचें पृथक्करण करावें आणि स्वतःलाच विचारावें, '–आपल्या अमक्या अमक्या मित्राचें एका अत्यंत सुंदर मुलीशीं लग्न झालें त्या वेळीं वैषम्याच्या लाटा तुझ्या मनांत आल्या नाहीत? आपल्या मामेभावाला ३५० रुपये पगारावर अधिकाराची नोकरी मिळाली त्या वेळीं स्वतःच्या नोकरीशीं त्या नोकरीची तुलना क्षणभर का होईना तूं केली नाहीस? आपल्या मेहुण्याला उत्कृष्ट पुस्तक लिहिल्याबद्दल हजार रुपयांचें पारितोषिक मिळालें त्या वेळीं कोणतेच विकार तुझ्या मनांत निर्माण झाले नव्हते का?" आणि माझी खात्री आहे की, जर प्रामाणिकपणाने त्याने आपले मनोविकार तपासले असतील तर त्याला त्या प्रश्नांना 'होय' म्हणूनच उत्तर द्यावें लागेल. आणि कसून मनोविश्लेषण करूनहि अशा प्रकारचे विकार मनांत आले नाहीत अशी ग्वाही तो देऊं शकला तर तो खरोखर महात्मा या संज्ञेलाच पात्र होईल.

थोड्याफार प्रमाणांत आपण विघ्नसंतोषी माणसाच्या रांगेंत आहोंत तर मग त्यांना नांवें ठेवण्याचा आपणाला काय अधिकार आहे ? स्वतःच्या मनोविकारावर तावा मिळवितां येत नसल्याने ते त्या मनोविकाराचे गुलाम बनलेले असतात आणि म्हणून आपण त्यांची थोडीफार कींवच केली पाहिजे. शिवाय अशा विघ्नसंतोषी माणसांचा आपल्या जीवनांत थोडा फार उपयोगाहि आहे असें मीं सांगितलें तर आश्चर्य वाटेल पुष्कळांना. पण असं पाहा–सोन्याची खरी परीक्षा होऊन ते कसाला पूर्णपणें उतरण्यासाठी त्याला अनेक दिव्यांतून जावें लागतें–त्याचप्रमाणे तेजस्वी माणसाच्या अंगीं असलेल्या तेजाला कांही निकष नको का? अशा तऱ्हेचा निकष हीं विघ्नसंतोषी माणसें पुरवितात. त्यांनी निर्माण केलेल्या विघ्नांतून तावून सुलाखून जाऊन जो आपलें जीवन यशस्वी करील तोच खरा वीर नव्हे का ? कांटेकुटे, खांचखळगे नसलेल्या सरळ मार्गावरून जाऊन यश मिळवायला असामान्य गुणांची काय आवश्यकता ? एखादा सामान्य माणूससुद्धा अशा मार्गाने जीवन यशस्वी करून दाखवील. पण मार्गांत कांटेकुटे पसरले आहेत, प्रत्येक पाऊल ठेचकाळतें आहे, वाटेंत अनंत संकटें पसरलीं आहेत, अशा मार्गावरून जाऊन जीवन यशस्वी करणारा माणूस तो खरा वीर. आणि मार्गांत कांटेकुटे पसरून व खाच-खळगे खणून विघ्नसंतोषी माणसें अशा तेजस्वी माणसाच्या अलौकिक गुणांची जणू कांही परीक्षाच घेत असतात. तेव्हा पराक्रमी माणसांच्या पराक्रमांचा अशा रीतीने निकष बनलेल्या विघ्नसंतोषी माणसांचा या जगांत थोडाफार तरी उपयोग नाही असें कोण म्हणेल ?

• • •

रविवारच्या माझ्या नित्य नियमाप्रमाणे सकाळीं नऊ वाजतां भरपूर गप्पा मारण्यासाठी व चहा उकळण्यासाठी मी जयंताच्या घरीं गेलों. दरवाजा ठोठावला–बराच वेळ कुणी आलं नाही म्हणून पुन्हा कडी जोराने वाजवली. 'आले हं ऽ !' असा आंतून आवाज ऐकूं आला व जयंताच्या पत्नीने दरवाजा उघडला.

"काय वहिनी ? कोणत्या कामांत गुंतला होता एवढ्या ? आणि जयंत काय करतोय् ?" मीं हसत हसत आंत प्रवेश करीत विचारलें.

"अहो दुसरं काय ? नेहमीचा उद्योग !" कपाळावर जरा नापसंतीच्या आठ्या घालून वहिनीने उत्तर दिलें, "कुणी तरी ज्योतिषी आलाय्— बसलेत दाखवीत त्यांना आमच्या दोघांच्या कुंडल्या ! आता हा ज्योतिषी त्यांना कोणता जादूचा दिवा देणार आहे देव जाणे !"

त्यांच्या या उत्तरावर मी जरा हसलों—जयंताच्या खोलींत प्रवेश केला व कोपऱ्यांतील आरामखुर्चीवर बसलों. जयंत व तो ज्योतिषी गुरु, शुक्र, शनि इत्यादि ग्रहांच्या गतींची चर्चा करण्यांत इतके गुंग झाले होते की त्यामुळे दोघांचेंहि माझ्याकडे लक्ष गेलें नाही. माझ्या तें एका दृष्टीने पथ्यावरच पडलें. मीं खिशांतून सिगरेटचें पाकीट काढलें व त्यांतील एक सिगरेट शिलगावून त्या दोघांची चर्चा ऐकूं लागलों.

जयंताचें हें भविष्याचें वेड सर्वत्र विख्यात होतें–कोणीहि नवा ज्योतिषी आला की त्याची वर्णी जयंताकडे लागत असे. आतापर्यंत किती जणांना त्याने आपली कुंडली दाखविली असेल व किती जणांकडून भविष्य वर्तवून घेतलें असेल त्याला गणतीच नाही. खुद्द त्याच्या पत्नीला त्याचें वेड बिलकूल आवडत नव्हतें. "आपल्या आयुष्यांत पुढे जें होईल तें होईल. त्याची अगोदरच आपणाजवळ नोंद हवी कशाला !" असें तिचें

प्रामाणिक मत होतें. पण त्या मताचीं जयंताने कधींच दखल घेतली नाही.

त्याच्या जीवनांत दोन महत्त्वाकांक्षा होत्या—आणि त्या कधी सफल होणार हें कळण्यासाठी प्रत्येक ज्योतिष्याला कुंडली दाखविण्याचें त्याला वेड होतें. पुष्कळ वर्षे झालीं तरी तो सरकारी नोकरींत सबॉर्डिनेट सर्व्हिसमध्येच होता. आपणाला केव्हातरी दुसऱ्या व पहिल्या वर्गांतील अधिकाराची जागा मिळेल असें गोड स्वप्न तो सतत उभारीत असे व दुसरें म्हणजे विवाहाला दहा वर्षें होऊन गेलीं तरी अपत्यलाभ न झाल्याने पुत्रमुख पाहण्यासाठीहि तो उत्सुक झाला होता. त्यामुळे कोणताहि ज्योतिषी आला की आपली कुंडली त्याच्यापुढे टाकून तो त्याला हे दोन महत्त्वाचे प्रश्न विचारीत असे : ‘मला नोकरींत बढती केव्हा मिळणार? व माझ्या कुंडलींत अपत्ययोग केव्हा आहे?”

आणि मी सिगारेट ओढीत आरामखुर्चींत स्वस्थपणें बसलों असतांनाच ती चर्चा ऐकूं येत होती. गुरु वक्री होता तो मार्गी झाल्यामुळे यंदा त्याला नोकरींत बढती मिळालीच पाहिजे असें तो ज्योतिषी आग्रह-पूर्वक प्रतिपादन करीत होता—आणि त्यांच्या दोघांच्या कुंडलींत तर चक्क त्याला यंदाच अपत्ययोग दिसत होता. यंदा या दोन गोष्टी घडून आल्या नाहीत तर आपण यापुढे कुंडली हातांत धरणार नाहीं हेंहि तो बजावून सांगत होता. आणि हें सगळें ऐकतांना जयन्ताचा चेहरा हर्षाने फुलून निघाला होता.

बिचारा जयन्त ! आज चार वर्षें वेळोवेळीं त्याच्याकडे आलेल्या प्रत्येक ज्योतिष्याने त्याला हेंच सांगितलें होतें—प्रत्येक वेळीं ज्योतिष ऐकतांना त्याचा चेहरा असाच हर्षाने फुलून निघाला होता—आणि वर्ष संपलं तरी बढती किंवा अपत्य या दोहोंचाहि लाभ न झाल्याने तो कित्येक वेळां पुन्हा खट्टूहि झाला होता. आणि तरीहि त्याचें भविष्याचें वेड सुटत

नव्हतें-तरीहि प्रत्येक ज्योतिष्याने सांगितलेल्या नवग्रहांच्या उपासना करण्यांत तो कोणत्याहि प्रकारची कसूर करीत नव्हता.

पण त्याबद्दल एकट्या जयंतालाच दोष कशाला द्यायचा? भविष्याचें हें वेड आज सर्वसाधारणपणें सर्वच सामान्य माणसांत पसरलेलें आढळतें. 'मौज' किंवा 'धनुर्धारी' या साप्ताहिकांतून येणारें राशिभविष्य नियमित वाचणारे वाचक आज थोडे का सांपडतात? त्या साप्ताहिक किंवा वार्षिक भविष्याचा त्यांना कितपत पडताळा येत असेल तो असो-तरीहि 'धनुर्धारी' आला की प्रथम भविष्याचें पान उघडणारे आणि आपलें राशिभविष्य वाचून त्याप्रमाणे आपला आठवडा चांगला जाणार की वाईट जाणार याविषयी अटकळ बांधणारे असे सुबुद्ध वाचक मीं पाहिले आहेत. माझ्या एका शिक्षक मित्राचें उदाहरण मला आठवतें. एके दिवशीं संध्याकाळीं मी त्याच्याकडे सहज गप्पा मारावयास गेलों असतां खिन्न चेहरा करून स्वारी बसली होती. कारण विचारतांच तो म्हणाला, "काय सांगूं—या आठवड्यांत माझ्यावर फार मोठं गंडांतर आहे. घरांत आजार सुरू होणार आहेत—बरीच मोठी आर्थिक ठोकर बसणार आहे. ....चक्क माझ्या राशिभविष्यांत सगळं नमूद केलं आहे. आता कसलं गंडांतर माझ्यावर येणार देव जाणे." त्याचें हें उत्तर ऐकून हसावें की रडावें हेंच कळेना. त्याची समजूत पटवून देऊनहि फारसा उपयोग होण्यासारखा नव्हता. त्या आठवड्यांत दररोज तो आपणावर येणाऱ्या गंडांतराची—घरांत सुरू होणाऱ्या आजाराची आणि त्याला बसणाऱ्या आर्थिक ठोकरीची वाट पाहत होता. त्या आठवड्यांत या बाबतींत त्याचा अपेक्षाभंग झाला ही गोष्ट निराळी. पण असा अपेक्षाभंग होऊनहि भविष्य वाचण्याचें त्याने कमी केलें काय? नांव नको. दुसऱ्याच आठवड्यांत 'आपल्यावरील गंडांतर' संपलें असल्याची गोड बातमी राशिभविष्याच्या आधारें तो घेऊन आला. न आलेलें गंडांतर कसें संपलें याचा मात्र मला शेवटपर्यंत उलगडा झाला नाही.

अनुक्रम ८४८५९ वि: निषिद्ध

वास्तविक भविष्यकाळ हा निसर्गानें आपणासमोर टाकलेला अज्ञाताचा पडदा आहे. तो पडदा बाजूला करून आपल्या भविष्यकाळांत डोकावून बघण्याच्या लोकांच्या मनोवृत्तींची मीमांसा ज्या वेळीं मी स्वतःच्या मनांत करूं लागतों त्या वेळीं अनेक वेळां स्वतःच्या जीवनांत अनुभवाला येणाऱ्या दुःखांत व निराशेंतच त्याचा उगम होत असावा असें मला वाटतें. मनुष्य नेहमी उद्याच्या आशेवर जगत असतो आणि ती आशा त्याला भविष्य पुरवीत असते. परिस्थितीनें—संकटानें—दारिद्र्यानें चिंबलेल्या व आंबून गेलेल्या माणसापुढे भविष्यकाळाचें गोड स्वप्न नसतें तर त्याला जीवनांत कसला आनंद वाटला असता ? आपलें हें दारिद्र्य आज ना उद्या केव्हा तरी संपणार—उद्या आपणाला चांगले दिवस येणार आहेत या गोड आशेवर तर तो जगत असतो. 'शनीच्या साडेसातीची मुदत संपली की तुमचं सगळं दैन्य व दुःख नाहीसं होईल,' 'गुरु व शुक्र यांची युति झाली की तुम्हांला मोठा अधिकाराचा योग येणार आहे.' अशासारखें मधाचें बोट भविष्य त्याला सतत चाटवीत असल्यानें आजचीं दुःखं व आजची निराशा तो मुकाट्यानें सहन करतो आणि ती साडेसाती संपण्याची किंवा त्या गुरु-शुक्र-युतीची तो वाट पाहतो. आणि त्या काळांत कसलाहि दुःखाचा व संकटाचा डोंगर त्याच्यावर कोसळला तर भावी सुखाच्या आशेवर तीं सर्व तो सहनाहि करतो. किंबहुना साडेसाती सुरू झाली म्हणजे अशीं संकटं यावयाचींच—असंहि तो त्या संकटाचं एक प्रकारें समर्थन करतो. थोडक्यांत आपल्या आजच्या निराशाजनक व दुःखमय परिस्थितीपासून क्षणभर का होईना, सुटका होण्यासाठीं भविष्य म्हणजे त्यांनी केलेलें गोड स्वप्नरंजनच नाही का ?

'कर्तृत्व निष्फळ ठरलं—प्रयत्नांची पराकाष्ठा फोल झाली—निदान आता दैव तरी कांही साहाय्य करतं का ?' अशा वृत्तीनें भविष्याकडे वळणारे कांही थोडे नसतात. जयंताचंच पाहा ना—आपल्या खात्यांत वरच्या दर्जाची जागा मिळावी म्हणून त्यानं कमी का प्रयत्न केले ? आपल्या असामान्य कर्तृत्वाचा प्रत्ययहि त्यानं किती तरी वेळां अधिकाऱ्यांना आणून दिला.

(६९)

असं असूनहि शेवटीं खालच्या ग्रेडमधून वर येण्याची आशा त्याला दिसेना तेव्हा तो दैववादी झाला व कोपलेल्या ग्रहांची शांति करण्याच्या नादाला तो लागला तर त्याला का दोष द्यायचा? वर्तमानपत्रांतून मोठमोठ्या बक्षिसाच्या कोड्याची साथ पसरली आहे त्याच्या मागे तरी दुसरें कोणतें मानसशास्त्र आहे? "–मिळतीलहि कदाचित् आपणाला अठरा हजार रुपये!" अशा गोड आशेनेच मनुष्य शब्दकोड्याकडे ओढला जातो ना? कोड्याचें उत्तर पाठविल्यापासून कोड्याचें अचूक उत्तर वर्तमानपत्रांत छापून येईपर्यंत त्याचा मध्यंतरींचा वेळ मोठ्या गोड तन्द्रींत जात असावा. 'अठरा हजार रुपये आपणाला मिळाले की आपण काय करावयाचे!' याच्या अनेक योजनाहि या काळांत तो आखत असल्यास नवल नाही. कोड्याचें उत्तर पाठवितांना चांगला मुहूर्त पाहून देवाला नमस्कार करून उत्तर पाठविणारे महाभाग मला माहीत आहेत. त्यामागेहि हीच स्वप्नरंजनाची वृत्ति नाही का?

वर्तमानकाळांत संकटांनी वैतागलेल्या, निराशेने पीडलेल्या व दुःखाने व्याकुळ झालेल्या लोकांनाच भविष्याचें विशेष आकर्षण वाटत असल्यास नवल नाही. कुणाला नोकरी नसते–कुणाच्या मागे कोर्टकचेरीचे शुक्लकाष्ट असतें–कुणाचें वैवाहिक जीवन सुखाचें नसतें तर कुणाला नोकरींत वरिष्ठ अधिकारी सतत छळत असतो.

"ही आपली तापदायक परिस्थिति संपणार कधी?" असें त्यांना वाटत असल्याने ते भविष्याकडे धाव घेतात व ज्योतिष्याने दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवून गुरु बदलण्याची किंवा शनीची साडेसाती संपण्याची वाट पाहत असतात. अर्थात् चांगलें तेवढेंच भविष्य सांगण्याकडे ज्योतिष्याचा कल असल्याने त्याचा भविष्यावर चटकन् विश्वास बसावा यांत नवल नाही. मनुष्य भविष्यकाळाच्या बाबतींत वाइटापेक्षा चांगल्यावरच विश्वास लवकर ठेवतो—आणि ज्योतिष्यांनाहि हें लक्षांत ठेवावें लागतें. जयन्ताकडे आलेल्या कोणत्याहि ज्योतिष्यांनी त्याला 'तुला बढतीचा योग नाही' असें कधीच सांगितलं नाही. उलट प्रत्येक

ज्योतिषी 'सहा महिन्यांत बढती व एका वर्षांत अपत्यलाभ' होण्याची ग्वाही देत आला होता. त्यामुळे जयन्ताच्या दृष्टीने ते सर्वच ज्योतिषी मोठे जाणते ठरले होते. निराश झालेल्या मनाला कांही काळ कां होईना आनंद देण्याचें कार्य हे ज्योतिषी करतात यांत शंका नाही. भविष्य खोटें ठरलें तरी अशा मनुष्याला भविष्याचें आकर्षण वाटतें तें त्याचमुळे !

पण हें सर्व लक्षांत घेऊनहि मला स्वतःला भविष्य जाणून घेण्याविषयीं आकर्षण वाटत नाही. एकतर अज्ञाताचा जो पडदा निसर्गाने आपणामध्ये व आपल्या जीवनांतील भावी घटनामध्ये टाकला आहे तो एका विशिष्ट हेतूनेच. आपल्या जीवनांतील सर्व घटना आपल्याला एखाद्या समारंभाच्या कार्यक्रम–पत्रिकेप्रमाणे अगोदर माहीत झाल्या तर आपणाला तें जीवन जगण्यांत कितपत आनंद वाटेल ? उद्याच्या जीवनाकडे आपण मोठ्या अपेक्षेने पाहतों तें आपणापासून तें अज्ञात आहे म्हणूनच ना ? शिवाय उद्याच्या जीवनांत कांही आनंददायक घटना असल्या तर मी त्याची मोठ्या अपेक्षेने वाट पाहीन. पण दुःखद घटनांचं काय ? त्या येणार हें कळल्यानं मनाला अगोदरपासून धसका बसून आपल्या जीवनांतील आजचाहि आनंद त्यामुळे नष्ट नाही का होणार ? उद्याच्या दुःखाचे वेध अकारण आजच आपल्या जिवाला लावून घेण्यांत काय अर्थ आहे ? त्यापेक्षा अज्ञानांतील आनंद खरा सुखावह नसतो का ?

शिवाय भविष्य म्हणजे आपल्या जीवनांत पुढे निश्चित होणाऱ्या घटना. त्या कांही आपणाला चुकवितां येणार नाहीत. मग ज्या गोष्टी आपणाला चुकवितां येत नाहीत—ज्या अटळ आहेत—त्यांच्याविषयीं आजच सुखदुःख कशाला करायचं ? 'चाळिसाव्या वर्षी मला मोठा अपघात होणार' असं आज मला कळलं—तो अपघात टाळतां येणार नाही हें निश्चित असलं तर तें अपघाताचें भविष्य आज मला कळून विनाकारण हुरहूरच लावून घ्यायची ना ? विवाह–प्रसंगीं वधूवरांना कळलं कीं चार-पांच वर्षांनंतर आपलं जीवन अत्यंत यातनामय होणार आहे तर तें भविष्य

करून त्यांना तरी काय फायदा ? उलट जीं पहिलीं चारपांच वर्षे अत्यंत सुखानं त्यांनी काढलीं असतीं तींहि पण पुढील जीवनाच्या काळजीने सुखांत जाणार नाहीत. आपली अत्यंत प्रिय व्यक्ति आजारी पडली असतां तिच्या मृत्यूचें भविष्य जर एखाद्या ज्योतिष्याने वर्तविलें तर तें त्याला किती यातनामय होईल याची कल्पनाच करणें बरें ! अशा स्थितींत निसर्गाने भविष्यकाळामध्ये ठेवलेला हा अज्ञाताचा पडदा दूर सरकावून पलीकडे पाहण्याचा आपण प्रयत्न करूं नये हें योग्य नव्हे काय ? शिवाय पुढील सर्व भविष्य आज तंतोतंत माहिती झालं तर माणसाच्या कर्तृत्वाला तरी वाव कसा राहणार ? माझी एक विशिष्ट महत्त्वाकांक्षा आहे व ती साध्य करण्यासाठी मला खूपच कष्ट करावे लागणार आहेत. ती महत्त्वाकांक्षा साध्य होणार नाही हें भविष्य मला आजच कळलं तर मी त्यासाठी धडपड कशाला करीन ? आणि ती साध्य होणार असें कळलें तर त्यासाठी कष्ट करण्याचीहि मला गरज उरणार नाही. किंबहुना असा सर्व भविष्यकाळ प्रत्येकापुढे वेळापत्रकाप्रमाणे जर ठेवण्यांत आला तर जगाचा कारभार थांबल्यावाचून राहणार नाही. कारण उद्याच्या अज्ञानावरच आजच्या जगाचा कारभार चालला आहे हें विसरून चालायचें नाही. तो अज्ञानाचा पडदा आजच्या व उद्याच्यामध्ये नसेल तर जगांतील राजकारण, अर्थकारण, समाजकारण इत्यादि सर्व ढासळून पडेलच, पण दैनंदिन जीवनांतील कितीतरी गोष्टी बंद पडतील. शिवाय ज्या उद्याच्या आशेवर मनुष्य आज स्वप्नसृष्टि उभारतो ती स्वप्नसृष्टीहि नष्ट झाल्याने त्याचें जीवन रुक्ष व नीरस होईल तें निराळेंच !

पण हें सर्व कळत असूनहि माणसाची ‘ अज्ञाताची ओढ ’ कमी होत नाही. ज्योतिषावर विश्वास असो वा नसो, प्रत्येकाला आपल्या जीवनांतील भविष्यकालीन घटना समजावून घेण्याची इच्छा असते. आणि ती अनैसर्गिक आहे असं कसं म्हणतां येईल ? कादंबरी ऐन रंगांत आली असतां आपण थांबलों—किंवा समरप्रसंग उत्कट झाला असतां नाटकाच्या अंकाचा पडदा पडला—तर ‘ पुढें काय झालं ? ” याची तीव्र उत्कंठा

आपणाला लागते. मग आपल्या स्वतःच्या जीवनांतील पुढे होणाऱ्या घटनांबद्दल तशीच तीव्र उत्कंठा वाढली तर ते मनुष्यस्वभावास धरून नाही का? आणि त्यासाठी ज्योतिषाच्या तुटपुंज्या साधनाच्या साहाय्याने अज्ञाताचा पडदा दूर करून भविष्यकाळांत डोकावून पाहण्याचा त्याने प्रयत्न केला तर तें फारसें चूक म्हणतां येईल का?

खरं म्हणजे आपणापैकी प्रत्येकजण उद्याच्या आशेवर जगत असतो. आजचीं संकटें–आजचें दुःख–आजची निराशा आपण सहन करतों तरी कोणत्या आशेवर? फार कशाला, आज आपण पेरणी करतों ती उद्या पीक येईल या आशेवरच ना? आज आपण व्यापारांत भांडवल गुंतवतों तें उद्या त्यापासून नफा होईल या आशेवरच ना? आज आपण शिक्षण घेतों– द्रव्यसंचय करतों, घर बांधतों–हें सर्व उद्याच्या आशेवरच नव्हे काय? आज जर आपणाला कुणी सांगितलें कीं 'तूं जो हा उद्योग आरंभला आहेस त्यापासून उद्या तुला दुःख होणार आहे,' तर उद्योग करावयास आपण प्रवृत्त होऊं काय? थोडक्यांत आपल्या सर्वच क्रिया उद्याच्या आशांचा पाया नाही काय?

मग त्या आशांच्या पायावर आपण कोणती इमारत बांधणार याचें रम्य चित्र भविष्याच्या आधारें एकाद्याने रेखाटण्याचा प्रयत्न केला तर त्यांत बिघडलें कोठे? मी स्वतः अशीं चित्रें अनेक वेळां रंगवतों व त्यांतून अननुभूत अशा आनंदाची प्राप्ति करून घेतों. 'उद्या मी मोठें घर बांधणार आहें.' '–मला जीं मुलें होतील त्यांना शिक्षण देऊन खूप मोठे करणार आहें.–' "एक विद्वत्ताप्रचुर टीकाग्रंथ लिहिणार आहें." अशीं नाना स्वप्नें मी माझ्या मनःचक्षूपुढे रंगवतों आणि त्या स्वप्नसृष्टींत कितीतरी वेळ रंगून जातों. प्रत्येक मनुष्य हेंच करीत असतो. मग तें तो आपल्या कर्तृत्वाच्या आधारें करीत असो किंवा नवग्रहांच्या आधारें करीत असो.

असं जर आहे तर मग जयंताच्या भविष्याच्या वेडाबद्दल मीं त्याला नांवं कां ठेवावीत?

● ● ●

## प्रामाणिक मतें

माझ्या मित्राचें तें पत्र मला ज्या वेळीं मिळालें त्या वेळीं मला विलक्षण आश्चर्य वाटलें. त्याच्या कादंबरीवर मीं लिहिलेल्या अभिप्रायाने तो विलक्षण चिडला होता. त्याने लिहिलें होतें–' तुझ्यासारख्या मित्राकडून अशा तऱ्हेच्या परीक्षणाची मीं अपेक्षा केली नव्हती. माझा मित्र म्हणून कांही तरी सहृदयतेने तूं त्या कादंबरीवर लिहिशील असं मला वाटलं होतं! पण तूं तर परीक्षणांत इतर टीकाकारांवरहि कडी केलीस. तुझं प्रामाणिक मत तूं अशा तऱ्हेने व्यक्त करशील अशी मला कल्पना असती तर मी तुला परीक्षण लिहायला सांगितलेंच नसतें. मित्रधर्माला चांगलाच जागलास. ' वगैरे वगैरे त्याने बरेंच लिहिलें होतें.

तें पत्र वाचून मला आश्चर्य वाटलें. वास्तविक त्या कादंबरीची भेटप्रत त्याने मला ज्या वेळीं आणून दिली त्या वेळीं त्याने मला पुन्हा पुन्हा निर्भीडपणें व निःपक्षपातीपणें आपलें ' प्रामाणिक मत ' व्यक्त करण्याची विनंति केली होती. मीं ती कादंबरी वाचली. मला ती अत्यंत भिकार वाटली. आणि त्याच्या विनंतीला जागून त्यावरील अत्यन्त निर्भीड व स्पष्ट मत मीं माझ्या परीक्षणांत व्यक्त केलें होतें. असं असतांनाहि माझ्या मित्रानं त्याबद्दल रागवावं हें आश्चर्य नव्हतं काय ?

पण त्यावर मी अधिक विचार करूं लागलों त्या वेळीं माझी चूक मलाच कळून आली. त्या बिचाऱ्याच्या कादंबरीवर सगळीकडेच निष्ठुर टीका आली होती आणि म्हणून मी ' कांही तरी चांगलं लिहीन ' या कल्पनेने त्याने माझ्याकडे धाव घेतली होती. माझें निर्भीड व प्रामाणिक मत व्यक्त करण्याविषयीं पुन्हा पुन्हा सांगतांना तें प्रामाणिक व निर्भीड मत त्या कादंबरीच्या स्तुतिपरच असेल अशा तऱ्हेची अपेक्षा त्याने केली होती. हा जो कादंबरी लेखनाचा मूर्खपणा आपल्या हातून झाला आहे त्याची थोडी फार तरफदारी आपल्या मित्राने करावी या आशेने तो

माझ्याकडे आला होता. आणि मी तर त्याच्या आशेचा केवळ भंग केला होता, इतकेंच नव्हे तर 'ही कादंबरी लिहून आपण मूर्खपणा केला' असें जें त्याला राहून राहून वाटत होतें त्यावर पक्केपणाचं सीलच करून टाकलं होतं. मग कां नाही माझ्या मित्राला माझा संताप येणार?

आपल्या मताची हीच तर गंमत आहे. एखादी गोष्ट आपल्या हातून चुकली तर त्याचं आपण तर समर्थन करतोंच. पण आपल्या भोवताली असलेल्या परिचित मंडळींनीहि त्याचं समर्थन केलं तर आपल्याला बरं वाटतं. आपली चूक क्षम्य आहे, कुणाच्याहि हातून तशीच चूक झाली असती ही जाणीव मनांत हळू हळू निर्माण होऊन आपल्या मनाचं समाधान करूं लागते व कालान्तराने तर आपल्या हातून घडलें तेंच बरोबर अशीहि भावना मनांत बळावूं लागते.

'असं असं माझ्या हातून झालं बुवा! अन् मीं केलं तेंच योग्य केलं असं मला वाटतं. तुझं काय मत आहे?' असें म्हणून आपण ज्या वेळीं मित्राकडे त्याचं प्रामाणिक मत कळण्यासाठी वळतों त्या वेळीं मनाच्या अंधुक कोपऱ्यांत त्याने आपल्याला दुजोराच द्यावा अशी एक आशा असते. आणि सर्वसाधारण भिडस्त मित्र आपण नाराज होऊं नये म्हणून होला हो करतातहि. तेवढ्यानेच आपलं समाधान होतं.

मित्राने नेहमी अप्रिय पण कल्याणकारक असें बोलावें असें एक सुभाषित आहे. जर आपला मित्र कुठे चुकला असेल तर त्याला ताळ्यावर आणण्यासाठी कटु बोलायलाच पाहिजे....तरच तो खरा मित्र—असें आपण समजतों. पण खरोखरच अशा रीतीने आपल्या मित्राकडून कटु व सत्य ऐकण्याची आपली तयारी असते का? एखाद्या मित्राने आपल्या वर्तनाविषयी व्यक्त केलेलें स्पष्ट व सडेतोड असें मत ऐकणें आपणाला कितपत रुचतें? असं असूनसुद्धा आपण आपल्या मित्राला एखाद्या गोष्टीविषयी मत विचारतांना आव तर केवढा आणतों! 'तोंडदेखलं बोलं नकोस. अगदी तुझं प्रामाणिक मत सांग. चुकलं का माझं यांत!'

असं विचारतांना 'नाही ' हेंच उत्तर ऐकण्याची आपली अपेक्षा असते अन् तरीहि आपणाला त्याचें प्रामाणिक मत हवें असतें.

आणि एखाद्याने त्याचें प्रामाणिक मत दिलेंच तर त्याची संभावना आपण 'अं: ! त्याला काय कळतें त्यांत ? मूर्ख आहे अगदी ! ' असें म्हणून करत नाही काय ? आपल्या विरुद्ध मत व्यक्त करणारा व आपणाला विरोध करणारा बहुधा आपल्या मतें मूर्खच असतो. त्याला त्या विषयांतील कांहीच गम्य नसतें—एवढेंच काय पण व्यक्तिद्वेषाने त्याने तें मत व्यक्त केलेलें असतें. एखाद्याजवळ प्रामाणिक मत मागावयाचें व तें त्याने दिलें म्हणजे त्याची अशी संभावना करावयाची याचा अर्थ 'प्रामाणिक मत ' म्हणजे 'आपणाला हवं असलेलं मत ' असाच होत नाही काय ?

तोच तर अर्थ सर्वांना अभिप्रेत असतो. आणि म्हणून प्रामाणिक मत देण्याच्या भानगडींत कुणी फारसा पडतहि नाहीं. 'हें पाह्यलंत का पातळ ? किती छान रंग आहे, नाही ? अन् फक्त पंचवीस रुपयांना मिळालं ! स्वस्त मिळालं, नाही का ? आवडलं का तुम्हाला ? अगदी प्रामाणिकपणें सांगा हं ! ' असें ज्या वेळीं माझी पत्नी मला विचारते त्या वेळीं त्या पातळाचा रंग मला कितीहि नापसंत असला, तें कितीहि महाग पडल्याचें मला माहीत असलें तरीहि माझीं प्रामाणिक मतें मला मनांतच ठेवावीं लागतात. उलट 'वा वा ! सुंदर ! रंग खरंच छान आहे ' असं उसनं हास्य तोंडावर आणून मला माझ्या पत्नीचं कौतुकहि करावं लागतं. त्यावर ती बिचारी खूष होते अन् चहाबरोबर चमचमीत खाद्यहि बशींतून पुढे येतें.

पण तेंच मीं जर माझें प्रामाणिक मत व्यक्त केलें तर ? बापरे ! 'तुम्हांला सौंदर्यदृष्टिच नाही—तुम्हांला बायकोचं कांही कौतुकच करायला नको—तुम्हांला मीं कांही केलेलं आवडतच नाही....' इत्यादि वाक्प्रहारांचा मारा होतोच, पण शिवाय गंगायमुनांच्या पुराला तोंडहि द्यावें

लागतें. आणि पत्नीच्या गंगायमुनाच्या पुरापुढे तग धरूं शकेल असा धीरोदात्त पुरुष कोण आहे? या सर्वांना तोंड देण्यापेक्षा तिला हवें असलेलें 'प्रामाणिक मत' देणें मला परवडतें.

'प्रामाणिक मतें' देतांना मी स्वतःशीं अधिकांत अधिक प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करीत असे. पण त्याचा परिणाम मात्र विपरीत होत असल्याचें मला आढळून आलें. माझे मित्र त्यामुळे मला दुरावूं लागले व कांही कांहींनी तर माझें शत्रुत्वच पत्करलें.

दीड वर्षापूर्वीचाच प्रसंग! असाच माझा मित्र विवाहाच्या बाबतींत माझा सल्ला घ्यावयास आला होता. ज्या मुलीशीं त्याचा विवाह ठरण्याचें घाटत होतें त्या मुलीची मला चांगलीच माहिती होती. त्यामुळे मीं त्याला सांगितलें, 'ती मुलगी सुंदर आहे हें खरें, पण आईबापांची ती एकुलती एक असल्याने व अत्यंत लाडांत वाढल्याने ती फार हट्टी झालेली आहे. शिवाय घरचें वळण तिला बिलकूल नाही. तेव्हा तुझें व तिचें पटेल असें मला मुळीच वाटत नाही.' माझ्या मित्राने पुढे त्याच मुलीशीं विवाह केला. त्यामुळे तो मित्र माझ्याशीं बोलेनासा झालाच. पण कसें कुणास ठाऊक माझें तें प्रामाणिक मत त्या मुलीच्या कानावर गेल्याने तिचाहि माझ्यावर रोष झाला. त्यामुळे कुठेहि रस्त्यांत तो मित्र सपत्नीक भेटला की तो मान वळवी व ती एखाद्या मारक्या म्हशीप्रमाणे माझ्याकडे रोखून पाही. कुठून माझं प्रामाणिक मत मीं त्याला ऐकवलं असं मला झालं!

हें वैयक्तिक झालं! पण एखाद्या सर्वमान्य विषयावर आपलं प्रामाणिक मत व्यक्त करणंहि अत्यंत त्रासदायक होतं याचाहि अनुभव आज थोड्यांना का आला आहे? प्रि. आगरकरांनी समाजसुधारणेविषयी आपलीं प्रामाणिक मतें व्यक्त केलीं म्हणून त्यांना जिवंतपणीं स्वतःची स्मशानयात्रा पाहावी लागली हें कुणाला माहीत नाही? सर्वसामान्य लोकमताच्या विरुद्ध असलेलीं आपलीं प्रामाणिक मतें बोलून दाखविणारा मनुष्य समाजद्रोही तरी ठरतो, राष्ट्रद्रोही तरी ठरतो, किंवा चक्रम् तरी

ठरतो. इब्सेनच्या ' एनिमि ऑफ दि पीपल ' मधील डॉ. स्टॉकमन किंवा गॅल्सवर्दीच्या ' दि मॉब ' या नाटकांतील मॉर चें स्वभावचित्र हेंच सिद्ध करीत नाही काय ? दोघांनी आपलीं प्रामाणिक मतें लोकांसमोर मांडलीं आणि त्याबद्दल दोघांचाहि समाजाकडून अनान्वित छळ झाला, आणि मॉरच्या बाबतींत तर त्याचीं बायकामुलें त्याला सोडून गेलीं व एकाकी झुंजत त्याला आपल्या प्रामाणिक मताकरिता प्राणदान करावें लागलें. ही गोष्ट काय दाखविते ?

माझ्या एका मित्राचें तोंड या बाबतींत चांगलेंच पोळलें आहे. तो ज्या शाळेंत नोकरी करीत असे त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी खाजगी शिकवण्याविषयी एक फर्मान काढलें. साऱ्या शिक्षकवर्गांत त्यामुळे खळबळ उडाली. पुष्कळ लोकांच्या प्राप्तीवर त्यामुळे गदा येत असल्याने त्या लोकांनी ' हें आमच्या हक्कावर आक्रमण आहे ' अशा प्रकारचा प्रचार सुरू केला, व शिक्षकांची सभा बोलावून लोकमत क्षुब्ध करून टाकलें. तो ज्या वेळीं बोलावयास उठला त्या वेळीं बहुतेक सर्वांचीं मनें त्या फर्मानाविरुद्ध बंड करण्यास तयार झालीं होतीं. वास्तविक त्याला किंवा कुणालाहि त्या फर्मानांत अन्याय्य वाटण्याजोगें कांहीच नव्हतें. शिकवण्यांच्या संख्येवर व विद्यार्थ्यांच्या संख्येवर नियंत्रण न घातल्याने वर्गांत कांहीच न शिकवितां खाजगी वर्गाचा प्रचार करण्याची घातुक वृत्ति कशी बळावत चालली होती हें सर्वांना दिसत होतें. पण त्याने बोलायला सुरुवात केली मात्र .... तों सर्वांचा एकच गिल्ला सुरू झाला. 'खालीं बसा ' ' Shame Shame ' अशी संभावना होऊं लागली. आणि शेवटीं भाषण अर्धेंच सोडून त्याला खाली बसावें लागलें. सर्वच शिक्षकवर्ग त्याच्यावर उलटला होता— ' फितूर ' — ' हेर ' ' मुख्याध्यापकाचा पित्त्या ' अशीं अनेक विशेषणें त्याला बहाल करण्यांत आलीं, आणि शेवटीं कॉमन रूमच्या गरम वातावरणामुळे ती शाळा सोडणेंहि त्याला भाग पडलें ! वास्तविक पांच सहा शिक्षकांखेरीज सर्वजण त्या फर्मानाशीं व

माझ्या मित्राच्या विचाराशीं सहमत होते. पण ' सामाजिक मन ' ही एक निराळीच चीज आहे असा अनुभव त्यामुळे तरी त्याला आला आणि इतःपर आपलीं ' प्रामाणिक मतें ' आपल्यापाशींच ठेवण्याची प्रतिज्ञा त्याने केली.

हें सगळं पाहिलं की असं वाटूं लागतं–समाजाला काय किंवा व्यक्तीला काय–प्रामाणिक मतांच्या नांवाखाली आपली खुशामत हवी असते आणि ती करणारा जोंपर्यंत त्यांना भेटतो तोंपर्यंत तें त्याचें प्रामाणिक मत आहे की अप्रामाणिक मत आहे हा विचार करण्याची त्याला जरुरी भासत नाही. आणि एखादा प्रामाणिक मतें निर्भीडपणें ऐकविणारा मिळालाच तर ते त्याला आपलं जीवन नकोसं करतील यांत शंका नाही.

समाजाची मनोरचनाच जिथे अशा प्रवृत्तीवर आधारलेली आहे तिथे आज ' प्रामाणिक मतें ' याचा अर्थ ' आपणाला अनुकूल असणारीं मतें ' असा झाला तर आश्चर्य तें काय ? आणि अशीं प्रामाणिक मतें कितपत प्रामाणिक असूं शकतील हाहि प्रश्नच आहे. नाही काय ?

म्हणूनच कुणी मला एखाद्या गोष्टीवर आपलें प्रामाणिक मत विचारलें तर तें द्यावयाचें मी टाळतों. निदान जें मत देतों तें प्रामाणिक तरी असत नाही हें खास. माझ्या लेखकमित्राने याच्यापुढे त्याची एखादी कादंबरी भेट म्हणून पाठविली व आपलें प्रामाणिक मत व्यक्त करण्याविषयी विनंति केली ( बहुधा तो संभव आता कमीच ! ) तर कादंबरी कितीहि वाईट असली तरी मीं तिची भरपूर स्तुति करण्याचें ठरविलें आहे. आणि ती वाचल्यावर ' मी मराठींतील अत्यंत रसिक टीकाकार ' असल्याचें आपलें प्रामाणिक मत तो मला पत्रद्वारें कळवील याविषयी मला थोडीसुद्धा शंका वाटत नाही. माझ्या ( अ ) प्रामाणिक मतामुळे त्याच्या मनाला व त्याच्या ( अ ) प्रामाणिक मतामुळे माझ्या मनाला जें समाधान मिळेल तें काय कमी आहे ?

• • •

माझ्या समोरच्या खोलींत तो राहायला आल्यापासून मला आपला तो एक उद्योगच झाला होता. कामाचा किंवा अभ्यासाचा कंटाळा आला की, मी त्याच्या खोलीकडे पाहत असायचा—कधी कधी तर अर्धा पाऊण तास सारखी माझी दृष्टि त्याच्याकडे आणि त्याच्या ठराविक हालचाली-कडे असे.

मूर्तिमंत नियमितपणाच त्या मनुष्याच्या रूपाने अवतरला आहे असें मला कधी कधी वाटे. घड्याळाच्या कांट्याप्रमाणे त्याच्या साऱ्या हाल-चाली अगदी नियमितपणें होत. पहाटें साडेपांचपासून रात्रीं साडेदहा-पर्यंत त्याचा सारा कार्यक्रम अगदी आखलेला असे. ठराविक वेळेला ठराविक गोष्ट व्हावयाचीच ! त्यांत कधीच खंड पडावयाचा नाही. त्यामुळे मनगटावरील घड्याळाकडे लक्ष ठेवून त्याच्या हालचाली बघण्यांत मला मोठी गंमत वाटे.

बहुतेक दररोज त्याच्या खोलींतील स्टोव्हच्या आवाजाने मी जागा होई. मी घड्याळाकडे नजर टाकी. बहुतेक सहाला पांच मिनिटें कमी असत. नसलीं तर मी सहाला पांच मिनिटें कमी करून ठेवीत असे. माझ्या घड्याळापेक्षा माझा त्या गृहस्थाच्या स्टोव्हवरच अधिक विश्वास होता. यानंतर पुन्हा एक डुलकी होते न होते तोंच त्याने आपल्या शेजाऱ्याला मारलेल्या हाकेने मी पुन्हा जागा होई व सात वाजले असें समजून घड्याळाकडे न पाहतांच बिछान्याचा त्याग करी.

दुपारीं अडीच वाजलें कीं, अभ्यास थांबवून समोरच्या खोलीकडे पाहण्याची मला सवयच लागली होती. बरोबर त्याच वेळीं त्या स्वारीच्या खोलीचें कुलूप उघडें व त्यानंतर पंधराच मिनिटांनी स्टोव्हचा आवाज कानीं पडे. तीन वाजतां तो गृहस्थ पुस्तक घेऊन टेबलाशीं बसे. आणि मग मात्र सहा वाजेपर्यंत पुस्तक बदलण्याव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याच

हालचाली बघावयास मिळणार नाहीत, ही खात्री असल्याने मी खिडकी लावून टाकी. आणि त्या खोलीचा दरवाजा लागल्याचा आवाज आला की, मी समजत असे, 'सव्वासहा झाले, आणि स्वारी फिरावयास निघाली आहे.' नंतर आठला पांच मिनिटें कमी असतांना इलेक्ट्रिकचे दिवे बारीक होण्याच्या बरोबर पांच मिनिटें अगोदर मला त्याच्या खोलींत लाइट लावलेला आढळे. आणि साडेदहा वाजले की, मी कोणतेंहि काम करीत असलों तरी माझी नजर आपोआप त्या खोलीकडे जाई व माझ्या अपेक्षेप्रमाणे त्याच वेळीं दिवा मालविला जाई.

या गृहस्थाच्या यांत्रिक नियमितपणाशीं माझ्या आत्यंतिक अनियमित-पणाची तुलना करतां हे दोन ध्रुव समोरासमोर कसे आले याचें मला बरच वेळां आश्चर्य वाटे. त्याचा कार्यक्रम घड्याळाप्रमाणे आखलेला तर माझा कार्यक्रम घड्याळाकडे न पाहतां ऐनवेळीं ठरविलेला. कधी कधी 'उद्योग-उत्साह-उन्नती'ने अगदीच डोकें वर काढलें तर पांचलाच उठून अस्मा-दिक पर्वतीला जावयाचें तर कधी कधी झोंप पुरी झाली नाहींसा भास झाला–आणि असा भास मला बहुतेक रोजच होई–तर मग सातपर्यंत मच्छरदाणींतून डोकें बाहेर काढावयाचेंच नाही. आणि पुढला कार्यक्रम-सुद्धा सारा अनिश्चित! कधी अभ्यास करण्याच्या उत्साहाने निश्चय करून पुस्तक घेऊन बसावयाचें न् पंधरा मिनिटें झालीं न झालीं तोंच कुणाकडे तरी त्याच वेळेला जाण्याची आठवण व्हावयाची. अर्थात् मग पुस्तक बाजूला आणि आमचें पाऊल खोलीच्या बाहेर पडावयाचें. त्या मित्राकडून मग त्याला घेऊनच तिसऱ्या मित्राकडे, तिसऱ्याकडून चौथ्याकडे असें भटकत असतांना मग अनपेक्षितपणें आठवण व्हावयाची की, 'अरे, आज कॉलेज आहे. अकराला गेलें पाहिजे.' आणि मग धावतपळत खाणावळ गांठाव-याची, कसेबसे चार घास घाइघाईने पोटांत ढकलावयाचे आणि कॉलेज अकराला केल्याबद्दल कॉलेज अधिकाऱ्याला मनांतले मनांत नांवें ठेवीत कॉलेजांत पाऊल टाकावयाचें.

अर्थात् मला अशा अनियमितपणामुळे खूप त्रास होतो. अभ्यास नीटसा होत नाही–त्यामुळे परीक्षा आली की, तारांबळ उडते–महत्त्वाचीं कामें तशींच राहतात–महत्त्वाच्या गांठी घ्यायच्या विसरतात–आणि नियमितपणा कशांतच राहत नाही. या दृष्टीने मला त्या समोरच्या माणसाचा आतिशय हेवा वाटतो. एकप्रकारें आदरपण वाटतो. आदर वाटतो तो त्याच्या मनोनिग्रहाबद्दल. मनाच्या इच्छेविरुद्ध ठराविक वेळेला ठराविक गोष्ट झालीच पाहिजे, या अट्टाहासानेच तो किती तरी गोष्टी करीत असेल. त्यामुळे मन त्याच्या ताब्यांत आहे—मनाला आणि शरीराला पण एकप्रकारची शिस्त त्याने लाविली आहे.—

पण—पण माझा अनियमितपणा देऊन त्याचा नियमितपणा घेण्यास मला कुणीं सांगितलें तर मीं त्याला बिलकूल कबूल होणार नाही. छे! मला ती कल्पनाच कशीशी वाटते. सारा दिवस एखाद्या यंत्राप्रमाणे राबायचं–मला तें जमणार नाहीच आणि त्या दृष्टीने मी प्रयत्न सुद्धा करणार नाही कधी! खरोखर मला कधी कधी कींव येते त्या गृहस्थाची! ठराविक कार्यक्रम ठराविक वेळीं पार पाडावयाचा! किल्ली दिलेल्या घड्याळाप्रमाणे ठराविक वर्तुळांत ठराविक वेळीं जावयाचें–कांही तरी नावीन्य आहे जीवनांत? मला तरी या नीरस आणि रुक्ष जीवनाचा अगदी वीट येईल. ठरविलेल्या कार्यक्रमाबाहेर थोडीसुद्धा इकडे तिकडे हालचाल करावयाची नाही–झापड लावलेल्या घोड्याप्रमाणे इकडे तिकडे न पाहतां सरळ रस्त्याने जावयाचें–आजूबाजूला दिसणारें सृष्टिसौंदर्य, गमती, साऱ्या दृष्टीआड करावयाच्या–किती कंटाळवाणें!

आणि शिवाय सबंध दिवसांत आपण काय काय करणार आहोंत याचा आराखडा आखल्यामुळे आपणाला कार्यक्रमांत नावीन्य कांहीच वाटत नाही–यंत्राप्रमाणे आपण तें काम करतों. पण माझें मात्र अगदी उलट आहे. कोणतेंहि काम करतांना पुढे मी कोणतें काम करणार आहे याची कांही कल्पना नसल्याने मला पुढील कामाबद्दल एकप्रकारची

उत्कंठा वाटते. यामुळे हातीं घेतलेलें काम मी मोठ्या उत्साहाने पार पाडतों. प्रत्येक वेळीं काम करतांना त्या कामाविषयीं पूर्वी कांही न ठरविल्याने त्यांत एकप्रकारचें नावीन्य व पुढील कामाविषयी उत्कंठा, या दुहेरी गोष्टींमुळे मला कधी कधी एखादें काम करतांना अतिशयच उत्साह वाटतो. भविष्यकाळाविषयीचें अज्ञान मनुष्याला सुखदायक वाटतें. नाही का ? आता जर परमेश्वराने पुढील साऱ्या गोष्टीचें ज्ञान प्रत्येक मनुष्याला करून दिलें तर किती लोकांना जगण्यांत अर्थ वाटेल ? साधेंच उदाहरण घ्या–एखाद्या चित्रपटाचें कथानक माहिती नसतांना तो चित्रपट आपण जितक्या उत्कंठेने पाहतों ती उत्कंठा कथानक संपूर्ण माहिती असेल तर राहील का ? थोड्या फार प्रमाणांत आपणाला आपल्या कार्यक्रमाविषयी असेंच म्हणता येणार नाही का ?

आणि शिवाय जग इतक्या विविध, चमत्कारिक, मनोरम व गमतीच्या प्रसंगांनी व तऱ्हेतऱ्हेच्या प्रेक्षणीय वस्तूंनीं भरलेलें आहे की ते सारे प्रसंग अनभवूं म्हटले किंवा तीं सारीं ठिकाणें पाहण्याचें ठरविलें तर जन्म सुद्धा पुरावयाचा नाही. त्यांतून मनुष्याने आपल्या कलाप्रियतेने आपल्या-भोवती सौंदर्याचें व कलेचें एक मनोरम जाळेंच निर्माण केलें आहे. नाट्य-संगीत, चित्रपटसृष्टि इत्यादि कलापूर्ण गोष्टींनी जग भरलें असतां त्या सगळीकडे डोळेझाक करून एका ठराविक साच्याच्या जीवनांतून जावयाचें ! मला माहीत आहे. नियमित मनुष्य ठराविक कार्यक्रमांत बिघाड होतो म्हणून कितीहि सुंदर बोलपट असला तरी त्याला जावयाचें टाळील किंवा कितीहि गायनपटु गायकाचें गाणें असलें तरी तें ऐकण्याचा मोह तो टाळील. एका रुक्ष आणि खडकाळ रस्त्यावरून सरळ जावयाचें फक्त त्याला माहीत आहे. आजूबाजूला रम्य वनश्री आहे–सुंदर फुलझाडें व फळझाडें आहेत–सगळीकडे हिरवेंगार गवत पसरलें आहे–पक्ष्यांचा मधुर किलबिलाट व ओढयांचा मंजुळ ध्वनि ऐकूं येत आहे–फुलांचा सुवास मंद वारा जिकडे तिकडे पसरवतो आहे—पण याच ठराविक

कार्यक्रमाचीं झापडें डोळ्यांना लाविल्याने कदाचित् निसर्गाची रम्य बाजू त्याला दिसत नसावी. कार्यक्रम आपणाकरिता असतो. आपण कार्यक्रमाकरिता नसतो. ही गोष्ट ते अगदीच विसरतात.

आणि म्हणूनच मी त्यांना 'घड्याळाचे दास' म्हणतों. नियमितपणा असावा–नाही असें मी म्हणत नाहीं–पण अनियमितपणा त्याच्या जोडीला असल्याशिवाय त्या नियमितपणाला कांही अर्थ राहत नाही. घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे दररोज त्याच त्याच चाकोरींतून फिरणें यांत कांही गंमत नाही. मनुष्याच्या जीवनांत कांही विविधता–कांही नावीन्य असलं—तरच तें जीवित जगण्यांत आनंद वाटतो. एरवी मग आपणामध्ये अन् एखाद्या यंत्रामध्ये फरक तो काय ?

आपल्या आयुष्याचें घड्याळ करूं पाहणारा असा समोरच्या मनुष्या-सारखा कुणी मनुष्य मला दिसला की, मला त्यांची कांहीशी कीव करावीशी वाटते. आयुष्य विविध तऱ्हेच्या रमणीय गोष्टींनी भरलेलें आहे. याची त्यांना जाणीव तरी असेल का याविषयीं शंका येऊं लागते आणि वाटतें. "पटवून द्यावी यांना थोडी अनियमितपणाची गोडी ! "

पण कितीहि घसाफोड केली तरी त्यांना हें पटेल का ?

' छे ! त्यांना कसें पटावें हें ? कार्यक्रमाच्या ठराविक चाकोरींतून जाऊन त्यांचें मन कसें अगदी यांत्रिक बनलें असेल. त्यांना अनियमितपणाची गोडी कशी कळावी ?

ते मनांत म्हणतील, " काय मूर्ख आहेत लोक ! म्हणे जरा अनिय-मित व्हा ! विनाकारण माझा अर्धा तास वेळ घेऊन माझ्या ठराविक कार्यक्रमामध्ये मात्र व्यत्यय आणला. "

• • •

## ९ : ‘ सुख पर्वताएवढें ’

तुकाराम महाराजांचे अभंग मला फार आवडतात. कंटाळा आला की मी त्यांची गाथा काढून त्यांतील माझ्या आवडीचे अभंग पुन्हा पुन्हा वाचत असतों. अत्यंत श्रेष्ठ संत म्हणून तुकाराममहाराजांविषयी माझ्या मनांत फार मोठा आदर आहे. आणि असें असूनहि त्यांच्या एका विशिष्ट अभंगांतील एक ठराविक ओळ आली की, माझ्या मनाला एकदम ठेच लागल्यासारखें वाटतें. त्यांतील विधान एकदम खटकतें. मनाला तें पटत नाही. आपल्या नित्याच्या अनुभवाला येणारी ही गोष्ट नाही असें वाटूं लागतें. ‘सुख पाहतां जवापाडें। दुःख पर्वताएवढें।’ हीच ती मला खटकणारी ओळ.

तुकारामांनी कोणत्या मनःस्थितींत ही ओळ लिहिली असावी याची कल्पना नाही. आत्यंतिक दुःखाच्या वेदनेने व्याकुळ झालेल्या क्षणीं त्यांच्या तोंडून ही ओळ बाहेर पडली असावी. कदाचित् ‘संसार हा दुःखमय आहे. त्याचा त्याग करा व परमेश्वराला शरण जा.’ असा उपदेश करण्यासाठी त्यांनी ती लिहिली असेल. पण “संसार दुःखमय आहे” असा तुकारामांच्याप्रमाणे सर्वसामान्य लोकांचा अनुभव आहे काय? ‘दुःख पर्वताएवढें आहे व त्या मानाने जीवनांत आपणाला मिळणारें सुख जवसाच्या दाण्याइतकें लहान आहे,’ असें आपणासारख्या सर्वसाधारण माणसांना खरोखरीच वाटतें काय?

इतरांचा काय अनुभव असेल तो असो, मला स्वतःला मात्र तसें वाटत नाही. याचा अर्थ मी सुखामध्ये लोळतों आहें, दुःखाची मला थोडीसुद्धा झळ लागली नाही असा मात्र नाही. अनेक दुःखद प्रसंगांना आजवर मला तोंड द्यावें लागलें आहे. त्यांतील कांही प्रसंगांतील दुःखांचा अनुभव घेत असतांना मी अगदीं गडबडून गेलों असल्याचीहि मला आठवण आहे. एका प्रसंगीं तर दुःख असह्य झाल्यामुळे ‘नको हें

जीवन ' असेंहि मला वाटावयास लागलें होतें. पण तें दुःख संपलें, त्या दुःखाच्या वेदनाहि विसरल्या आणि पुढील क्षणाच्या आनंदाचा व सुखाचा आस्वाद घेण्यास मी सिद्ध झालों. एरवीं येणाऱ्या सुखापेक्षा दुःख अनुभविल्यानंतर आलेल्या सुखाचा आनंद किती तरी पटीने अधिक असतो याची त्याच वेळीं मला जाणीव झाली. तहानेच्या वेदना अनुभवल्या म्हणजे पाण्याची खरी गोडी कळते. भुकेने आंतडीं कुरतडूं लागलीं म्हणजे अन्न हें परब्रह्म असल्याचा साक्षात्कार आपणाला होऊं लागतो. सुखाचेंहि पण तसेंच नाही काय?

आणि समजा दुःख पर्वताएवढें असलेंच तरी पर्वत चढून जाण्यांत एक प्रकारचा आनंद आणि पराक्रमाची जाणीव आपणाला होत नाही काय? शिवाय पर्वताच्या शिखरावर चढून गेलें म्हणजे डोळ्याचें पारणें फेडणारा जो सुंदर देखावा दिसतो त्यापासून मिळणाऱ्या आनंदाची सर कशाला तरी येईल काय? त्या निसर्गसुंदर दृश्यांचा आनंद मनमुराद लुटत असतांना पर्वत चढून येत असतांना झालेल्या वेदनांची आणि श्रमाची जाणीव आपणाला होतें काय? दुःखाच्या पर्वताचें तसेंच आहे. मोठ्या कष्टाने दुःखाचा पर्वत आपण चढूं–चढतांना आपणाला पुष्कळ श्रम होतील. पण शिखरावर चढल्याचा आनंद व अभिमान मनाला काय कमी सौख्य देतात? 'मी म्हणून हें सर्व सहन केलं!' असे धन्यतेचे उद्गार काढतांना आपणाला होणारा आनंद उपभोगलेल्या दुःखापेक्षा किती तरी पटीने अधिक असतो. शिवाय 'दुःख पर्वताएवढें' असें म्हणतांना दुसराहि एक फायदा आपणाला डोळ्याआड करतां येणार नाही. पर्वताच्या शिखरावर चढलें म्हणजे ज्याप्रमाणे जगाचा फार मोठा विस्तार आपणाला दिसतो त्याप्रमाणे दुःखाच्या पर्वतशिखरावर चढलें म्हणजे जगाचा फारच व्यापक अनुभव आपणाला येतो. आपल्या मनाचीं क्षितिजें अधिक विशाल होतात. जगांतील दुःखी आणि दुर्दैवी माणसांबद्दल आपणाला सहानुभूति आणि आत्मीयता वाटावयास लागते.

जगाचें खरें स्वरूप आपणाला कळतें. दुःखापासून मिळणारें हें जें जीवनाविषयीचें व्यापक ज्ञान त्यांची किंमत आपण भोगलेल्या दुःखापेक्षा किती तरी पटींने अधिक आहे. दुःखापासून मिळालेलें हें सुख ‘जवापाडें’ का म्हणावयाचें ?

पण मुळांतच जगांत ‘दुःख पर्वताएवढें’ आहे असें समजण्याची माझी तयारी नाही. उलट दुःख हें जवाप्रमाणे आहे आणि सुख हें पर्वताएवढें आहे असें मला आग्रहाने सांगावयाचें आहे. तें पटवून देण्यासाठी आपणाला फार दूरवर जावयास नको. तुम्ही आता जीवनाच्या ज्या टप्प्यावर उभे आहांत त्या टप्प्यावरून जरा मागे वळून पाहा, आणि सारा जीवनाचित्रपट नजरेसमोर आणा. तुम्हाला त्यामध्ये कोणकोणत्या गोष्टी प्रामुख्याने आठवतात ? बाल्यांतील सुखाचा काळ तुम्हाला आठवेल, आईच्या आपल्यावरील प्रेमाचें तुम्हाला स्मरण होईल, परीक्षेंत उत्तम यश मिळविल्याबद्दल गुरुजींनी व वडिलांनी केलेल्या कौतुकाची तुम्हाला आठवण होईल. बाल्याकडून तारुण्याकडे वळलात तर तुमच्या जीवनाच्या सहचरीची व तुमची प्रथम भेट आणि त्या वेळीं अनुभवलेला सुखद संभ्रम तुम्हाला आठवेल, पहिल्या अपत्यलाभाच्या वेळच्या गोड भावनांची तुम्हाला आठवण होईल, नोकरींत किंवा धंद्यांत जे जे पराक्रम तुम्हीं गाजवले असतील ते सर्व तुमच्या डोळ्यासमोर उभे राहतील. या गोष्टी दुःखाच्या का आहेत ? ‘–दुःख पर्वताएवढें’ असतें तर हे पर्वत तुमच्या आठवणीच्या मार्गांत आडवे नसते का पडले ? मागे वळून पाहतांना दिसणारे हे सारे पर्वत सुखाचे असले तर ‘दुःख पर्वताएवढें’ अशी हाकाटी करण्यांत काय अर्थ आहे ?

आपण भावी जीवनाचीं चित्रें ज्या वेळीं रंगवूं लागतों त्या वेळीं तरी आपल्या स्वप्नसृष्टींत काय आढळतें ? भावी जीवनाची कल्पना करतांना आपण कधी दुःखाचीं चित्रें रंगवितों का ? आपणावर पुढे अमकी आपत्ति येईल, अमकें संकट ओढवेल, आपणाला अमकें दुःख सहन करावें लागेल

असा भावी जीवनाविषयीं चित्रें रंगवितांना आपण विचार तरी करतों का ? आपल्या प्रत्येकाच्या जीवनांतील जी अटळ घटना–मृत्यु–तिचासुद्धा आपण कधी विचार करीत नाही. परिस्थिति कितीहि बिकट असली तरी भविष्यकाळाचीं आपण रंगवीत असलेलीं चित्रें अत्यंत सुखदायकच असतात. परीक्षेच्या मंडपामध्ये परीक्षा देण्यासाठी निघालेला उमेदवार कधी 'आपण नापास होणार' अशीं चित्रें रंगवितो का ? अपत्यजन्म झाल्याबरोबर तो पुढे फार मोठा कसा होणार आहे व आपणाला वृद्धपणीं सुख कसें देणार आहे याचींच चित्रें त्याचे आईबाप रंगवीत नाहीत काय ? विवाह-प्रसंगीं परस्परांच्या गळ्यांत माळ घालतांना भावी संसाराचीं रम्य स्वप्नें वधूवरांच्या मनांत साकार होत नाहीत काय ? अशा भावी सुखद स्वप्नांत आपण रमतों आणि वर्तमानकाळचें दुःख विसरतों. हें जर खरें आहे, तर 'सुख जवापाडें' असें कां मानावयाचें ?

वर्तमानकाळांतील दुःख अनेकदा आपणाला त्रास दायक होतें हें खरें आहे. पुष्कळदां तें असह्य वाटूं लागतें व अशा वेळीं 'दुःख पर्वताएवढें' ही तुकारामाची उक्ति आपणाला पटूं लागते. पण तीच तर आपली खरी परीक्षा आहे. हीं दुःखें जीं येतात तीं आपली कसोटी पाहण्यासाठींच. त्या वेळीं न डगमगणें हाच खरा पुरुषार्थ. भट्टींतून तावून सुलाखून निघाल्याखेरीज सोन्याला तेज चढत नाही किंवा टाकीचे घाव सोसल्या-खेरीज दगडाला देवपण येत नाही हें आपणाला माहीत नाही काय ? पैलू पाडल्याशिवाय हिऱ्याला सुद्धा किंमत येत नाही. आपणावर कोसळ-णारीं दुःखें हीं अशींच आपल्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडण्यासाठी निर्माण झालीं आहेत असें आपण कां समजूं नये ? शिवाय असं पाहा, जगांत दुःखं आहेत म्हणूनच सुखाची किंमत आपणाला कळते ना ? जगांत अंधारी रात्र आहे म्हणूनच पौर्णिमेच्या चंद्राला महत्त्व. दुर्गुणी माणसं जगांत आहेत म्हणून सद्‌गुणी माणसांना मान आहे. त्याचप्रमाणे दुःख आहे म्हणून जगांत सुखाचें महत्त्व आहे असें तुम्हाला नाही वाटत ?

नुसतं गोड जेवण जेवण्याचा तुम्हीं कधी प्रयत्न केला आहे काय? नुसत्या गोडाने तोंडाला कशी मिठी बसते हें तुम्हाला माहीत आहेच. केवळ सुखच जगांत असलं तर अशीच आपली स्थिति झाली नसती का? शिवाय दुःखानंतर सुख आलं म्हणजे त्याची लज्जत कांही न्यारीच असते असा अनुभव कुणाला नाही? परीक्षेसाठी मर मर कष्ट केल्यानंतरच निकालाच्या आनंदाची खरी गोडी आपणाला कळते. प्रसव-वेदनांच्या दिव्यांतून गेल्यानंतर अपत्यदर्शनाचा मातेला होणारा आनंद त्या वेदनांच्या अनुभवांपेक्षा किती तरी पटींने अधिक असतो याची साक्ष कोणतीहि माता देईल. असें जर आहे तर वर्तमानकाळच्या दुःखाबद्दल आपण कुरकूर कां करावी आणि ‘ दुःख पर्वताएवढें ’ असें कां मानावें?

शिवाय या जगांत आनंद देणाऱ्या इतक्या गोष्टी आपल्या आवती-भोवती आहेत की त्यांच्या सान्निध्यांत दुःखाची आठवणसुद्धा आपणाला होऊं नये. सकाळच्या वेळीं तुम्ही पुष्कळ वेळां फेरफटका करण्यासाठी गांवाबाहेर पडलां असाल. पूर्वदिशा त्या वेळीं केवढा सौंदर्याचा साज लेवून सूर्याच्या स्वागतासाठी उभी असतें हेहि तुम्हीं पाहिलें असेल. सृष्टीचें स्वरूप तरी त्या वेळीं किती प्रसन्न असतें. त्या वेळीं दिसणारें अलौकिक सृष्टिसौंदर्य तुम्हाला मोह पाडीत नाही? उषःकाळच्या वैभवा-प्रमाणेच संध्यासमयीचें सृष्टिवैभव सुद्धा किती विलोभनीय असतें! सूर्य अस्ताला जात असतां पश्चिम दिशेला क्षणाक्षणाला बदलणाऱ्या रंगांचें सौंदर्य पाहत असतांना कुणाचें देहभान हरपून जात नाही? त्याप्रमाणे रात्रीच्या वेळी आकाशांत प्रगट होणारें तारकांचें वैभव, शरद् ऋतूंतील चांदण्याचें सौंदर्य, रात्रीचें सौंदर्य, वर्षाऋतूंतील पहिल्या पावसाची मादकता एक ना दोन! सारी सृष्टि सौंदर्याने नटून आपणापुढे उभी आहे. क्वचित ती उग्र रूप धारण करते—पण त्या तिच्या उग्र स्वरूपांतहि सौंदर्य भर-लेलें असतें. वादळामुळे खवळलेल्या दर्याच्या पर्वतप्राय लाटांचें तांडवनृत्य पाहत असतांना भीति आणि सुख या दोन्ही भावनांचा अनुभव कुणाला

येत नाही ? सृष्टींतील सौंदर्य विविधतेने नटलें आहे. कुठे तें कोमल रूप धारण करीत असेल, तर कुठे उग्र रूप धारण करीत असेल, तर कुठे भव्यतेचा प्रत्यय आणून देत असेल. पण ही सारीच विविधता मनाला अत्यंत मोह पाडते यांत शंका नाही. अशीं हीं सारीं सौंदर्ये आपणाभोवती सतत दिसत असतांना जगांत पर्वताएवढें दुःख आहे असें म्हणावें म्हणजे हीं सर्व सौंदर्यें निर्माण करणाऱ्या परमेश्वराविषयी कृतघ्नताच व्यक्त करणें नाही काय ?

सृष्टिसौंदर्याबरोबरच मानवी कलेच्या विदग्धतेनेहि जगांत काय कमी सौंदर्याची भर घातली आहे ? भाव-सौंदर्य आणि विचार-सौंदर्य आपल्या कलेंतून व्यक्त करणारे मोठमोठे साहित्यिक आपणांमध्ये आहेत, नाद-सौंदर्य व्यक्त करणारे मोठमोठे संगीतज्ञ आपणांत आहेत, आकृतिसौंदर्य व्यक्त करणारे मोठमोठे चित्रकार व शिल्पकारहि आपणामध्ये आहेत. शेक्सपियरचीं किंवा कालिदासाचीं नाटकें वाचतांना, हिराबाईचें गाणें ऐकतांना, उदयशंकरचें नृत्य पाहत असतांना, दलालांचीं किंवा बाबूराव पेंटरची चित्रकला बघत असतांना किंवा बालगंधर्वाचा रंगभूमीवरील अभिनय बघत असतांना ज्या बेभान मनोवृत्तीचा अनुभव आपण घेतों त्याचें वर्णन तरी कुणाला करतां येईल काय ? आणि तरी आपण म्हणतों, ‘ सुख पाहतां जवापाडें ’ म्हणून !

त्याचें खरें असें आहे, दुःख काय किंवा सुख काय, तें मिळविणें बहुतांशीं आपल्या वृत्तींवर अवलंबून आहे. दुःखाच्या ओझ्याखाली दडपून गेलेलीं माणसेंसुद्धा अनेक वेळां अतिशय प्रसन्न मनोवृत्तीचीं असतात तर सुखांत लोळणारीं माणसें पुष्कळदा दुःखी, किरकिरी अशीं असतात. मला माझ्या एका मित्राचें उदाहरण आठवतें. सतत त्याचा चेहेरा रडवा. कितीहि आनंदाची गोष्ट घडली असली तरी त्याच्या चेहेऱ्यावर हास्य उमटायाचें नाही. एकदा लोकसत्तेच्या शब्दस्पर्धेत पहिल्या क्रमांकाच्या बक्षिसाच्या यादींत त्याचें नांव आलें. त्याला आठ हजार रुपये बक्षीस

मिळाले होते. आता तरी तो खुषींत असेल म्हणून त्याचें अभिनंदन करण्यासाठी मी त्याच्या घरीं गेलों तर स्वारीचा चेहेरा आपला रडवाच. "अरे, सहजासहजी आठ हजार रुपये मिळाले तरी तुझा चेहेरा रडवाच? तुझं नांव चुकून छापलं गेलं असल्याची तार तर नाही ना आली तुला?" असें मी विचारल्यावर अधिकच रडवा चेहेरा करून तो म्हणाला, "बक्षिस मिळालं रे! पण तें तिघांच्या भागीदारींत! काय नशीब आहे पाहा! कधी नाहीं तें सर्व कोडं बरोबर यावं आणि २४००० चें पहिलं बक्षीस मिळण्याऐवजीं भागीदारी वाट्याला यावी. नशिबच फुटकं, त्याला कोण करणार?" त्याचें हें भाषण ऐकून हसावें की रडावें हेंच कळेना. असल्या वृत्तीच्या माणसाला सर्व जग दुःखमय वाटत असल्याची सतत जाणीव झाली तर नवल कोणतें? सतत नवीं नवीं दुःखें कल्पनेनें आपणापुढे उभी करून त्यांतच सुख मानणाऱ्या माणसांची एक जात असते ना? कोणतीहि दुःखद घटना घडली की त्यांना त्यांतच आनंद वाटतो. 'मीं सांगितलं नव्हतं असं होईल म्हणून?' असें अभिमानाने सांगण्यांत व आपणावर कोसळलेल्या दुःखांतच आनंद मानण्यांत त्यांना सार्थकता वाटते. हीं माणसें सुखांत असलीं तर पाण्याबाहेर पडलेल्या माशाप्रमाणे तडफडत असतात. जणू दुःखांतूनच तें आपला जीवनरस शोषून घेत असतात.

अशीं माणसं स्वतःहि दुःखी राहतात आणि दुसऱ्यांनाहि दुःखी करतात. 'किर्लोस्कर' मध्ये मागे एक व्यंगचित्र आलें होतें. दोन माणसांसमोर कोणत्या तरी पेयाने अर्धा भरलेला पेला होता. त्यांपैकी एकजण 'माझा अर्धा पेला रिकामा' म्हणून शोक करीत होता आणि दुसरा 'माझा अर्धा पेला भरलेला' म्हणून उल्हसित होता. जग हें असेच दोन प्रकारच्या माणसांनी भरलें आहे. पहिल्यांना तुकाराम महाराजांचे सुखदुःखाविषयींचें विधान पटतें. पण दुसरा त्या म्हणीच्या आहारीं जात नाही. 'पर्वताएवढें दुःख' कोसळलें तरी त्याची प्रसन्न

वृत्ति ढळत नाही. जीवन जगण्यांत विलक्षण आनंद आहे आणि सुखाची गोडी दुप्पट वाढविण्याकरिताच मधून मधून दुःखें येत असतात अशी त्याची दृढ श्रद्धा असते. आणि अशींच माणसें जगाचें नंदनवन करूं शकतात. जगांत असलेल्या आनंदाकडे पाठ फिरवायची आणि आंबट व सुतकी चेहेरा करून दुःख तेवढें चिवडीत बसावयाचें ही वृत्ति अत्यंत अनिष्ट आहे असें नाही वाटत? दुःखाच्या राईचा असे लोक पर्वत करतात. उलट 'पर्वताएवढें दुःख अंगावर कोसळलें तरी मी तें जवाप्रमाणें मानीन—' असा विलक्षण आशावाद असणारा मनुष्यच स्वतःच्या व इतरांच्या जीवनांत आनंद निर्माण करीत असतो. जग हें सौंदर्याने भरलेलें आहे, निसर्गांत जिकडे तिकडे चैतन्य व उत्साह भरलेला आहे, मानवानेहि आपल्या प्रतिभेने व बुद्धिमत्तेने पृथ्वीचें नंदनवन बनविण्याचा प्रयत्न चालविला आहे. असें असतांना 'दुःख पर्वताएवढें' असा विलाप करणाऱ्यांना काय म्हणावयाचें? 'दुःख पर्वताएवढें असेल' तर मग सुख हे आकाशा-एवढें आहे असेंच म्हणावें लागेल. अशा वृत्तीने जीवन जगण्यांत विलक्षण आनंद आहे. निदान मला तरी तसें वाटतें. आणि म्हणूनच संदेश देण्याइतका कधी काळीं मी मोठा झालोंच तर लोकांना 'दुःख पाहतां जवापाडें। सुख पर्वताएवढें।—या वृत्तीने जगांत जगा' असाच मी संदेश देईन.

• • •

## १० : निसर्ग आणि आम्ही

कॉलेजमध्ये निघालों त्या वेळीं आकाशांत काळे ढग इतस्ततः फिरत होते मधून मधून गर्जतहि होते. पण मीं तिकडे दुर्लक्षच केलें. 'गर्जेल तो पडेल काय?' ही म्हण कदाचित् त्या वेळीं माझ्या मनांत आली असावी. तें कांहीहि असो—छत्रीवर भिस्त ठेवून व ढगांच्या निष्क्रियते-वर भरंवसा टाकीत मी मधल्या मार्गाने घाईने कॉलेजांत निघालों. कॉलेजचा निम्मा मार्ग सुरक्षित रीतीने आक्रमला. आता फक्त अर्ध्या मैलाचें अंतर उरलें होतें–तेवढें अंतर कापलें की...

आणि तेवढ्यांतच निसर्गाने आपला पवित्रा बदलला. मीं केलेली उपेक्षा त्यांना जाणवली की ' गर्जेल तो पडेल काय? या म्हणीला खोटें पाडण्याचा त्यांनी चंग बांधला कुणास ठाऊक ?-एकाएकी चोहों-बाजूंनी काळेकुट्ट ढग जमून आले आणि कोणत्याहि रीतीची पूर्वसूचना न देतां त्यांनी टपोऱ्या थेंबांचा वर्षाव सुरू केला. त्यांना साहाय्य देण्यासाठी प्रचंड वेगाने वाराहि धावून आला.

मीं मोठ्या गडबडीने छत्री उघडली–आणि ती वाऱ्याच्या प्रचंड झोताने एकदम उलटी झाली. वाऱ्याचा आणि पावसाचा जोर इतका विलक्षण वाढला की कोणत्याहि दणकट छत्रीचें या पावसापुढे कांही चालेल असें वाटेना. माझी मोठी विलक्षण परिस्थिति झाली. माझ्यापुढे अर्धा मैल सपाट मैदान पसरलें होतें, मागे अर्धा मैल सपाट मैदान पसरलें होतें. आजूबाजूला झाडच काय, पण झुडूपहि नव्हतें. वादळांत सांपडलेल्या सोमदत्तासारखी माझी असहाय स्थिति झाली होती.

पण मला वाईट वाटत होतें तें निराळेंच. आमची सौभाग्यवती नको नको म्हणत असतांना आज गरम वुलनचा चांगला कोट घालून मी

बाहेर पडलों होतों. तो आता भिजून चिंब होणार होता. माझ्या पिशवींत घेतलेलीं माझीं आवडतीं पुस्तकें आता भिजून जाणार होतीं—आणि माझ्या पायांतील सुंदर बुटांवर दोन दोन इंच खानदेशी चिक्कणमातीच्या चिखलाचा थर चढणार होता. मनांतल्या मनांत मी स्वतःला, पावसाला आणि मला चुकून अगदी वेळेवर गेलेल्या बस्‌ला लाखोली वाहिली—पण आता स्वतःवर किंवा निसर्गावर चिडून काय फायदा होता? पुढच्या किंवा मागच्या दिशेने पावलें वळविणें आणि पावसाचा मार सहन करीत कॉलेज किंवा घर जवळ करणें क्रमप्राप्तच होतें. कॉलेजमध्ये या अवतारांत जाऊन व्याख्यान देणें अशक्यच होतें—मीं मागे वळून घराकडेच पावलें वळविलीं.

कोटांची—पुस्तकांची—बुटांची आशा मी आता सोडूनच दिली होती. छत्री मिटवून टाकली व अपरिहार्यतेला तोंड देण्याच्या दृष्टीने मीं पावलें टाकायला सुरुवात केली. पावसाचा जोर वाढतच होता. वाऱ्यानेहि आपला प्रभाव दाखवायला सुरुवात केली होती. सप्—सप्—सप्—माझ्या चेहेऱ्यावर व अंगावर पावसाचा मारा होत होता. मी जात होतों ती पायवाट एका शेतांतून जात होती. त्या ठिकाणचा चिवट चिखल इतका विलक्षण होता की, अनेक वेळां बूट चिखलांतच रुतून राही आणि पाय फक्त बाहेर येई. पुन्हा पाय त्या बुटांत घालून बुटासह तो पाय बाहेर काढणें म्हणजे एक प्रकारचें दिव्यच होत होतें.

अर्धा फर्लांग गेल्यावर मी माझ्या चिडक्या मनोवृत्तींतून बाहेर आलों—या सर्व वादळी परिस्थितींतहि मला अतिशय अननुभूत असा आनंद वाटायला लागला. आतापर्यंत मीं जवळ जवळ चाळीस पावसाळे पाहिले होते—असें मुसळधार पावसाचें दृश्य तर शेकडो वेळां पाहिलें असेन—पण अशा पावसांत मनसोक्त भिजण्याचा आनंद मी पहिल्यानेच अनुभवीत होतों. पाऊस आला तर शक्य तों घरांतून निघावयाचेंच नाही—आणि मध्येच पावसाने गांठलें तर शक्य तितक्या तांतडीने

आश्रयस्थान जवळ करायचें हा माझा आतापर्यंतचा शिरस्ता. पावसांतून जातांना कपडे भिजूं नयेत–अंगावर चिखल उडूं नये म्हणून जास्तींत जास्त दक्षता घेण्याची काळजी. त्यामुळे निसर्गाच्या या आनंदाचें मी आतापर्यंत त्रयस्थपणाने व तटस्थपणानेच कौतुक करीत होतों. पण त्या निसर्गाच्या भव्य व प्रचंड आंदोलनांत समरस होण्याचा, त्याच्याशीं एकरूप होण्याचा आनंद केवढा मोठा आहे याची मला त्या दिवशीं कल्पना आली. पावसाचा माझ्या चेहेऱ्यावर सपासप होणारा मारा मला अतिशय सुखावह वाटायला लागला–चिखलांत होणाऱ्या घसरगुंडींत आणि कसरतींतहि मोठी मौज वाटूं लागली. माझ्या प्रतिष्ठेचें व हिशेबी वृत्तीचें ओझें दूर फेकून देऊन मी जणू निसर्गाच्या या क्रीडेंत सामील झालों. सर्व कपडे चिंब–भिजून गेले–शरीराला त्याचा होणारा गार स्पर्श मोठा सुखद वाटूं लागला. पाण्याचे मोठमोठे ओहोळ शेतांतून वाहत होते. त्यांतून अवखळपणाने पाणी उडवीत जाण्यांत मोठ्या विलक्षण आनंदाचा अनुभव मी घेऊं लागलों. भोवताली मीं पाहिलें–आकाशांतून जणू सहस्र धारांनी वर्षाव होत होता. सारी सृष्टि पाण्याने न्हावून निघाली होती. सृष्टीबरोबर मलाहि अभ्यंगस्नान घडत होतें. आणि त्या चिंब भिजून जाण्यांत मला अननुभूत आनंद वाटत होता.

माणसाच्या मनावर असलेल्या प्रतिष्ठेच्या व व्यावहारिक गोष्टींच्या दडपणामुळे अशा प्रकारें किती आनंदाला तो मुकत असेल याची मला या वेळीं जाणीव झाली. आपण आपलें जीवन अनेक वेळां रुपये-आणे-पै यांच्या हिशेबांत बसविण्याचा प्रयत्न करतों. प्रतिष्ठेची आपणाभोवती खरीं खोटीं वलयें निर्माण करतों आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या चाकोरीला जीवन असें नांव देऊन त्या जीवनांतच आनंद मानण्याचा आपण प्रयत्न करतों. त्या चाकोरीच्या बाहेर जाणारें, हिशेबी वृत्तीला धक्का देणारें, प्रतिष्ठेच्या वलयांतून बाहेर पडणारें थोडें जरी कांही घडलें, तर आपण

अस्वस्थ होतों. आणि कांही तरी चुकल्याची, कांहीं तरी अनिष्ट घडत असल्याची जाणीव आपण करून घेतों.

जीवनांत किती वेळां आपण मनसोक्त पावसांत भिजावयाचेंच, या कल्पनेने पावसांत छत्री न घेतां बाहेर पडलों आहोंत? 'आनंदी आनंद गडे ! जिकडे तिकडे चोहिंकडे ।' असा बालकवि आपणाला संदेश देतात. पण निसर्गांतील हा आनंद लुटण्यासाठी आपणापैकी कितीजण बाहेर पडतात? संध्याकाळीं घाईघाईने निघालेल्या एखाद्या गृहस्थास 'कुठे जातोस?' असें आपण विचारलें आणि '–सूर्यास्त पाहावयास मी जातों आहें' असें त्याने उत्तर दिलें तर आपण निश्चित 'आ' करून त्याच्याकडे पाहात राहूं. अरुण, संध्यारजनी, कौमुदी वगैरे सृष्टि-देवीचीं बालकें शेवटीं बालकवींच्या कवितेंत राहतात. आणि आम्ही चांदण्या रात्रीं विजेच्या दिव्याच्या कृत्रिम प्रकाशांत 'रमी' खेळण्यांत रमून गेलेलों असतो. 'फुलराणी' शिकवितांना मी साऱ्या विद्यार्थ्यांना गुंगवून सोडल्याचें मला आठवतें. पण वेलीवरच्या कोमल कलिकेचें सौंदर्य पाहण्याला मी कधी थांबलों असल्याचें मला आठवत नाही. निर्झराच्या गोड गीतांत बालकवींना दिसलेला अर्थ मीं विद्यार्थ्यांना कितीदा समजावून सांगितला असेन. पण निर्झराच्या कांठाशीं त्याचीं अवखळ गीतें ऐकत मी कधी उभा राहिल्याचें मला आठवत नाही.

याचें कारण एकच—जीवनाची एक चाकोरी मीं ठरविली आहे, प्रतिष्ठेचें एक कवच माझ्या अंगावर मीं चढविलें आहे. रुपये-आणे-पै चा आवाज माझ्या कानांत घुमतो आहे. अशा स्थितींत निसर्गाचा भव्य साक्षात्कार घ्यावयास मला सवड कुठून मिळणार? परवाच मी मुंबईहून जनता एक्स्प्रेसने पुण्याला जात होतों. पावसाळ्याचे दिवस होते. गाडी खंडाळ्याच्या घाटांतून जात असतांना सृष्टीने मोठे भयानक रूप धारण केलें होतें. मुसळधार पाऊस पडत होता–पाण्याचे मोठमोठे प्रवाह पर्वत-शिखरावरून खाली कोसळतांना अंधुक दिसत होते. गाडी जवळ जवळ

ढगांतूनच जात होती. वर्षाऋतूचें चाललेलें तें तांडवनृत्य खरोखर अलौकिक होतें. पण मी मात्र खिडकी मिटून बसलों होतों—कारण काय तर खिडकी उघडली असती तर पावसाचें पाणी आंत आलें असतें आणि माझा नवा सूट खराब झाला असता. शिवाय सर्वांनीच खिडक्या बंद केल्या होत्या–तेव्हा मीच माझी खिडकी उघडी ठेवून पावसाचा वर्षाव झेलला असता तर लोक माझ्याकडे कुतूहलाने आश्चर्याने आणि उपहासानेहि बघूं लागले असते. मला त्याचीच अधिक भीति वाटली आणि काचेच्या तावदानांतून जेवढें निसर्गाचें सौंदर्य दिसत होतें तेवढें पाहण्यांत मी समाधान मानूं लागलों. बाहेर टिपूर चांदणें पडलें असतांनाहि काव्यांतील किंवा कादंबरींतील चांदण्याचीं वर्णनें विद्युद्दीपाच्या प्रकाशांत मिटक्या मारीत वाचणारे रसिक आम्ही ! निसर्गाच्या भव्य सौंदर्याशीं समरस होण्याची पात्रता आमच्या ठिकाणीं नाही. आणि तशी इच्छाहि नसते. आमची सर्व रसिकता कृत्रिम व नकली सौंदर्याचें कौतुक करण्यांत गुंग होऊन गेलेली ! बोलपट-गृहाच्या काळोखांत पडद्यावर दिसणाऱ्या प्रचंड वादळाचें, रम्य चांदण्याचें किंवा गर्द वृक्षराजीचें कौतुक आम्ही भरपूर करूं–पण बोलपट-गृहांतून बाहेर पडल्याबरोबर पाऊस येत असेल तर आम्ही कपडे सावरून, पावसाचा एकहि थेंब अंगावर येणार नाही अशा बेताने आणि रस्त्यावरून वाहणारे नदीनाले चुकवीत लवकर घराच्या आडोशाला जाण्याचा प्रयत्न करूं. आणि घरच्या उबेंत पावसांत भिजून चिंब होणाऱ्या वसंतसेना व चारुदत्ताचीं चित्रें नजरेसमोर आणूं, अशी आमची रसिकता.

निसर्गाच्या भव्यतेचा आणि सौंदर्याचा आम्हाला प्रत्यय येत असेल तर तो केवळ अपघाताने. पंचपंच उषःकालीं सृष्टींत जें नवचैतन्य निर्माण झालेलें असतें आणि निसर्गाने जो अपूर्व सौंदर्याचा साज चढविलेला असतो त्याचीं वर्णनें काव्यांतून आणि कादंबऱ्यांतून मीं अनेकदा वाचलीं असतील. तीं त्या त्या वेळीं मला फार आवडलींहि होतीं. पण प्रत्यक्ष

उषःकालची सृष्टिशोभा पाहण्याचा योग मात्र प्रवासांत आला. तोहि गाडींत गर्दी खूप होती आणि झोपायला जागा नव्हती म्हणून. आम्ही त्या वेळीं मुंबईला चाललों होतों. कसेबसे दाटीदाटीने आम्ही दोघेहि खिडकीजवळ बसलों होतों. झोप न मिळाल्याने डोळे जड झाले होते. आणि प्रवासांतील गप्पांची शिदोरी केव्हाच सरून गेल्याने आम्ही दोघेहि बाहेर पाहत होतों. कसारा घाटांतून त्या वेळीं गाडी चालली होती. अर्धवट काळोखांत आणि अर्धवट धुक्यांत पर्वताच्या एकामागून एक रांगा मोठ्या भव्य दिसत होत्या. इतक्यांत पूर्वेच्या क्षितिजावर प्रकाशरेखा दिसूं लागली–हळूहळू अरुण रंगाने तो सर्व भाग माखून निघाला— क्षितिजाच्या जवळपास रेंगाळणाऱ्या ढगाचे रंग पटापट बदलूं लागले– जणू एखादा चित्रकार आपल्या चित्रासाठी निरनिराळ्या रंगांचीं मिश्रणेंच तयार करीत होता. आणि हळूहळू क्षितिजाच्या आडून कांही चोरटे किरण वर आले अरुण रंगाचें रूपान्तर-पटापट-पिवळसर रंगांत होऊं लागले, आणि सूर्याची एक तांबडीलाल कडा क्षितिजावर दिसूं लागली. हळूहळू आमच्या डोळ्यादेखत सूर्य वरवर येऊं लागला. क्षणभर क्षितिजाच्या कडेवर तें लालभडक सूर्यबिंब टेकलें आणि त्यानें आपला प्रवास सुरू केला. जरा वर जातें न जातें तोंच तेथें रेंगाळणाऱ्या एका ढगाचें पांघरूण त्याने घेतलें. सारा मेघ तेजाने न्हावून निघाला–त्याला जणू चंदेरी झालर लावल्याचा भास होऊं लागला. हा सर्व देखावा आम्ही मुग्ध होऊन पाहत होतों. ‘ काय सुंदर देखावा आहे ! ’ असे उद्गार हा देखावा बघत असतां कितीदा आमच्या तोंडून बाहेर पडत होते. असा देखावा दररोज दिसत असतो. या आनंदाला आपण आतापर्यंत मुकत होतों याची जाणीव आम्हाला झाली. पण याची फक्त जाणीवच झाली त्यापलीकडे कांही झालें नाही. त्यानंतर एकदाहि सूर्योदयाचा किंवा सूर्यास्ताचा देखावा आम्ही रसिकतेने पाहिल्याचें आम्हाला स्मरत नाही.

चांदण्याचें सौंदर्यहि अशाच अपरिहार्य रीतीने आमच्या नजरेला पडलें होतें. त्या दिवशीं रात्रीं कॉलेजमध्ये नाटक होतें. नाटक बारा वाजतां संपलें. बाहेर उभ्या असलेल्या बसेस् अगोदर भरून गेल्या होत्या. आता दीड मैल चालत जाण्यावाचून गत्यंतर नव्हतें. आम्ही सर्वजणांनी-मनांत कुरकुरत-चालत जाण्याचा निश्चय केला. आणि त्या वेळीं बाहेर पसरलेल्या सृष्टिसौंदर्याची आम्हाला कल्पना आली. चांदणें अगदी टिपूर पडलें होतें, जिकडे तिकडे शुभ्र दुधाचा वर्षाव होत असल्याचा भास होत होता. पांढऱ्या शुभ्र तेजांत चराचर सृष्टि न्हावून निघाली होती. अपूर्व सृष्टि-शोभेने आम्ही अगदी मुग्ध होऊन गेलों. एखाद्या स्वप्नसृष्टींत विहार करावा असें आम्हाला रस्त्यावरून जातांना वाटूं लागलें. कुणाच्या तोंडून शब्द उमटत नव्हता. जो तो निसर्ग सौंदर्याच्या या अपूर्व विलासाचें निःशब्द कौतुक करीत होता. मला दत्तांच्या ‘ विश्वामित्रीच्या कांठीं ’ या कवितेची त्या वेळीं आठवण झाली.

पाऊस बर्फाचा जणु पडतो
रजताचा जणु मेघ वितळतो
किंवा चंद्रमणी पाझरतो
न कळे कांही । जिव वेडावुन हा जाई ॥

अशी अक्षरशः आमची स्थिति झाली. या मनःस्थितींत घर केव्हा आलें हें कळलेंहि नाहीं. घर आल्याबरोबर स्वप्नसृष्टींतून एकदम जागे झाल्याप्रमाणे जागे होऊन अगदी अनिच्छेने आम्हीं घरांत प्रवेश केला.

निसर्गाशीं समरस होण्याचे—त्याच्या सौंदर्याचा व भव्यतेचा आस्वाद घेण्याचे प्रसंग आमच्या जीवनांत असे अपघातानेच येतात. निसर्गाच्या भव्यतेचा साक्षात्कार त्या वेळीं आम्हाला पटतो व त्याचा सतत आस्वाद घेण्याचा व त्याच्याशीं समरस होतांना—

“ दिव्यरसीं विरणें जीव
जीवित हें त्याचें नांव ”

अशा वृत्तीचा अनुभव घेण्याचा पुन्हा पुन्हा आम्ही निश्चय करतों-पण व्यवहारी जीवनाच्या चाकोरींत सांपडलों की ते सारे निश्चय विरून जातात आणि रुपये-आणे-पै च्या नादावर मन धावूं लागतें.

आणि अशा रीतीनें धावतांना तें थकलें व धापा टाकूं लागलें कीं या अपघाताच्या स्मृतीचा जो आनंद तोच आमच्या मनाचा खरा दिलासा !

आणि म्हणूनच पावसांत चिंब भिजून परत येत असतांना पावसांत भिजल्याचा जो आनंद मीं मिळविला आणि जो पुढील जीवनांत स्मृति-रूप होऊन मला सततचें सौख्य देणार आहे, त्या आनंदापुढे वुलनचा कोट भिजल्याचें किंवा पुस्तकें भिजून अगदी खराब झाल्याचें दुःख मीं कां मानावें ? या पार्थिव गोष्टी मी गमावल्या पण आनंदाचा केवढा ठेवा मीं मिळविला ?

पण असें असलें तरी पावसांत भिजण्याच्या या आनंदाचा उपभोग घेण्यासाठी मी पावसांत छत्री न घेतां पुन्हा बाहेर पडेन काय ? नांव नको ! गोविंदाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे

> " एकदाच अनुभव त्याचा
> आरंभ अंत सौख्याचा ! एकदा ॥ "

हें याहि बाबतींत खरें असावें की काय कुणास ठाऊक ? कांहीहि असो—पावसांत भिजण्याचा आनंद कितीहि मोठा असला तरी पुन्हा मी पावसांत भिजण्यासाठी बाहेर पडणार नाहीं हें खास ! कारण माझी प्रतिष्ठा, माझी व्यावहारिक दृष्टि, लोक काय म्हणतील याबद्दल वाटणारी भीति या सगळ्या गोष्टी मला मागे खेचतील; पण आजची पावसांत भिजल्याची स्मृति मात्र घराच्या उबेंत राहूनहि मला पुनःप्रत्ययाचा आनंद देईल.

त्यासाठी मला वुलनच्या कोटाचें मूल्य द्यावें लागलें तर मी कुरकुर कां करावी ?

• • •

# ११ : अहंकाराची प्रेरणा

मी त्या सभास्थानाहून घरीं परत आलों तें संतापाने फणफणतच! माझा मोठाच अपमान झाला अशी मी प्रामाणिक समजूत करून घेतली होती. वास्तविक त्या सर्व प्रकारांत दोषाचा वाटा माझ्याकडेच अधिक येत होता. कोणतासा एक प्रकाशन–समारंभ होता तो, व त्यासाठी नागपूरहून एक सुप्रसिद्ध साहित्यिक आले होते. सर्वांना त्या समारंभाच्या निमंत्रणपत्रिका वाटल्या होत्या. त्याप्रमाणे मलाहि एक निमंत्रणपत्रिका आली होती. निमंत्रणपत्रिकेच्या एका कोपऱ्यांत समारंभासाठी निमंत्रण-पत्रिका बरोबर आणण्याची सूचनाहि दिलेली होती. समारंभासाठी मी निघालों व निंम्या वाटेवर आल्यानंतर निमंत्रणपत्रिका घरीं विसरल्याची आठवण झाली. पण 'आपणाला निमंत्रणपत्रिका कोण दाखवायला सांगणार?' या एका विश्वासाने मी सभास्थानापर्यंत आलों. आणि नेमकें बाहेरच्या गेटाजवळ एका स्वयंसेवकाने मला अडविलें.

"आपली निमंत्रणपत्रिका दाखवतां का?" त्याने नम्रपणें विचारलें.

निमंत्रणपत्रिका घरीं विसरल्याचें मी त्याला सांगतांच तो मला म्हणाला, "माफ करा. मग तुम्हांला सभागृहांत जातां येणार नाही. हा समारंभ फक्त निमंत्रितांसाठी आहे."

'पण मीहि एक निमंत्रित आहें." मीं त्याला सांगितलें, "माझ्या शब्दावर विश्वास आहे ना तुमचा?"

"हा विश्वासाचा प्रश्न नाही." तो म्हणाला. "निमंत्रणपत्रिका दाखविल्याशिवाय कुणालाहि आंत सोडावयाचें नाही अशी आम्हाला सक्त ताकीद आहे."

"अहो पण मी कोण आहे हें माहीत आहे ना तुम्हाला?" मीं जरा चढ्या सुरांत त्याला विचारलें. "मी या गांवांतील कॉलेजांतील

मराठीचा प्राध्यापक आहें. निमंत्रणावाचून या समारंभाला येईन असें तुम्हाला वाटतें काय ?"

"तुम्ही कोण आहांत याच्याशीं मला कांही कर्तव्य नाही. आणि मला काय वाटतें याविषयींहि प्रश्न नाही." तो म्हणाला, "आपणाजवळ निमंत्रणपत्रिका नाही—आणि निमंत्रणपत्रिका दाखविल्याशिवाय आपणाला आंत जातां यावयाचें नाही येवढेंच मला माहीत आहे."

त्यावर मी खूप संतापलों. आपल्या उर्मट वागणुकीने एका निमंत्रित सभ्य गृहस्थाचा तो अपमान करीत असल्याचें त्याच्या निदर्शनाला आणलें आणि आतापर्यंत निमंत्रणपत्रिका नाही म्हणून कुणीहि कोणत्याहि समारंभाला मला कधीच अडविलें नसल्याची जाणीव त्याला करून दिली. पण तो आपला हट्ट सोडीना. तो शांतपणें पुन्हा म्हणाला, "आपल्याला निमंत्रणपत्रिका दाखवायला सांगतों यांत आपणाला अपमान वाटत असेल तर माझा नाइलाज आहे. दुसऱ्या समारंभप्रसंगीं काय घडलं याच्याशींहि मला कर्तव्य नाही. या समारंभप्रसंगीं मात्र आपणाला निमंत्रणपत्रिका दाखविल्याशिवाय सभागृहांत जातां येणार नाही हें निश्चित."

त्यावर कांही एक न बोलतां मी माघारी वळलों व संतापाने फणफणतच घरीं आलों. कितीतरी वेळ मी अगदीं बेचैन होतों. तो समारंभ चुकला म्हणून मला दुःख होत होतें असें नव्हें—पण माझा अहंकार दुखावला गेला म्हणून मात्र मी खूप चिडलों होतों. जळगांवांत सर्वजण मला ओळखतात. कुठेहि व कोणत्याहि समारंभाला गेलें तरी आपलें स्वागत होतें व आपणाला मानाचें स्थान मिळतें इत्यादि माझ्या-संबंधीच्या माझ्या कल्पनांना या प्रसंगाने चांगलाच धक्का बसला होता. माझ्या मोठेपणाचा सगळा डोलारा ढासळून पडला होता. मी स्वतःला

समजतों इतका मोठा नाहीं याची जाणीव या प्रसंगाने मला करून दिली होती आणि त्यामुळे त्या स्वयंसेवकाचा फारसा दोष नसतांनाहि ही जाणीव त्याने मला करून दिली म्हणून मी त्याच्यावर अतिशय संतापलों होतों.

माझा हा संताप असमर्थनीय असेल पण अस्थानीं खासच नव्हता. असमर्थनीय होता याचें कारण स्वयंसेवकाची बाजू बरोबर होती याची मला जाणीव होती. पण 'अस्थानीं' नव्हता याचें कारण उघड होतें. अहंकाराच्या पदरांनी माझ्या व्यक्तित्वाचें जें जाळें विणलें गेलें होतें त्याला त्या स्वयंसेवकाच्या उपेक्षेने मोठा धक्का बसला होता. "माझ्या ठिकाणीं अहंकार नाही, गर्व नाही" असें मी कितीहि माझ्या मनाला बजावीत असलों तरी माझा अहंकार दुखावल्यामुळेच मला राग आला होता यांत शंका नाही.

आणि 'माझ्या ठिकाणीं अहंकार नाही' अशी स्वतःविषयीं माझ्या मनाची समजूत करून घेतांना मी माझीच किती फसवणूक करून घेत होतों! माझ्या अभ्यासाच्या खोलींत सहज प्रवेश करून पाहा—वस्तू-वस्तूंतून माझ्या अहंकाराचा आविष्कार झालेला तुम्हाला दिसेल. टेबलावर पडलेल्या लेटरपॅड्पासून तें भिंतीवर लावलेल्या माझ्या फोटो-पर्यंत सर्व ठिकाणीं माझ्या अहंकाराच्या पताका फडकत असतांना दिसतील. लेटरपॅड तुम्हीं उघडलेंत की डाव्या कोपऱ्यांत प्रा. म. ना. अदवंत, एम्. ए. अशीं अक्षरें छापलेलीं आढळतील. नांवाच्या मागील 'प्रा.' आणि पुढील 'एम्. ए.' हीं अक्षरें कशाचीं द्योतक आहेत? माझ्या लेटर-रॅककडे तुम्ही वळलांत आणि त्यांतील पत्रें जर तुम्ही चाळूं लागलांत तर तीं पत्रें निरनिराळ्या व्यक्तींनी निरनिराळ्या प्रसंगीं माझें अभिनंदन करण्यासाठी लिहिलीं असल्याचें आढळेल. कुणीं परीक्षेंतील माझ्या यशाबद्दल आभिनंदन केलें असेल—कुणीं माझ्या विद्यार्थ्याने मिळविलेल्या यशाबद्दल माझें अभिनंदन केलें असेल, कुणीं माझ्या

पुस्तकाची स्तुति केली असेल, कुणीं माझ्या शिकविण्याची स्तुति केली असेल—हींच सर्व पत्रें मीं का जपून ठेवलीं आहेत? इतर पत्रें ज्या वेळीं मीं जाळून टाकलीं त्या वेळीं या पत्रांना का आहुति मिळाली नाही? उलट लोकांना दिसावींत अशा सहजतेने मी तीं कां ठेवलीं असावींत? तसेंच माझ्या टेबलाचा डावा ड्रॉवर उघडा—त्यांत तुम्हाला ब्राउन पेपरचें एक मोठें पाकीट आढळेल. तें पाकीट जर तुम्हीं रिकामें केलेंत तर त्यांतून अनेक वृत्तपत्रांचीं कात्रणें तुम्हाला आढळतील. त्यांतील पुष्कळ माझ्या पुस्तकावरील परीक्षणें आहेत—कांही माझ्या व्याख्यानाचीं वृत्त-पत्रांत आलेलीं प्रतिवृत्तें आहेत—कांही माझ्याविषयीं आलेल्या मजकुरांचीं कात्रणें आहेत. हीं सर्व मीं जपून ठेवलीं आहेत. एखादा पाहुणा माझ्याकडे आला की मी हें पाकीट त्याला सहज दिसेल अशा रीतीने बाहेर टेबलावर काढूनहि ठेवतों. हें सर्व कशाचें द्योतक आहे? माझ्या टेबलाच्या जरा वरती नजर वळवा. तिथे माझा फोटो आहे. तो फोटो म्हणजे माझ्या अहंकाराचा कळस आहे असें मी समजतों. तो फोटो काढण्यांत फोटोग्राफरने आपलें सर्व कौशल्य इतकें पणाला लावलें आहे की तो माझ्यासारखा दिसतच नाही. कुणीतरी विलक्षण रुबाबदार व्यक्ति आपणासमोर उभी आहे असें तुम्हाला वाटेल. फोटोकडे लक्ष गेलें की प्रत्येकजण आश्चर्याने विचारतो, "काय पंडितराव, तुमचा हा फोटो!" आणि मी अभिमानाने सांगतों, "हो." वास्तविक जो फोटो माझ्यासारखा अजिबात दिसत नाही त्याचें मीं असें जाहीर प्रदर्शन करावें हा अहंकाराचा कळसच नव्हे काय? आणि तरीहि मी माझ्या मनाची समजूत करून घेत होतों की माझ्या ठिकाणीं अहंकार नाही म्हणून.

वास्तविक माझ्या ठिकाणीं असलेल्या या अहंकाराबद्दल मला लाज वाटण्याचें कांहीच कारण नाही. आणि मला तशी वाटतहि नाही. कारण भोवतालच्या जीवनांत अहंकाराची फाजील जाणीव असलेल्या इतक्या व्यक्ति मला दिसतात की त्यामुळे मी त्यापेक्षा कांही निराळा

असेन असें मला वाटतच नाही. जीवनांत प्रत्येक व्यक्ति अहंकाराने नटलेली असते व त्याचा आविष्कार या ना त्या स्वरूपांत त्यांच्या कृतींत किंवा त्यांच्या बोलण्यांत सतत होत असतोच. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्याची धडपड प्रत्येक व्यक्ति करीत असते. स्थूलापासून सूक्ष्मापर्यंत भिन्नभिन्न गोष्टींतून त्यांची ही धडपड व्यक्त होत असते. कुणाच्या घरीं गेलांत तर त्यांच्या दिवाणखान्यांत स्वतःला मिळालेल्या पदव्या व्यवस्थित फ्रेम करून भिंतीला लटकलेल्या आढळतील, कुणाच्या खोलींत कपाटांत स्वतःला मिळालेल्या कपांचें, पदकांचें व प्रशस्तिपत्रकांचें अतिशय व्यवस्थित दर्शन आपणाला घडेल, कुणाच्या घरीं मोठमोठ्या समारंभप्रसंगीं मोठमोठ्या व्यक्तींच्या समवेत घेतलेले फोटो भिंतीवर दिमाखाने त्या व्यक्तीच्या मोठेपणाची जाणीव करून देत असतांना आढळतील, तर कुणाच्या घरीं आपण केलेल्या मोठमोठ्या कार्यांचें प्रतीकरूप दर्शन या ना त्या स्वरूपांत आपणांस घडेल. एका गृहस्थाच्या घरीं मला मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या सहीचीं त्याला आलेलीं पत्रें भिंतीवर फ्रेम करून ठेवलेलीं दिसलीं. मोठमोठ्या पुढाऱ्यांना वेळीं अवेळीं पत्रें लिहावयाचीं व त्यांचें औपचारिक उत्तर आलें की तें मोठ्या अभिमानाने फ्रेम करून ठेवावयाचें हा त्या गृहस्थाचा छंद होता. ‘ मोठमोठ्या पुढाऱ्यांशीं माझा पत्रव्यवहार चालतो. ’ हा अहंकाराचा भाग त्या सर्व फ्रेम केलेल्या पत्रांतून व्यक्त होत नव्हता काय ? शिवाय कांही घरांत गेलात तर तुम्हाला वैभवाचें उद्दाम प्रदर्शन दिसेल—कांही घरांत गेलात तर कलादृष्टीचें नाजुक प्रदर्शन दिसेल व कांही घरांत गेलात तर विद्वत्तेचें प्रखर प्रदर्शन दिसेल. या साऱ्या जड किंवा सूक्ष्म वस्तूंतून त्या त्या व्यक्तीचा अहंकार सूक्ष्म किंवा भडक रीतीने आविष्कृत होत असतांना आढळतो. अहंकाराचीं हीं सर्व बाह्यचिन्हें आज आपणाला घरोघरीं पाहावयास मिळत नाहीत काय ?

पण अहंकाराच्या या स्थूल व बाह्य आविष्कारापेक्षा त्याचें सूक्ष्म

व सूचित स्वरूप मोठें कलात्मक असतें. आपल्या स्वतःचा मोठेपणा, श्रेष्ठपणा लोकांच्या मनावर बिंबविण्याचे दोन मार्ग—एक प्रत्यक्ष व सरळ आणि दुसरा अप्रत्यक्ष व सूचित. पहिल्या मार्गाचा अवलंब करणारे लोक उघड उघड आपली स्तुति आपणच करतात. आपल्या विद्वत्तेचा, वैभवाचा वा अधिकाराचा डंका आपणच वाजवितात. अशा पुरुषांना आपण अहंकारी म्हणतों, गर्विष्ठ म्हणतों. पण मला तर अशा व्यक्ति साध्याभोळ्या वाटतात. आजच्या जाहिरातीच्या काळांत जाहिरातीच्या सरळ आणि सर्वमान्य अशा तंत्राचा उपयोग करणाऱ्या व्यक्तींना साधेभोळे म्हणूं नये तर काय म्हणावें? आपण मोठे आहोंत असें त्यांना वाटतें. आपला मोठेपणा लोकांच्या मनावर बिंबावा अशी त्यांची इच्छा असते आणि त्यासाठी प्रत्यक्ष वाणीचा, लेखणीचा व प्रत्यक्ष अन्य साधनांचा ते उपयोग करतात. आणि म्हणून क्वचित् ते लोकांच्या हास्याचा विषय होत असतात. पण त्यांना हंसणाऱ्या लोकांना याची कल्पना नसते की या लोकांप्रमाणेच स्वतःच्या अस्तित्वाची, मोठेपणाची जाणीव लोकांना करून देण्याची त्यांची स्वतःची धडपडहि चाललेली असते. मात्र त्यासाठी जाहिरातीचें छुपें तंत्र ते वापरतात. त्यांच्या पद्धति अधिक कलात्मक असतात. प्रत्यक्षपणें ते आपल्या मोठेपणाचा वा वैभवाचा डंका कदाचित् पिटणार नाहीत, पण अप्रत्यक्षपणें त्यांच्या भाषणांतून वा कृतींतून अहंकाराचा दर्प निश्चितपणें दरवळतांना दिसेल.

स्वतःच्या जाहिरातीच्या या छुप्या तंत्रांत दुसऱ्याची निंदा किंवा कुचेष्टा करून अप्रत्यक्षपणें स्वतःचा मोठेपणा लोकांच्या मनावर बिंबविण्याच्या तंत्राला फार मोठें स्थान आहे. प्रत्येक व्यक्ति थोड्याफार प्रमाणांत या तंत्राचा अवलंब करीत असते. एखादा शिक्षक आपल्या शिकविण्याने व मनमिळाऊपणाने विद्यार्थ्यांत लोकप्रिय होत असलेला दिसला की, "माहीत आहे त्याची विद्वत्ता. बी. ए. ला तिसऱ्या वर्गांत तर पास झालाय्!" अशी त्याची कुचेष्टा करून स्वतःची प्रतिष्ठा

वाढविणारे शिक्षक थोडे का सापडतात ? "अधिकाऱ्याकडे आम्ही तोंड वेंगाडलें असतें व लाळघोटेपणा केला असता तर आम्हाला नसती का वरची जागा मिळाली ?" "अहो तिला पहिला वर्ग कसा मिळाला तें आम्हाला माहीत आहे. तिच्या प्राध्यापकाच्या परीक्षकांशीं ओळखी होत्या-तेव्हा त्यांनी वशिला लावल्यावर पहिला वर्ग न मिळायला काय झालें ?" "उगीचच त्याने दिलेल्या देणगीचें कौतुक करूं नका. काळ्या बाजारांत अनेकांच्या मुंड्या मुरगाळून पैसे मिळाले आणि आता धर्मदाय देणग्यांचा वर white wash लावण्याचा प्रयत्न करतोय् तो. हें काय जगाला कळत नाही ?" "अहो त्याला कवितेचे पहिले धडे मीं दिले. म्हणून आज बऱ्यापैकी कवि म्हणून मिरवतो आहे तो. एरवी त्याचें काव्य हातांतहि धरलें नसतें कुणीं." अशासारखे जे उद्गार निरनिराळ्या क्षेत्रांत आपणाला ऐकूं येतात याहिमागे दुसऱ्याची कुचेष्टा करून स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्नच नसतो काय ? त्याहिपेक्षा कांही कांही लोकांना मोठमोठ्या व्यक्तींवर टीका करण्याची व त्यांचे दोष काढण्याची विलक्षण सवय असते. पंडित जवाहरलाल नेहरूंचें परराष्ट्रीय राजकारण कसें चुकीचें आहे, महात्मा गांधींचा अहिंसावाद कसा अस्थानीं आहे, डॉ. केतकरांचीं समाजवादाविषयींचीं मतें कशीं अपरिपक्व आहेत इत्यादींविषयीं ते जोरजोरांत चर्चा करतील. केवळ मोठ्या व्यक्तींच्या चुका काढूनच ते थांबणार नाहीत, तर त्यांनी काय करावयास हवें होतें-आपण त्यांच्या जागीं असतों तर काय केलें असतें-याचीहि ते आपणाला कल्पना देतील. थोडक्यांत आपण त्या व्यक्तींच्या-पेक्षाहि कसे मोठे आहोंत याची जाणीव ते आपणाला देण्याचा प्रयत्न करीत असतात. या प्रयत्नांतून त्यांच्या आत्यंतिक अहंकाराचा आविष्कारच दिसत नाही काय ?

पण प्रत्यक्ष दुसऱ्याची निंदा करून किंवा कुचेष्टा करून मोठेपणा मिळविण्याच्या कडक मार्गापेक्षा दुसऱ्या एका सौम्य व सात्त्विक मार्गाने

आपणामधील अहंकाराचा आविष्कार होत असतो. तो म्हणजे दुसऱ्याविषयीं सहानुभूति दाखविण्याचा किंवा दुसऱ्याची कींव करण्याचा मार्ग. कुणी एखादा चुकला–त्याचा अधःपात झाला किंवा दुर्दैवाच्या फेऱ्यांत तो सापडला तर आपण त्याची कीव करतों–त्याच्याविषयीं सहानुभूति दाखवितों. "अरेरे! बिचारा!" असे उद्गार आपल्या तोंडून बाहेर पडतात. पण ही सहानुभूति म्हणजेच स्वतःच्या अहंकाराचा नकळत केलेला आविष्कार याची त्यांना कल्पनाहि नसते. ज्याच्याविषयीं सहानुभूति दाखवायाची त्याच्यापेक्षा आपण मोठे आहोंत, श्रेष्ठ आहोंत, असेंच अप्रत्यक्षपणें या सहानुभूतींतून सूचित होत नाही काय? एखाद्याविषयीं कीव वाटून आपण त्याच्या मदतीला जातों किंवा त्याला आर्थिक साहाय्य करतों यांतहि आपल्या अहंकाराचाच सूक्ष्म दर्प असतो हें आपण आपली प्रत्येक कृति न्याहाळून बघितली तरी सहज लक्षांत येईल. मला आठवतें–रत्नागिरीला असतांना म्हशीचा धक्का लागून एक लंगडा भिकारी रस्त्यांत बेशुद्ध होऊन पडला होता. मला त्याची ती अवस्था पाहून कळवळा आला. शेजारच्या घरांतून पाणी आणून मीं त्याला शुद्धीवर आणलें, दवाखान्यांत नेऊन त्याच्या जखमेवर डॉक्टर-कडून मलमपट्ट्या करविल्या आणि दोन रुपये देऊन त्याला वाटेला लावलें. मी हें सर्व भूतदयेने करतों आहें अशी त्या वेळीं मी माझ्या मनाची प्रामाणिक समजूत करून घेतली होती. पण आता मला स्पष्ट दिसतें की, ती केवळ भूतदया नव्हती. त्यामागे अहंकाराची प्रेरणाहि होती. "प्रा. अदवंतांनी एका भिकाऱ्याला अपघात झाला असतांना मदत केली." असा माझा लौकिक लोकांत होईल अशी माझ्या मनांत कल्पना होती–नव्हे आशा होती. तशी नसती तर मीच त्या प्रसंगाचें वर्णन अनेक वेळां माझ्या मित्रांजवळ कशाला केलें असतें?

आपल्या अहंकाराचा आविष्कार आपणा प्रत्येकाच्या कृतींतून, वृत्तींतून, भाषणांतून व पोषाखांतून होत असतो, हें आपण आपल्या

स्वतःच्या कृतीकडे, वृत्तीकडे किंवा भाषणाकडे तिऱ्हाईत दृष्टीने पाहिलें तर आपल्या लक्षांत येईल. पण आपण आपणाकडे अलिप्त नजरेने पाहूंच शकत नाही. म्हणून आपणाला त्या अहंकाराची जाणीव येत नाही. आपण जें जें करतों किंवा ज्या ज्या रीतीने वागतों त्या त्या आपल्या कृतींवर चा वर्तनांवर 'मी' पणाचा छाप नसतो काय? आपल्या भाषणांतून ज्या वेळीं 'मला असें वाटतें' असें म्हणून आपलीं ठाम मतें आपण मांडतों त्या वेळीं आपल्या 'मी' पणाची जाणीव आपणाला नसते काय? आपला पोषाख व वेषभूषा ठाकठिकीने करण्यांतहि आपल्या अहंकाराचें दर्शन होत नाही काय? 'मी दुसऱ्यांना कसा दिसेन' या विचारांतूनच आपली वेषभूषा व आपला पोषाख निर्माण होत नाही काय? फार कशाला? घरांत ज्या ज्या वेळीं तुम्ही आरशांत नजर टाकतां, त्या त्या वेळीं 'मी' पणाची ही जाणीव उफाळून वर येत नाही काय? 'दर्पण' नसलेलीं अशीं किती घरें तुम्हाला सापडतील? तशीं असतील व तेथे 'दर्पण' दारिद्र्याशिवाय इतर कारणाकरिता नसेल तर त्या ठिकाणीं अहंकाराचा दर्प नाही असें फार तर म्हणतां येईल. पण आपणाजवळ 'दर्पण' नाही अशा जाणिवेचा दर्प त्याच्या ठिकाणीं नसेलच असें मात्र सांगवणार नाही.

किंबहुना विरक्त म्हणून समजल्या गेलेल्या व्यक्तीच्या ठिकाणीं सुद्धा विरक्तीचा अहंकार असतो असें म्हटलें तर पुष्कळांना आश्चर्य वाटेल. ज्ञानेश्वर हे फार मोठे विरक्त पुरुष होऊन गेले, याविषयीं कुणी शंका घेणार नाही. पण त्यांच्याहि तोंडून

'माझा मराठाचि बोलु कवतिकें । परि अमृतातेंहि पैजा जिंके ।
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥'

असे उद्गार निघालेच ना? "माझीया मीपणावरि पडो पाषाण । जळो हें भूषण नाम माझें ।" असें म्हणणाऱ्या तुकारामाच्या तोंडूनाहि

'अणुरेणुयां थोकडा। तुका आकाशाएवढा' अशी वाणी बाहेर पडलीच ना? शिवाय रामेश्वरभटाच्या सांगण्यावरून इंद्रायणींत ज्या वेळीं त्यांनी अभंगाच्या वह्या बुडविल्या त्या वेळीं त्यांनी केलेलें चौदा दिवसांचें निश्चक्र उपोषण काय दाखवतें? आपण देवाचे लाडके भक्त आहोंत असा अहंकार नामदेवांना होताच ना? पूर्वीचे श्रेष्ठ ऋषिसुद्धा तपश्चर्या करून मनोवृत्तीवर विजय मिळविल्यानंतरहि एखाद्या घटनेने संतापत व शाप देत याचा अर्थ तरी काय? किंबहुना या अहंकाराच्या तावडींतून देवसुद्धा सुटले नाहीत तिथे मानवाची काय कथा? आपला मोठेपणा सिद्ध करण्याकरिता देवांना अनेक संकटांशीं तोंड द्यावें लागलें व अनेक अवतार घ्यावे लागले अशीं पुराणें आपणाला ग्वाही देत नाहीत काय? परमेश्वराची स्तुति केल्यावर तो प्रसन्न होतो याचा दुसरा अर्थ तरी कोणता घ्यावयाचा?

अहंकार सोडण्याचा उपदेश आपणाला अनेक साधुसंतांनी केला आहे. पण साधुसंतांनाहि जिथे अहंकार सुटला नाही तिथे आपल्यासारख्या पामरांची काय कथा? आणि अहंकार सोडण्याचा आपण प्रयत्न तरी कां करावयाचा? अहंकार हा प्रत्येकाच्या व्यक्तित्वाचा गाभा आहे. आपणा सर्वांचें व्यक्तिमत्त्व अहंकाराच्या उभ्या व आडव्या धाग्यांनी विणलेलें असतें. तोच जर आपण सोडला तर आपलें निराळेंपण राहिलें कुठे? आपण इतरांपेक्षा निराळे आहोंत या कल्पनेंतच माणसाच्या जीवनांतील नव्या नव्या प्रेरणा निर्माण होत असतात. आणि मानवी जीवनांतील विविधता या प्रेरणेंतूनच निर्माण होत असते. उद्या जर 'अहंकार'च या जगांतून नाहीसा झाला तर आपणाला आपलें जीवन जगण्यांत कांही तरी स्वारस्य वाटेल काय? माणसाचें बहुरंगी व बहुढंगी व्यक्तित्व ज्या अहंकारांतून प्रगट होतें, साहित्यांतील नवरसात्मकताहि ज्या अहंकारांतून निर्माण झाली आहे तो 'अहंकार' आपण सोडला तर जीवनांत जगायचें कशाकरिता?

आणि म्हणूनच ‘अहंकार’ ही जीवनांतील एक महान् प्रेरक शक्ति आहे असें मी म्हणतों. अहंकाराच्या प्रेरणेंतूनच मानवांची विलक्षण प्रगति झाली असल्याचें आपणाला दिसेल. शास्त्रीय, भौतिक व आधिभौतिक अशा सर्व शोधांच्या मागे ही अहंकाराची प्रेरणाच असल्याचें आपणाला दिसेल. साहित्य निर्माण होतें तें या अहंकाराच्या प्रेरणेंतूनच. आपल्या प्रत्येक कृतींतून, भाषणांतून व वृत्तींतून मनुष्य स्वतःच्या व्यक्तित्वाचाच आविष्कार करीत असतो. स्वतःचा विकास करणें, स्वतःची उन्नति करून घेणें, स्वतःसाठीं मानाचें स्थान मिळविण्याचा प्रयत्न करणें हेंच प्रत्येक माणसाच्या कृतींचें रहस्य असतें, त्यासाठीच त्याची धडपड असते. ‘निष्काम कर्मयोग’ आचरणांत आणणारे महाभाग या जगांत विरळाच. स्वतःची उन्नति साधणें हें प्रत्येकाचें ध्येय असतें व त्याला प्रेरणा देण्याचें कार्य अहंकार करीत असतो. आणि म्हणून आपला अहंकार थोडासा जरी दुखावला गेला तरी आपण चिडतों, संतापतों. आपल्या अहंकाराची जपणूक आपण अगदी प्राणपणाने करीत असतों, व त्यांतून मिळालेल्या प्रेरणेने आपण पुढे पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असतों. दुखावलेल्या अहंकाराने तर कितीकांना प्रेरणा दिली आहे! ध्रुवाला तपश्चर्या करण्याची प्रेरणा दुखावलेल्या अहंकारांतूनच मिळाली. रामा शागिर्दाचा रामशास्त्री झाला तो दुखावलेल्या अहंकाराच्या प्रेरणेनेच. भारतीय युद्धाचा वणवा पेटला तो दुखावलेल्या अहंकारांतूनच. अहंकाराचें सामर्थ्य हें असें आहे. साऱ्या मानवी जीवनाचीं सूत्रें आज अहंकाराच्या प्रेरणेने हालविलीं जातात असें आपण विधान केलें तर त्यांत थोडीहि अतिशयोक्ति नाही. ‘अहम्’ म्हणजे ‘मी’ हा शब्द आपल्या जीवनांतून वजा करा आणि आपल्या जीवनाला कांही अर्थ राहतो का पाहा.

आणि म्हणून माझ्या ठिकाणीं ‘अहंकार’ असल्याबद्दल मला बिलकूल वाईट वाटत नाहीं. वाईट वाटत असलेंच तर तो अधिक

प्रमाणांत माझ्यामध्ये नाही याबद्दलच. 'माझ्या मीपणावरि पडो पाषाण। जळों हें भूषण नाम माझें।' असें मी तरी कधी म्हणणार नाहीं— उलट माझें नांव लोकांच्या समोर यावें म्हणून अधिकाधिक प्रयत्न करीन आणि त्यासाठी करावें लागणारें कष्ट करीन व सोसाव्या लागणाऱ्या यातनाहि सोशीन. माझ्या अहंकाराची मी जपणूक करीन आणि ती करतांना तिला थोडा जरी धक्का लागला तरी मला सहन होणार नाही.

निमंत्रणपत्रिका नाही म्हणून मला अडविणाऱ्या स्वयंसेवकावरील माझा राग अस्थानीं कसा नाही हें आता तरी पटलें ना तुम्हाला ?

• • •

माझा मित्र अगदी गंभीरपणाने त्याच्या जीवनांतील ती घटना रंगवून सांगत होता. त्या घटनेंत नाट्य होतें यांत शंका नाही. तो कुठल्या तरी प्रवासांत असतांना त्याच्या खिशांतील पाकिट चोरीला गेलें होतें व पाकिटाबरोबर रेल्वे-तिकिटहि. तिकिट-चेकराहि त्याच वेळीं त्याच्या डब्यांत आला होता. आणि पैशाचें पाकिट व त्याच्याबरोबर आगगाडीचें तिकिटहि हरविल्याची त्याची हकीकत म्हणजे एक लोणकढी थाप समजत होता. अशा वेळीं त्याच डब्यांत बसलेल्या एका तरुणीला त्याची दया आली आणि तिने तिकिट चेकरने सांगितलेले त्याचे पैसे भरले. त्यांतून त्या उभयतांचा परिचय–परिचयांतून प्रेम–वडील मंडळीकडून प्रेमाला झालेला विरोध–त्या विरोधाला न जुमानतां त्यांनी केलेला विवाह. फडक्यांच्या कोणत्याहि कादंबरींतून शोभतील अशा आपल्या जीवनांतील नाट्यपूर्ण घटना सांगण्याच्या तो अगदी रंगांत आला होता.

पण माझें मात्र त्याच्याकडे लक्ष नव्हतें. त्याच्या त्या घटना मला कमी मनोरंजक वाटत होत्या अशांतला भाग नाही. पण त्याचा त्या वेळीं जो चाळा चालला होता, त्याच्याकडेच माझें लक्ष होतें. किंबहुना त्याच्या त्या चाळ्यांनी माझा जीव खालीवर होत होता. टेबलावरील माझ्या आवडत्या कवीचें पुस्तक त्याने हातांत घेतलें होतें व त्याची सुरळी करण्याचा प्रयत्न तो करीत होता. त्याने त्या पुस्तकाची सुरळी करावयास सुरवात करतांच एकदम माझ्या मनाला धक्काच बसला होता. आता माझ्या त्या पुस्तकाची अवस्था काय होणार हेंच मला कळेना. त्याचें वरचें सुंदर मुखपृष्ठ तर मुडपलें गेलेंच होतें. पण समोर ठेवलेल्या टीपॉयवर पडलेल्या चहाच्या थेंबावर त्याने तें आवेशाच्या भरांत टेकवल्यामुळे

त्या चहाचे डागहि त्याला पडले होते. त्याला तें पुस्तक टेबलावर ठेवावयास सांगावें असें कितीदा तरी माझ्या मनांत आले. पण एकतर तो आपल्या जीवनांतील नाट्यपूर्ण घटना रंगवून सांगण्याच्या भरांत आलेला होता. लग्न झाल्यावर प्रथम तो माझ्याकडे आला होता. शिवाय त्याच्या समोरच त्याची पत्नीहि बसली होती. त्यामुळे तिच्यासमोर त्याला कोणतीहि सूचना द्यावयाचा मला संकोच वाटला. पण पुस्तकाचे ते हाल मात्र मला पाहवेनात. त्याने आपण वडिलांना विरोध कसा केला हें सांगण्याच्या भरांत पुस्तकाची जेव्हा अगदी संपूर्ण सुरळी केली त्या वेळीं मात्र मला अगदी राहवेना. मीं शेवटीं म्हटलें, " अरे, त्या पुस्तकाचे बिचाऱ्याचे काय हाल चालवले आहेत ? ठेवीनास तें पुस्तक टेबलावर?"

माझ्या या शब्दाने त्याला एकदम राग आला. आपण अगदी जीव तोडून एखादी हकीकत सांगावी आणि याचें लक्ष मात्र एका क्षुल्लक आणि मामुली वस्तूकडे असावें याचाच त्याला राग आला असावा. त्याने जरा रागानेच तें पुस्तक टेबलावर फेकलें आणि जरा रोषाने म्हटलें, " तुझें लक्ष माझ्या हकीकतीपेक्षा पुस्तकाकडेच अधिक होतें असें दिसतें. मित्राची किंमत तुझ्या दृष्टीने एखाद्या पुस्तकापेक्षा कमी असावी अशी माझी कल्पना नव्हती." मीं त्यावर त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला पण तो फारसा यशस्वी होऊं शकला नाही. त्याच्या पत्नीच्या मुखावरहि थोड्या नाराजीच्या छटा उमटल्या. आणि आमच्या बैठकीचा रंग बिघडला, तो बिघडलाच. त्याने थोडया वेळांत माझा निरोप घेतला. कुंकू लावण्यासाठी त्याच्या पत्नीला जेव्हा माझ्या पत्नीने आंत नेलें तेव्हा ती तिची समजूत घालण्याच्या दृष्टीने म्हणाली, " पुस्तकाचें यांना भारी वेड ! तुम्ही त्यांचे शब्द तेवढे मनावर घेऊं नका." त्याच्या पत्नीने यावर काय उत्तर दिलें हें मला ऐकूं आलें नाही. थोडयाच वेळांत ते निघून गेल्यावर माझ्या पत्नीने जरा रोषानेच मला म्हटलें, "तुमचं पुस्तकावरचे प्रेम हें जगावेगळं व्हायला लागलं आहे हें

बरें नाही हं. त्या बिचाऱ्याचा तो रंगांत आला असतांना एका पुस्तकासाठी भंग करायचं कांही नडल होतं? आतां फिरून येईल का तो आपल्याकडे?

त्यावर मीं तिला कांहीच उत्तर दिलें नाही. उत्तर देण्यासारखें नव्हतेंच. पुस्तकावरील माझं प्रेम जगावेगळं असल्याची जाणीव मला स्वतःलाच होती. तें बरं का वाईट हें माझं मलाच समजत नव्हतं. पुस्तकांचा कुणी अपमान केला, वेडींवाकडीं पुस्तकें वापरलीं, त्यावर डाग पाडून किंवा त्यांचीं पानें फाडून आणून दिलीं तर मला खरोखरच त्या व्यक्तीचा राग येत असे. केवळ माझ्याच पुस्तकावर माझें असें प्रेम होतें असें नव्हे. वाचनाल्यांतील पुस्तकांच्या बाबतींतहि कुणी असा निष्काळजीपणा दाखविला तरी मला त्यांचा राग येई. अनेक वेळां मी तो शब्दांनी व्यक्त करी आणि मग माझे मित्र हंसून, "आमच्या पंडितरावांना पुस्तकांचें अगदी भलतेंच वेड आहे बुवा. असें म्हणत."

माझें हें वेड आता अगदीं सर्वांना माहीत झालें आहे. त्याबद्दल माझी चेष्टाहि भरपूर होते. तरी पण माझें तें वेड सुटेल असें मला वाटत नाही. पुस्तकांबद्दल मला वाटणारें विलक्षण गूढ आकर्षण अनेकदां माझें मलाच समजूं शकत नाही. पण पुस्तकांच्या विश्वांत असलें म्हणजे माझ्या मनाला विलक्षण दिलासा वाटतो हें खोटें नाही. स्नेहीमंडळींच्या सहवासांत असलों तर अनेकदा मी त्यांच्या गप्पांत व सहवासांत एकरूप होऊं शकत नाहीं; पण माझ्या या मित्रांच्या सहवासांत असलों म्हणजे मी सर्व विश्व विसरून जातों. एकटेपणाची जाणीव मला त्यामुळे कधीच होत नाहीं. कारण मी एकटा कधीच नसतों. घरांत अगदी कुणीही नसले तरी शॉ म्हणा, किंवा सॉमर्सेट मॉम म्हणा किंवा आल्डस् हक्स्ले म्हणा कुणी तरी माझ्याजवळ असतें व त्यांच्या सहवासांत वेळेचेंहि भान मला राहात नाही. हे सर्व माझे प्रेमळ मित्र माझ्या लिहिण्याच्या खोलींतील कपाटांत बसलेले असतात आणि आपलें अंतरंग खुलें करावयास ते केव्हाहि तयार असतात.

माझे हे सर्व मित्र माझ्या घरींच असावेत अशी माझी फार इच्छा. त्यासाठी करावा लागणारा खर्च आपल्या ऐपतीबाहेर आहे हें माहीत असूनहि मी करतों. माझ्या स्नेही-मंडळींना तें वेडेपणाचें वाटतें. वाचनालयांत पुस्तक मिळत असतांना तें वाचण्यासाठी विकत घ्यावयाचें ही कल्पनाहि त्यांना पटत नाही. माझ्या पत्नीचाहि या वेडाला थोडा विरोध आहे. पण या बाबतींत मी कुणाच्याच मताला किंमत देत नाही. एक तर आपणाला जें पुस्तक अतिशय आवडतें व फिरून फिरून जें वाचावेसें वाटतें तें आणण्यासाठी वाचनालयांत जाणें मला पटत नाही. आपणाला हवें असेल तें पुस्तक हवें तेव्हा न मिळण्याचें ठिकाण म्हणजे वाचनालय अशी मीं वाचनालयाची व्याख्या ठरवून ठेवली आहे. त्यामुळे ज्या वेळीं मला माधवज्युलियनचें काव्य वाचावेसें वाटेल त्या वेळीं तें मला मिळालें नाही तर माझ्या मनाला मोठी हुरहूर लागते. माझ्या मनाच्या लहरी मोठ्या विचित्र आहेत. कोणत्या वेळेला कोणतें पुस्तक वाचावयाची लहर मला लागेल याची मला अगोदर कधींच कल्पना नसते आणि त्या वेळीं तें पुस्तक मला वाचावयास मिळालें नाही तर मला विलक्षण चुकल्याचुकल्यासारखें होतें. एखाद्या विशिष्ट मित्राशीं गप्पा मारण्याची विलक्षण लहर आपणाला यावी आणि त्याच्या घरीं जातांच तो घरीं नसल्याचें कळावें, अशा वेळीं माणसाची जी मनःस्थिति होईल तीच थोडयाफार प्रमाणांत माझी होते. मला आठवतंय, एकदां केव्हातरी सकाळीं टागोरांची गीतांजलि वाचण्याची मला तीव्र इच्छा झाली म्हणून माझें कपाट मीं उघडलें. गीतांजलि एका गृहस्थाने नेल्याचें व त्याने ती कबूल करूनहि परत न आणून दिल्याचें त्या वेळीं माझ्या लक्षांत आलें. मी विलक्षण चिडलों. त्या गृहस्थाकडे गेलों.

तो गृहस्थ घरीं तर नव्हताच, पण "गीताञ्जली"हि त्याच्या घरीं नव्हती. तो दिवस मी विलक्षण अस्वस्थतेंत घालवला. पुस्तक न मिळाल्याने नव्हे-तें मला दुसऱ्या दिवशीं मिळालें. पण टागोरांच्या सहवासांत

त्याच्या गूढ भावनांचा आस्वाद घेत त्या दिवशींची सकाळ घालविण्याचें माझें रम्य स्वप्न विरलें म्हणून.

त्यामुळे अनेकदा माझ्या मित्रांचें आगमन सुद्धा मला नकोसें वाटतें असें म्हटलें तर माणूसघाणेपणाचा आरोप माझ्यावर येईल. पण कधी कधी खरोखर एखाद्या पुस्तकांत समाधि लागावी, सर्व विश्व विसरून जावें आणि तेवढ्यांत मित्राची हाक कानावर येऊन ती सर्व स्वप्नसृष्टि विरून जावी यामुळे मला अतिशय राग येतो. दोन प्रेमळ मित्रांचें हितगुज चाललें असतांना तिसऱ्याने येऊन मध्येंच तोंड घालावें व संभाषणाची सर्व घडी विस्कटून टाकावी अशा वेळीं त्या तिसऱ्या व्यक्तीचा राग येतो, तसाच मला माझ्या त्या मित्राचा येतो. तो मी वर दाखवीत नाही ही गोष्ट निराळी. पण सूक्ष्म दृष्टीने पाहणाऱ्याला माझ्या चेहऱ्यावर नाराजीच्या छटा उमटलेल्या दिसल्यावाचून राहणार नाहीत. तेव्हा असे माझे हे मित्र सतत माझ्याजवळ असावेत असें मला नेहमी वाटतें. आणि त्यासाठी वाटेल तो खर्च करण्याची माझी तयारी असते. मात्र जीवनांत ज्याप्रमाणे आपण मित्र पारखून घेतों, त्याप्रमाणे माझेहि मित्र मीं अगदी पारखून घेतले आहेत. माझें एक विशिष्ट कपाट आहे. ते उघडलें की माझे सर्व मित्र रांगेने बसलेले आपणाला दिसतील. त्यांत शेक्सपिअर आहे, इब्सेन आहे, गॅलस्वर्दी आहे, शॉ आहे, युजीन ओनील आहे, सामर्सेट मॉम आहे, आणखी कितीतरी ललित-वाङ्मयाच्या अनेक शाखेचे निवडक प्रतिनिधी तेथे तुम्हाला आढळतील. आणि मराठी, संस्कृत व इंग्रजी या तीनहि भाषेंतले. मराठींत तर ज्ञानेश्वरापासून ते मंगेश पाडगांवकरपर्यंत सर्व महत्त्वाच्या कवींची हजेरी यांत लागेल. हे सर्व माझे प्रिय मित्र आहेत. त्यांच्या केवळ सहवासाने सुद्धा मला किती सुख होतें याची कल्पना फार थोड्यांना येईल. अनेकदा कांही कारणामुळे मनाला विषण्णता आली म्हणजे मी या कपाटापाशीं येतों आणि कपाट उघडून आंतील ग्रंथाची चाळवाचाळव करतों.

पुस्तक खालीं घेतों, चाळतों, पुन्हा पहिल्या ठिकाणीं ठेवतों. यामध्येहि मला विलक्षण सौख्य वाटतें. आपण महान् विभूतींच्या सान्निध्यांत आहोंत ही जाणीवच मनाची सर्व खिन्नता दूर करते. प्रत्यक्ष संभाषणा-पेक्षाहि प्रिय व्यक्तीच्या सान्निध्याचा आनंदच किती मधुर असतो याची जाणीव या वेळीं मला पटते.

या कपाटांत असलेल्या माझ्या मित्रांपैकी पुष्कळच मित्र असे आहेत की त्यांचा माझा अद्यापि हृदयसंवाद झालेला नाही. त्यांची कीर्ति मी अनेकांकडून ऐकली—त्यांच्याविषयी विलक्षण जिव्हाळा माझ्या मनांत निर्माण झाला आणि मी त्यांना माझ्या घरीं आणलें. त्यांना पाहतांनासुद्धा माझ्या मनांत ही समाधानाची जाणीव असते की, यांच्या सान्निध्यांत माझा कितीतरी काळ मोठ्या आनंदांत जाणार आहे. माझ्या जीवनाच्या बँकेंत ती मी आनंदाची ठेवच ठेवली आहे. ती केव्हाहि मला काढतां येईल व त्याचा उपभोग घेतां येईल. बँकबुकमधील आपल्या खात्यांत शिल्लक असलेली बरीच मोठी रक्कम पाहतांना एखाद्याला जितका आनंद वाटेल तितका मला या माझ्या मित्रांकडे पाहून होतो. हक्स्ले मी अद्याप वाचला नाही. त्याची तोंडओळख फक्त झाली आहे; युजीन ओनीलच्या व्यक्तित्वाचा थोडासाच परिचय झालेला आहे. जुन्या कवींपैकी एकनाथ आणि मोरोपंत यांचाहि थोडासाच परिचय झालेला आहे. रटिगन, ग्रॅहम् ग्रीन इत्यादि मित्रांनाहि मी घरीं घेऊन आलों आहें. पण त्यांचा परिचय करून घेतलेला नाही. ही सर्व मित्रमंडळी माझी वाट पाहात असतील. या सर्वांच्या सान्निध्यांत मलाहि खूप सुख मिळणार आहे याची कल्पनाहि मनाला आनंद देते. पण मी तीं पुस्तकें सहसा वाचावयास काढीत नाहीं. या बाबतींत माझी भूमिका एखाद्या कृपणाची आहे असें म्हणा वाटलें तर. त्यांतील एखादें पुस्तक वाचून झालें कीं शिल्लक रकमेंतील कांही रक्कम खर्च झाल्यानें एखाद्या कृपणाला जी हुरहूर वाटते तीच मला वाटते. माझें मन या बाबतींत विचित्र आहे हेंच खरें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ७४७५९ वि: निबंध
क्रमांक २०३६ नोंद दि: १७/३/७९



पण एकदा वाचून झालेले ग्रंथ निरुपयोगी ठरतात असें मात्र बिलकुल नाही. "पुस्तकें एकदा वाचून झालीं की संपला त्यांचा उपयोग. मग तीं विकत कशास घ्यावयाचीं ?" अशा सबबीवर पुस्तकें विकत घेण्याचें टाळणारे अनेक मित्र मला माहीत आहेत. माझ्या पुस्तकें विकत घेण्याच्या सवयीवर याचमुळे ते टीका करीत असतात. पण एकदा वाचलेलीं पुस्तकें मला टाकाऊ वाटतच नाहीत. उलट ते मला जुन्या स्नेह्याप्रमाणे वाटतात. अनेकदा एखादें नवें पुस्तक घेऊन बसण्याऐवजी जुनें वाचलेलें पुस्तक घेऊन तेंच परत वाचण्यांत मला निरतिशय आनंद होतो. एखाद्या तिऱ्हाइत व्यक्तीशीं बोलत बसण्यापेक्षा आपल्या एखाद्या जुन्या स्नेह्याशीं बोलत बसण्यांत आपणाला नाही का आनंद वाटत ? शेक्सपियरच्या हॅम्लेटशीं, मॅक्बेथशीं, ऑथेल्लोशीं पुन्हा पुन्हा हृदयसंवाद करतांना आपणाला नाही आनंद वाटत ? माझ्या कपाटांतील माझे सारे मित्र हे पारखून घेतलेले आहेत असें मी म्हणतों याचें कारण हेंच. पहिल्या भेटीइतकाच पुनर्भेटींतहि आनंद देण्याचें त्यांचें सामर्थ्य आहे हें मला माहीत आहे. डिकन्सच्या पिक्विक्च्या सहवासांत मी किती सफरी केल्या असतील असें तुम्हाला वाटतें ? माधव ज्युलियनच्या 'विरहतरंगां'तील प्रभाकरच्या मनोव्यथा मी कितीदा ऐकल्या असतील ? हरि नारायण आपट्यांच्या भावानंदाबरोबर कितीदा मीं विहार केला असेल ? वामन मल्हारांची 'रागिणी' आजवर तीन चार वेळां मला भेटली आणि अद्यापि किती वेळा तिची माझी भेट होईल हेंहि सांगवत नाही. त्यामुळे जुन्या व जिव्हाळ्याच्या स्नेह्यांचा लोभस सहवास जसा पुन्हा पुन्हा अनुभवावासा वाटतो तसेंच माझ्या या मित्रांचें आहे. त्यांच्या सहवासाची गोडी माझ्या दृष्टीने तरी अवीट आहे. आपल्या जिवश्च कंठश्च मित्रांकडे आपण दररोज जातों व त्यांच्या सहवासांत घटका दोन घटका घालवतों. तरी त्यांच्या सहवासाची गोडी कधी कमी झाल्यासारखी आपणाला वाटते काय ? कपाटांतील आपल्या प्रेमळ स्नेह्यांचा सहवास तसाच नाही काय ?

यावरून सर्वच पुस्तकें मला सतत आवडतात अशी कोणी समजूत केली तर ती चुकीची ठरेल. विद्वत्ताप्रचुर पुस्तकांबद्दल मला अतिशय आदर वाटतो. पण जिव्हाळा मात्र कधीच वाटत नाही. त्यांतील प्रखर विद्वत्ता व तर्कशुद्ध कोटिक्रम मला सूर्याच्या प्रखर किरणांसारखा डोळे दिपविणारा वाटतो. असे ग्रंथ माझ्या कपाटांत आहेत—पण कारणा-शिवाय मी त्यांच्या वाटेला फारसा जात नाहीं. मी त्यांना मोठ्या मानाने जपून ठेवतों. माझ्या संग्रहीं ते असल्याबद्दल मला अभिमानहि वाटतो. पण त्यांची माझी एकदा केव्हातरी दृष्टिभेट झाली असेल एवढेंच. मोठ्या विद्वानांच्या सहवासांत असलों म्हणजे मला ज्या प्रकारचा संकोच वाटतो, तशा प्रकारचा संकोच हे ग्रंथ मीं हातांत घेतले म्हणजे वाटतो. त्यांच्या सान्निध्यांत एक प्रकारची न्यूनगंडाची भावना सतत जागृत असते. ज्ञानाचें क्षेत्र केवढें व्यापक आहे आणि आपलें ज्ञान किती कोतें आहे याचीच जणू हे ग्रंथ मला सतत जाणीव करून देत असतात. अशा ग्रंथांच्या बाबतींत 'हे ग्रंथ आपणाकडे आहेत' ही जाणीवच मला सुखकारक वाटते. त्या उलट कांही पुस्तकें माझ्या घरांत नको असलेल्या तिऱ्हाईत पाहुण्याप्रमाणे गर्दी करून असतात. माझ्याकडे या ना त्या निमित्ताने आलेल्या अनेक पुस्तकांचा त्यामुळे मला अतिशय उपद्रव झालेला आहे. त्या सर्वांचें मी प्रथम स्वागत केलें. पण अनेकदा त्यांची संगत मला सतत रुक्ष बडबडीने कंटाळा आणणाऱ्या इसमाच्या संगतीप्रमाणे असह्य झाली होती. अशीं 'नको असलेलीं पुस्तकें' माझ्याकडे फारच आहेत. दूरच्या ओळखीच्या आधारावर गर्दी करून घरांत राहिलेल्या तिऱ्हाईत पाहुण्याप्रमाणे मला तीं जाचक होतात. आणि मग ज्याप्रमाणे आपण असे एकेक पाहुणे घरांतून हुसकून लावण्यासाठी क्लृप्त्या योजतों त्याप्रमाणे या पुस्तकांची घराबाहेर रवानगी करण्यासाठी मी अनेक क्लृप्त्या योजतों. हीं सर्व पुस्तकें माझ्याकडे येणाऱ्या सर्व मित्रांना सहज दिसतील अशा ठिकाणीं मीं ठेवलीं आहेत.

आणि ज्या ज्यावेळीं माझे मित्र माझ्याकडे पुस्तकांची मागणी करतात त्या त्या वेळीं हीं पुस्तकें मी त्यांना दाखवतों व त्यांना हवीं असतील तेवढीं पुस्तकें मोठ्या आनंदाने त्यांना नेऊं देतों. त्या पुस्तकांची परत मागणी मी त्यांना कधींच करीत नाहीं. शिवाय हीं पुस्तकें माझ्या आवडत्या पुस्तकांचें संरक्षण करण्यासाहि उपयोगी पडतात. मी माझीं आवडतीं पुस्तकें कुणास देत नाहीं–किंबहुना त्यांना दिसूं नयेत अशा ठिकाणीं मी तीं ठेवतों. माझ्याकडे ख़ूप पुस्तकें असतात अशी कीर्ति माझ्या सर्व स्नेहीमंडळींत पसरली असल्याने ज्यावेळीं ते पुस्तक मागण्यासाठी येतात त्यावेळीं हें आघाडीचें सैन्य मी त्यांच्यावर सोडून देतों. त्यामुळे त्यांचेंहि समाधान होतें आणि माझाहि हेतु साधतो. असे 'नको असलेले पाहुणे, अनेकदा मी वाचनालयाला भेट देऊन दातृत्वाची फुकटची कीर्तीहि पदरांत पाडून घेतों. आपलें अंतरंग अतिशय प्रेमळपणाने व रसिकतेने व्यक्त करणारे माझे स्नेही मात्र मी अगदी जिवापलीकडे जपतों–त्यांचा सहवास मला कौमुदीप्रमाणे आल्हाद-दायक वाटतो. जीवनांतील सुखदुःखांचा, विवंचनांचा, दैनंदिन रुक्षपणाचा मला यांच्या सहवासांत विसर पडतो आणि म्हणून माझीं अशीं पुस्तकें मी क्वचितच कुणाला देतों. असाच कुणी पुस्तकांची किंमत ओळखणारा रसिक समानधर्मी भेटला तर मात्र त्याच्यासमोर माझें सर्व भांडार मी खुलें करतों.

अशा रीतीने घरांतून कपाटाकपाटांतून भरलेलीं पुस्तकें पाहून अनेकांना आश्चर्य वाटतें, कांहींना कौतुक वाटतें व कांहींना पैशाची व जागेची ही उधळपट्टी वाटते. अनेक मित्र माझ्याकडे येतात व दर्शनी कपाटांत पुस्त-कांची रांग पाहून म्हणतात, "काय रे हें! किती सुंदर कपाट! यांत तूं कपडे–शोभेच्या वस्तु अशा कांही जिनसा ठेवायचें सोडून पुस्तकें काय ठेवलीस ?" पुस्तकांनी घराची शोभा वाढते याची याच काय अनेक लोकांना कल्पना

नाहीं. पुष्कळ मोठमोठ्या बंगल्यांतून मी जातों, तेथील वैभव मी पाहतों. मोठमोठ्या सुंदर कपाटांतून सुंदर कलाकुसरीचे जिन्नस आकर्षक रीतीनें मांडून ठेवलेले असतात; भिंतीवर रम्य चित्रें असतात; दाराला रंगीबेरंगी पडदे असतात; टेबलांवर फ्लॉवर पॉट, त्यांत सुंदर ताजीं फुलें, त्याच्या मागे कसला तरी सुंदर छोटा पुतळा–हें सगळं मला दिसतं. पण सबंध बंगल्यांत पुस्तकं कुठे मला दिसत नाहीत. बंगल्यांत मुलं शिकत असलीं तर त्यांचीं शाळेचीं जेवढीं पुस्तकें असतील तेवढींच. मी त्यांना त्यासंबंधी विचारलें तर ते म्हणतात, "छट्, पुस्तकं कोण विकत घेतो? घरांत विनाकारण अडगळ. त्यापेक्षा लायब्ररींतून हवीं तेव्हा पुस्तकं आणावींत, वाचून झाल्यावर तीं परत करावींत हें आम्हाला परवडतं." त्यांचें हें उत्तर ऐकून मला मोठी खंत वाटते. शोभेच्या वस्तूंसाठी वाटेल तो खर्च करण्याची तयारी असणाऱ्या या श्रीमंतांना पुस्तकांची अडगळ वाटावी हाच आपणाला मोठा शाप नाही काय? त्यामुळे कुणाच्या घरांत मी शिरलों की प्रथम त्याच्या घरांत कोणतीं पुस्तकें आहेत हें मी पाहतों आणि त्या घरांविषयीं त्यावरून मी अंदाज बांधतों. बहुतेक घरांतून पुस्तकें ही विकत घेण्याची गोष्ट आहे याची जाणीवच नसते. त्यामुळे त्यासंबंधी प्रश्न विचारला की, "काय तऱ्हेवाईक माणूस आहे हा!" अशा दृष्टीनेच ते माझ्याकडे पाहतात. पण अशीं घरें कितीहि सजविलेलीं असलीं तरी मला ओकीं ओकीं वाटतात. जुन्या संस्कृतींतील माणसाला घरांत देवघर नसल्यावर जितकें ओकें ओकें वाटत असेल तितकें मला घरांत पुस्तकांचें कपाट किंवा शेल्फ नसलें तर वाटतें. आणि त्या घरांत मला गुदमरल्यासारखें होतें. अशा घरांत फार वेळ मी रमूं शकत नाहीं.

पुष्कळांना पुस्तकांचें माझें हें वेड लोकविलक्षण वाटेल–माझ्या कांही मित्रांना तें वाटतेंहि–पण माझें तें वेड आता नाहीसें व्हायचें नाही. त्या वेडाशीं मी समरस झालों आहे. एखादा कृपण

माणसाचें आपल्या संपत्तीवर जितकें प्रेम असावें त्याहीपेक्षा अधिक माझ्या ग्रंथसंग्रहावर माझें प्रेम आहे. त्यांतील एकेक पुस्तक विकत घेतांना मी कशाकशाचा त्याग केला–तें विकत घेतांना कशा प्रकारचा अननुभूत आनंद मला झाला, यांची प्रत्येक पुस्तक मला आठवण देतें. यांतील कांही पुस्तकें विकत घेतांना मला माझ्या जीवनांतील गरजा बाजूला ठेवाव्या लागल्या, कांही विकत घेतांना पत्नीचें मन मोडावें लागलें आणि कांही विकत घेतांना मित्रांकडून पैसेहि उसनवार घ्यावे लागले. मला आठवतं, कोणत्यातरी आजारांतून मी उठलों असतांना डॉक्टरांनी एक टॉनिक मला घ्यावयास सांगितलें होतें–पण ते टॉनिकचे पैसे मी त्या वेळीं बॅरीचीं नाटकें विकत घेण्यांत खर्च केले. एम्. ए. ला मला चिपळूणकर पारितोषिक मिळालें तेव्हा त्या पैशाची तिच्या सोन्याच्या पाटल्यांत भर घालावी असा माझ्या पत्नीने हट्ट धरला होता. पण त्या हट्टाला न जुमानतां मी त्या पैशांतून हरि नारायण आपटे, माधव ज्युलियन, वामन मल्हार जोशी आणि यशवंत यांचे ग्रंथ घेतले होते. पुण्याहून लोकरीचा कोट आणावयास घेतलेले पैसे मी इब्सेन व युजीन ओनील यांचीं नाटकें विकत घेण्यांत खर्च करून टाकले होते. अशीं एक ना दोन ! प्रत्येक पुस्तकाच्या मागे कांही इतिहास आहे. तीं पुस्तकें व मी कांही एका विशिष्ट भावनेच्या धाग्यादोऱ्यांनी एकत्र गुंफले गेलों आहोंत. इतरांना त्याची कल्पना नाही. त्यांच्या दृष्टीने तीं पुस्तकें इतर पुस्तकांसारखींच असतील. पण माझे भावबंध त्या पुस्तकांशीं किती निगडित झाले आहेत याची त्यांना कल्पना नाही. आणि म्हणून माझ्या पुस्तकांचा कुणीं अपमान केला, कुणीं निष्काळजीपणें त्यांचे हाल केले तर तें मला सहन होत नाही. आपल्या मित्रांना अपमानाने वागवलेलें कुणाला आवडेल काय ? मग त्याच कारणासाठी मी जर लोकांवर रागावलों तर लोकांनी मला नांवं कां ठेवावींत ? माझा हा छंद दिवाणा आहे याची मला जाणीव आहे–लोक तर मला वेडा आणि

छांदिष्ट म्हणतातच. पैशाचा उपयोग पुस्तकें घेण्यासाठी मी करतों म्हणजे त्यांच्या मतें द्रव्याचा केवढा तरी अपव्यय मी करतों. ‘ पुस्तकें ही विकत घेण्याची गोष्ट नसून फुकट दुसऱ्याकडून मागून आणून वाचण्याची गोष्ट आहे. ’ असें पुस्तकविषयक तत्त्वज्ञान असलेल्या माझ्या मित्रांना किंवा माझ्या परिचितांना माझा हा छंद दिवाणा वाटला तर त्याची पर्वा मीं कां करावी ? उलट या छंदांतूनच

येइ जगा स्वप्नाची कान्ती
श्रमितांतरिं सुरुचिर विश्रांति
कलहि फुले ज्योतिर्मय शान्ती
दूध फुटे पाषाणा ।

असा मला प्रत्यय येत असल्यास त्या दिवाण्या छंदांत रमून जाणें आणि ज्यांना माझा हा छंद पसंत नसेल त्यांना ‘ त्यांचा आमुचा मार्ग निराळा ’ असें बजावणें हें अप्रस्तुत ठरेल काय ?

• • •

## १३ : स्वतःची ओळख

" आजच्या व्याख्यात्यांचें नांव आज महाराष्ट्रांत कुणाला माहीत नाही ? " गणेशोत्सवाचा तो चिटणीस श्रोत्यांना माझी ओळख करून देतांना सांगूं लागला, " महाराष्ट्रांतील हे सुप्रसिद्ध लेखक आहेत. लघु-कथालेखक व लघुनिबंधकार या नात्याने ते सर्व महाराष्ट्राला परिचित आहेतच—पण शिवाय ते उत्कृष्ट टीकाकारहि आहेत. मुंबई नभोवाणी केन्द्रावरून अनेकदा यांचीं पुस्तकपरीक्षणात्मक भाषणें होतात. तेव्हा असे सुविख्यात व थोर साहित्यिक आज आपणाला व्याख्याते म्हणून लाभले हें खरोखर आपलें भाग्यच समजलें पाहिजे. "

त्यांच्या या परिचयाने खरं म्हटलं म्हणजे माझी छाती अभिमानानं वर यावयास हवी होती. पण मी मात्र हें सगळं ऐकून मनांतल्या मनांत हंसत होतों. आणि त्याला कारणहि असेंच होतें.

व्याख्यानाला जावयास निघण्यापूर्वी हे चिटणीस माझ्याकडे आले होते आणि त्यांनी मला विचारलें होतें, " मला आपला व्याख्यानापूर्वी परिचय करून द्यावा लागेल. तेव्हा आपण आपला परिचय थोडक्यांत लिहून द्याल काय ? "

" पण तुम्हाला जितकी माझी माहिती असेल तीच का तुम्ही परिचयाच्या वेळी सांगत नाही ? तेवढी पुरे होईल. जास्त हवी कशाला ? " मीं म्हटलें.

" त्याचं असं आहे...." तो जरा संकोचाने अडखळत बोलूं लागला, " म्हणजे मला आपली तितकीशी माहिती नाही. तशी आपली रेडिओवरील एकदोन भाषणं ऐकली आहेत—अधून मधून आपलं साहित्यहि वाचलं आहे. "

त्याच्या त्या सगळ्या भाषणाचा इत्यर्थ त्याने माझं कोणतंच लेखन वाचलं नव्हतं हाच होता. तें कबूल करायला त्याला संकोच वाटत असावा हें उघड दिसत होतें. तो बिचारा इन्कमटॅक्स ऑफिसमधील कारकून. त्याच्या अतिउत्साहामुळे उत्सवाचें चिटणीसपद त्याच्यावर लादलें गेलें होतें. साहित्याचा व त्याचा संबंध अशा उत्सवप्रसंगीं व्याख्यानाच्या वेळीं केव्हा तरी यावयाचा. तेव्हा त्याला माझ्यासंबंधी कांहीच माहिती नसावी यांत आश्चर्य कांहीच नव्हतें. मी त्याला माझ्यासंबंधी एकदोन गोष्टी सांगून त्यापलीकडे माझा अधिक परिचय करून न देण्याविषयीं सांगितलें.

हें सर्व मला त्याचें परिचयाचें भाषण चाललें असतांना आठवलें. ‘ लघुकथालेखक व लघुनिबंधकार या नात्याने ते सर्व महाराष्ट्राला परिचित आहेत. ’ ‘ त्यांचें नांव आज महाराष्ट्रांत कुणाला माहीत नाहीं ? ’ इत्यादि त्याचीं विधानें ऐकून मला मनांतल्या मनांत हंसूं येत होतें. साऱ्या महाराष्ट्राला लघुनिबंधकार व लघुकथालेखक म्हणून परिचित असलेल्या माझी त्या चिटणीसाला मात्र त्या नात्याने ओळख नव्हती. मग त्याची महाराष्ट्राची व्याख्या तरी संकुचित असावी किंवा त्याचा तरी या महाराष्ट्रांत अन्तर्भाव होत नसावा. एकीकडे तो विशेषणांची वारेमाप उधळपट्टी करीत होता आणि दुसरीकडे माझ्या विषयीचें त्याचें अज्ञान तितकेंच गाढ होतें. ज्या गृहस्थाला माझा अजीबात परिचय नाही तो गृहस्थ माझा दुसऱ्यांना परिचय करून देणार या विसंगतीचेंच त्याचें भाषण ऐकतांना मला हंसूं येत होतें.

पण खरं म्हटलं असतां त्या चिटणीसाला हंसावयाचा मला काय हक्क होता ? माझीहि अनेक वेळां त्या चिटणीसासारखीच स्थिति झाली नव्हती काय ? मला आठवलें—एकदा आमच्या वाचनालयांत एका प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाचें भाषण होतें व परिचय करून देण्याचें काम माझ्याकडे देण्यांत आलें होतें. त्या अर्थशास्त्रज्ञाविषयीं मला कांहीसुद्धां

माहिती नव्हती. त्यामुळे त्यांचा परिचय काय करून द्यावा व कसा करून द्यावा याविषयीं माझ्या मनांत किती गोंधळ उडाला होता! शेवटीं मी आमच्या अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाला शरण गेलों आणि त्यांनी दिलेल्या माहितीचा पोपटाप्रमाणे परिचयाच्या भाषणांत उच्चार केला होता. त्यावेळीं मीहि मला सर्वस्वी अपरिचित असलेल्या गृहस्थाचा श्रोत्यांना परिचय करून देत नव्हतों काय? त्याहिपेक्षा एका सुप्रसिद्ध शास्त्रज्ञाचा परिचय करून देत असतांना माझा अधिकच गोंधळ उडाला होता. मी आमच्या कॉलेजांतील शास्त्राच्या प्राध्यापकाकडून त्यांनी केलेल्या संशोधनाची व त्यांनी लिहिलेल्या प्रबंधाची सर्व माहिती व्यवस्थित टिपून आणली होती व त्या टिपणावरून परिचय करून देत असतां कुठे अनु-संधान सुटलं कुणास ठाऊक—बहुधा मधलींच ओळ सुटली असावी—पण त्यांच्या संशोधनांतील तत्वासंबंधी एकच गोंधळ मीं उडवून दिला. सुदैवानें त्या सभेला शास्त्राचे जाणते थोडे होते व त्यांच्या लक्षांत माझा हा गोंधळ आल्यावाचून राहिला नसेल—व्याख्यात्यांनी तर माझ्या अकलेची मनांतल्या मनांत चांगलीच तारीफ केली असेल. पण बहुसंख्य श्रोतृवर्ग माझ्या इतकाच जाणता असल्यामुळे माझा त्यावेळचा परिचय मोठा विद्वत्तापूर्ण समजला गेला. मी मात्र त्या वेळेपासून कानाला खडा लावला कीं, ज्यांच्या कार्याची आपणाला चांगली माहिती नाही त्याचा परिचय आपण करून द्यावयाचा नाही.

व्याख्यात्याच्या परिचयाच्या वेळीं विशेषणांची जी वारेमाप उधळपट्टी केली जाते ती पुष्कळ वेळां त्या व्याख्यात्याची आपणाला पूर्ण माहिती नसल्यामुळे केली जाते. विषयाचें अज्ञान असलेला परीक्षक ज्याप्रमाणे अनेकदा उदार असतो त्याप्रमाणे व्याख्यात्याविषयी पुरेशी माहिती नसलेला माणूस त्याचा परिचय करून देतांना तशीच सढळ हाताने विशेषणें पेरीत असतो. अधिक स्तुति केली तर नुकसान तर कांही होत नाही—उलट व्याख्यात्याच्या अहंवृत्तीचें समाधान त्यामुळे होतें या

हिशोबाने तो आपणाला माहिती असलेलीं सर्व उत्कृष्ट विशेषणें आपल्या साहाय्याला घेतो. त्यांची तुलना पाश्चिमात्य मोठमोठ्या साहित्यिकांशीं करूं लागतो. एकदोन नाटकें लिहिलेल्या कुणा नाटककाराला तो मराठींतील बर्नार्ड शॉ बनवितो तर तीनचार कादंबऱ्यांची भर साहित्यांत टाकलेल्या कुणा होतकरू कादंबरीकाराला मराठींतील डिकन्सच्या पदवीला नेऊन पोहोचवितो. अगदी सामान्य कवि असला तरी सर्व महाराष्ट्र त्याच्या नांवाने दुमदुमून गेलेलें असतें—मराठी काव्यामध्ये त्याने कांहीतरी अपूर्व भर घातलेली असते—नव्या रिढीचा तो केशवसुत असतो. त्याच्या काव्याने मराठींत मोठी क्रान्ति केलेली असते. हें सर्व ऐकत असतांना त्या वक्त्याला मात्र एक तर मोठा संकोच वाटत असला पाहिजे, किंवा अहंकाराने त्याची छाती फुगून येत असली पाहिजे. एका चिटणीसाने माझा परिचय करून देतांना ज्या वेळीं 'हे महाराष्ट्रांतील गी द मोपांसा आहेत' असं सांगितलं त्या वेळीं मी तर चाटच पडलों. बहुधा मी लघुकथा लिहितों हें त्याला माहीत असावं आणि गी द मोपांसा हा फ्रेंच भाषेंतील फार मोठा लघुकथा-लेखक होऊन गेला हेंहि त्याला माहीत असावं. त्याने परिणामाची पर्वा न करतां दिला दोघांचा संबंध जोडून. पूर्ण माहिती करून न घेतां अनुमानधपक्यानेहि परिचय करून देणाऱ्याचे नमुने थोडे असतात असें नाही. पुणें विद्यापीठाच्या बहिःशाल मंडळातर्फे 'मराठी रंगभूमीचा परामर्श' या विषयावर व्याख्यानें देण्यासाठी मी एका केन्द्रांत गेलों असतां तेथील चिटणीसाने माझा परिचय करून देतांना सांगितलें, "आजच्या व्याख्यात्यांचा मराठी रंगभूमीचा अभ्यास फार गाढा आहे. त्यांनी या विषयांवर अनेक पुस्तकें लिहिलीं आहेत. त्यांनी चारपांच नाटकेंहि लिहिलीं आहेत. मराठी रंगभूमीचा इतका जवळून अनुभव आलेला व्याख्याता आपणाला आज लाभला आहे हें आपण आपलें भाग्यच समजलें पाहिजे." हें सर्व ऐकत असतांना मी अगदी चकितच होऊन गेलों. चिटणीसांनी ही सर्व नवीन

माहिती कुठून जमा केली हेंच मला समजेना. एकहि नाटक न लिहितां त्या दिवशी मी नाटककार बनलों होतों. नशीब एवढेंच की रंगभूमीच्या विषयाचा व माझ्या निराळ्या रीतीने संबंध जोडून 'यांनी नाटकांतूनहि अनेकदां कामें केलीं आहेत." असें विधान त्याने केलें नाही. नाटककाराबरोबर नटाची पदवीहि त्याने मला बहाल केली असती तर मी त्याचें काय करणार होतों ?

असे मनोरंजक परिचय ओळख करून देणाऱ्याच्या अज्ञानावर आधारलेले असल्याने त्यामुळे करमणूक होत असली तरी ओळख करून देणाऱ्याला कुणी दोष देत नाही. जिथे मूळ ओळखच नाही तिथे तो तरी ओळख कसली करून देणार ? पण ज्यांचा व आपला चांगला परिचय आहे अशा व्यक्तीची आपणाला यथायोग्य ओळख करून द्यावयास सांगितलें तरी ती आपणांला करून देतां येईल काय ? मला तरी याबाबतींत विश्वास वाटत नाही. याचें कारण यथार्थ परिचय करून देण्याइतकी कुणाची ओळख मला पटली आहे असें मला वाटतच नाहीं. कोणत्याहि मनुष्याच्या खऱ्याखुऱ्या स्वभावाची परीक्षा करणें हें अतिशयच कठीण काम आहे. अनेक वेळां मी त्यांत चकलों आहें. लोकांनी मला चकवलें आहे असं म्हणा वाटलें तर ! ज्या मनुष्याला मी निःस्वार्थी, निर्लोभी आणि आतिशय सरळ स्वभावाचा समजलों तो मनुष्य आतिशय स्वार्थी, लोभी व कुटिल वृत्तीचा निघाला. ज्याच्या परखड व कांहीशा सडेतोड भाषणाने मी तो तिरसट असल्याची कल्पना करून घेतली होती, तो अगदी प्रेमळ व माझ्याविषयी जिव्हाळा बाळगणारा निघाला. माणसाचा चेहेरा किंवा त्याची वरवरची कृति जशी असते तसा त्याचा स्वभाव असतोच असं नाही. आणि त्यामुळे आपल्या अगदी निकटच्या परिचित व्यक्तीची ओळखहि आपणाला अनेकदा पटलेली नसते.

आपल्या भोवतालचं परिचित व्यक्तींचं मंडळ एकदा प्रत्येकाने तपासून पाहावें व त्यांतल्या किती व्यक्तींचे स्वभाव आपण खरोखर ओळखले

आहेत याचा अंदाज घ्यावा. दिवसांतून सात सात आठ आठ तास ज्यांच्या सहवासांत असतो अशा व्यक्तींचेंहि अन्तरंग आपणाला नीटपणें माहीत नसल्याचा प्रत्येकाला प्रत्यय येईल. मनुष्य समाजांत वावरतांना आपल्या चेहेऱ्यावर खोट्या भावनेचा मुखवटा धारण करीत असतो आणि अंगावर खोट्या वागणुकीचा बुरखा घेत असतो. हा त्यांचा बुरखा जर काढून टाकला तर तो कसा दिसेल याची कल्पनाहि करतां येणार नाही. असे बुरखे अनेक वेळां या ना त्या कारणाने दूर होतात आणि माणसाचें खरें अंतरंग दिसून आपणाला मोठा चमत्कार वाटतो.

मला याबाबतींत आलेले अनुभव मोठे मजेदार आहेत. मला मनुष्य-स्वभावाची फार चांगली पारख आहे अशी मी माझ्याबद्दल उगीचच गैरसमजूत करून घेतली आहे. माझ्या भोवताली असलेल्या व्यक्तींच्या स्वभावाचा अंदाज बांधण्याचा मी नेहमी प्रयत्न करतों व तो नेहमी चुकीचा ठरतों. आणि तरी मनुष्यस्वभावाची मला चांगलीच पारख असल्याची माझी प्रौढी अद्याप जात नाही. मला आठवतें, रत्नागिरीला असतांना एक गृहस्थ माझ्या शेजारीं राहात होते. अतिशय सज्जन म्हणून त्यांची सर्व रत्नागिरींत ख्याति होती. त्यांच्या वागण्यांत सौजन्य होते. बोलण्यांत गोडवा होता व कृतींत जिव्हाळा होता. प्रत्येकाला तो आपलासा वाटे. अजातशत्रु म्हणूनच तो ओळखला जावयाचा. माझी व त्याची ओळख झाली त्या वेळीं त्याच्या मधुर वाणीने व लोभस सौजन्याने मी अगदी मोहित होऊन गेलों. नम्रपणाने अगदी वाकून नमस्कार करण्याची व चेहेऱ्यावर आर्जवी हास्य आणण्याची त्याची पद्धति कुणालाहि आपलासा करील अशीच होती. मी त्या गृहस्था-विषयी माझें मत माझ्या पत्नीला सांगितलें आणि अशा एका सज्जन व्यक्तीची ओळख झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. पण माझ्या पत्नीने ताडकन् सांगितले की हा गृहस्थ एक तर ढोंगी असला पाहिजे किंवा अतिशय भित्रा तरी असला पाहिजे. स्वतःविषयी वाटणारा न्यूनगंड

लपविण्यासाठी त्याने सौजन्याचा हा बुरखा धारण केला असावा. तिचें तें मत मला पटलें नाही—तिला त्या वेळीं मीं मूर्खांत काढलें. पण तीनच महिन्यांत त्या गृहस्थाचें अन्तरंग मला चांगलेंच उमगलें. आत्यंतिक सौजन्यांच्या आवरणाखाली व मधुर वाणीच्या बुरख्याखाली त्याने व्यापारांत चांगलाच काळाबाजार चालविला होता. आम्हाला हसऱ्या चेहेऱ्याने नीतीचे धडे देतां देतां कापडाचा, रॉकेलचा, साखरेचा, धान्याचा आणि इतर किती तरी वस्तूंचा काळा बाजार करून स्वतःची तिजोरी तो भरत होता. गरिबांना पठाणापेक्षाहि अधिक व्याजाने तो पैसे उसने देऊन त्यांना तो नागवत होता--आणि हें सर्व करतांना आपली आत्यंतिक नम्रता व चेहेऱ्यावरील हास्य तो कायम ठेवीत होता; त्याच्या घरीं महात्मा गांधींपासून सर्व पुढाऱ्यांचीं चित्रें होतीं.त्यांना तो नित्य हार घाली व पूज्य बापूजींचीं वचनें आपल्या भाषणांतून वेळीं अवेळी पेरी. त्याहिपेक्षा नंतर मला कळलें की तो मनुष्य अजातशत्रु होता याचें कारण त्याच्याशीं शत्रुत्व करण्याची-निदान उघडपणें शत्रुत्व करण्याची–कुणाची छाती नव्हती. तसा तो अतिशय खुनशी होता. त्या माणसाला जवळून पाहूनहि मला त्याच्या या स्वभावाची कल्पना आली नाही– जवळ जवळ तीन महिने मी त्या गृहस्थाची विनोबा, साने गुरुजी वगैरेंसारख्या श्रेष्ठ विभूतींशीं तुलना करीत होतों. त्याचें खरें स्वरूप कळल्यानंतर मला अगदी विरघळल्यासारखें झालें.

दुसरा एक गृहस्थ माझ्या जीवनांत असाच आला. अतिशय भाबडा वाटला मला तो. वेड्यासारखा सतत कांही तरी बडबड करीत असायचा. स्वतःच केलेल्या रुक्ष व नीरस विनोदावर स्वतःच खूष होऊन खूप मोठ्याने हसावयाचा, वेळीं अवेळीं माझी अकारण स्तुति करावयाचा,–आणि एकंदर माझ्याशीं मोठ्या नम्रतेने वागावयाचा. मनुष्यस्वभावाचे कांही नमुने पाहून मी या गृहस्थाचा अंदाज बांधतांना सावध झालों होतों. कोणत्या तरी स्वार्थी भावनेने तो माझ्याकडे येत असावा–वरून

भोळीं दिसणारीं माणसें आंतून अत्यंत भयंकर असतात–तेव्हा त्यांच्याशीं जरा जपूनच असावें असा मीं विचार केला. आणि त्याचा प्रत्ययहि मला आला. माझें आणि माझ्या पत्नीचें त्याच सुमारास कोणत्या तरी एका महत्त्वाच्या मुद्द्यावरून भांडण झालें होतें व आमचा मतभेद अधिकाधिक तीव्र होत चालला होता. एकदा मी कॉलेजांतून घरीं लवकर आलों आणि पाहतों तों हा माझ्या पत्नीशीं गंभीरपणें बोलत बसलेला. आमच्यामधील मतभेद तीव्र होण्यास तोच कारणीभूत झाला असावा अशी माझी त्यामुळे खात्री झाली. कित्येक उपद्व्यापी माणसांना दुसऱ्याच्या संसारांत आग लावून देण्यांत मोठें समाधान होत असतें. त्यापासून त्यांचा फायदा होतो असें नाही–पण आसुरी आनंद तरी निश्चित मिळतो. अशा स्वभावधर्माच्या माणसांपैकी तो असावा अशी मला खात्री पटली–आणि त्या दिवशीं संध्याकाळीं माझ्याबरोबर फिरायला नेऊन त्याला खूप झाडलें–नाही नाही तें त्याला बोललों व इतःपर तुझें तोंड पाहण्याची इच्छा नाही असें सांगून त्याला तेथेंच सोडून मी घरीं परत आलों. मी बोलत असतांना त्याचा चेहरा मोठा केविलवाणा व रडवा झाला होता हें मला दिसत होतें. पण तो मला त्याने घेतलेला बुरखाच वाटला. शेवटपर्यंत तो एक शब्दहि उलट बोलला नाही व मी उठून घरीं चालूं लागल्यावर तो जागचा हाललाहि नाही. मी घरीं परत आल्यावर पत्नीवर भडकलों आणि अशा नीच माणसानें सांगितलेलें ऐकून पत्नीनें गैरसमज करून घ्यावेत याबद्दल खंत व्यक्त केली. त्यावर ती आश्चर्याने म्हणाली, "अहो म्हणतां काय तुम्ही? शुद्धीवर आहांत काय?" मग तिने सांगितलें की गेल्या तीन दिवसांत त्या गृहस्थाने सतत सकाळ संध्याकाळ घरीं येऊन माझ्या पत्नीचा माझ्या विषयींचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला होता. माझ्या विषयी त्याला खरोखरीच अतिशय आदर वाटत होता–व त्यामुळे माझ्या ठिकाणीं असलेले दोष माझ्या एका विशिष्ट

स्वभावरचनेंतून कसे आले आहेत, आणि तो स्वभाव बदलणें आता कसें अशक्य आहे आणि याच स्वभाव-रचनेंतून अनेकविध गुणांचा उत्कर्ष कसा झाला आहे-इत्यादि गोष्टी तो तिला समजावून सांगत होता. तो एकंदर माझ्याविषयी काय सांगत होता देव जाणे-पण तें वाईट निश्चित नव्हतें आणि त्यामागे वाईट हेतु तर मुळीच नव्हता. पत्नीची समजूत पटल्यावर मग तो माझ्याकडे वळणार होता-पण त्या अगोदरच मी त्याला चांगलाच धारेवर घेतला होता. तिच्या तोंडून हें सारें ऐकल्यावर पुन्हा एकदा मी किती विरघळलों असेन याची कल्पनाच केलेली बरी.

एकंदरींत दुसऱ्याच्या स्वभावाची खरी खरी ओळख पटणें हें कठीणच आहे. जिभेवर मधाचा गोडवा असलेल्या माणसाच्या अन्तःकरणांत ज्याप्रमाणे हालाहल नसेलच असें सांगवत नाही त्याप्रमाणे जीभ तिखट असलेल्या माणसांचें हृदय नवनीताप्रमाणे कोमल नसेल असेंहि सांगवत नाही. आपणाला कितीतरी वेळां आपण केलेल्या मनुष्य-स्वभावाचा अंदाज चुकल्याचा प्रत्यय आला असेल आणि प्रत्येक वेळां आपल्या तोंडून ' अरे, ह्या माणसाचा स्वभाव असा असेल अशी आपली कल्पनाहि नव्हती " असे उद्गार बाहेर पडले असतील. मलाच आठवतें-मी शाळेंत तिसरींत असतांना आम्हाला जे वर्गशिक्षक आले होते ते अतिशय रागीट म्हणून नावाजलेले होते. विद्यार्थी त्यांना अतिशय घाबरत व त्यांनी जरा नजर वर करून पाहिली की थरथरा कांपत. त्यांचा आवाज मोठा होता, चेहेरा उग्र होता. व शरीरयष्टि दांडगी होती. त्यांच्या फेंदारलेल्या मिशांनी त्यांच्या उग्रपणांत अधिकच भर पडे. पण एकदा मी आजारी पडलों होतों तर सकाळ संध्याकाळ हे शिक्षक माझ्या घरीं येत. तास तास माझ्या बिछान्याशीं बसत व मोठ्या प्रेमाने माझी शुश्रूषा करीत. ' त्या उग्र चेहेऱ्याच्या मागे इतकें प्रेमळ अन्तःकरण असेल अशी कुणाला कल्पनाहि

आली नसेल. त्याच्या उलट केवळ विद्यार्थ्यांच्या मध्ये लोकप्रियता मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांशीं गोड बोलणारे, त्यांची खुशामत करणारे असे शिक्षकहि आमच्या वाट्याला आले होते. आणि ते आम्हाला खूप आवडायचेहि. पण त्यांच्यापैकी कुणीहि विद्यार्थ्यांच्या विषयीं खरी तळमळ दाखविलेली आज तरी आम्हाला आठवत नाही.

आपण नेहमी बाह्य देखाव्यावरूनच माणसाची परीक्षा करतों— आणि म्हणूनच ती अनेकदा फसते. 'मनुष्य दिसतो तसा नसतो' ही म्हण ज्यांने प्रचारांत आणली असेल त्याला मनुष्याच्या दुटप्पी वर्तणुकीचा खरोखरच मोठा कटु अनुभव आला असला पाहिजे. परमेश्वराने मनुष्याचें अन्तःकरण शरीरांत दडवून ठेवण्यांत मोठी कल्पकता दाखवली आहे यांत शंका नाही. मनुष्याची मनुष्याला ओळख पटूं नये असाच बहुधा त्याचा उद्देश असावा. आणि तो बहुतांशीं साध्य झालेला आहे यांत शंका नाही. कारण मनुष्याने वरून घेतलेल्या भाषणाच्या वा वर्तनाच्या बुरख्याखाली कोणतें अन्तःकरण असेल हें आपणाला सांगतां येत नाही. आपण आपल्या परिचित व्यक्तींना 'गरीब' 'रागीट' 'प्रेमळ' 'माणूसघाण्या' अशीं जीं लेबलें लावतों तीं त्यामुळेच बदलण्याचा आपणावर अनेकदा प्रसंग येतो. त्यामुळे कोणत्याहि माणसाची अगदी परिपूर्णतेने आपणाला ओळख पटली आहे अशी ग्वाही आपण देऊं नये हें बरें. कारण परिपूर्णतेने कुणीच मनुष्य कुणाला जाणूं शकत नाही.

पण त्याहिपेक्षा मी पुढे जाऊन विचारतों की दुसऱ्याची तर जाऊंच द्या, पण स्वतःची तरी स्वतःला नीट ओळख पटली आहे काय? आपण स्वतःचें एकदा प्रामाणिकपणें आत्मनिरीक्षण करून पाहा म्हणजे स्वतःचीच स्वतःला अद्याप नीट ओळख पटली नसल्याची जाणीव तुम्हाला होईल. मनुष्य अगोदर स्वतःविषयी फार विचार करीत नाही. आणि केलाच तर स्वतःचे दोष, स्वतःमधील उणीवा व स्वतःच्या मर्यादा

डोळ्याआड करण्याचा तो सारखा प्रयत्न करीत असतो. फार थोडे अपवाद सोडले तर जवळ जवळ प्रत्येक मनुष्य हा स्वार्थी असतो. पण आपण स्वार्थी आहोंत असें मनाशीं तरी कुणी कबूल केलें आहे काय? भित्र्या माणसाने आपण भेकड आहोंत अशी मनाशीं तरी कबुली कधी दिली आहे काय? दुसऱ्याची उन्नति, दुसऱ्याचें सौख्य, दुसऱ्याला अचानक झालेला लाभ आपल्या मनांत कुठे ना कुठे तरी बोचत असतो. त्याची तरी प्रामाणिक कबुली स्वतःशींच कुणी दिली आहे काय? दुसऱ्याच्या सौंदर्याबद्दल आपणाला हेवा वाटतो हें आपल्या मनाशींसुद्धा कुणी कबूल करणार नाही. मग आपली स्वतःची स्वतःला ओळख पटली आहे असं म्हणायचं तरी कसं?

विशेषतः मनुष्य जसें आपण आहोंत तसें आपणाला पाहात नाही, तर जसें आपण असावें असें त्याला वाटतें तसें तो स्वतःला पाहात असतो. भित्र्या माणसाला आपण धीट असावें असें वाटत असतें आणि तो स्वतःला धीटच समजूं लागतो. उथळ ज्ञान असलेल्या माणसाला आपण विद्वान् असावें असें वाटत असतें आणि आपण खरोखरच विद्वान् आहोंत अशी तो मनाची समजूत करून घेतो. आणि त्या आपल्या स्वरूपाचें दर्शन लोकांना घडावें अशीच त्याची इच्छा असते. अशीं माणसें मग स्वतः भित्रे नाही असें दाखविण्याकरितां—व स्वतःला पटविण्याकरिता—मुद्दाम संकटांत उडी घेतील. उथळ ज्ञान असलेलीं माणसें व्याख्यानाच्या वा जाहिरातीच्या द्वारें स्वतःच्या विद्वत्तेचा डोलारा उभा करून स्वतःला व इतरांना दिपवून टाकतील. कांही जण आपल्या अभिजात रसिकतेचा तर कांही जण आपल्या कलानैपुण्याचा डांगोरा पिटवून आपण रसिक वा कलावंत असल्याची स्वतःला व इतरांना जाणीव करून देतील. हें सर्व करीत असतांना मनुष्य स्वतःला इतका फसवत असतो की शेवटीं त्या फसवणुकीवरच त्याची श्रद्धा हळू हळू बसत जाते. त्याचें खरें व्यक्तिमत्त्व झाकून जाते. व कृत्रिम कवच त्या व्यक्तिमत्त्वावर हळू हळू चढत जाते. हें

कृत्रिम कवच म्हणजे आपलें खरें व्यक्तिमत्त्व अशी स्वतःची तो प्रामाणिक समजूत करून घेतो.

माझा एक मित्र अतिशय भोळा आहे. त्याला व्यवहारज्ञान बिलकूल नाही. पण आपण अगदी धूर्त आहोंत अशी त्याची प्रामाणिक समजूत आहे. त्याच्या आजुबाजूचे लोक त्याच्या धूर्तपणाची खोटी तारीफ करीत त्याला फसवतात हें आम्हाला दिसत असतें—पण आपण साधेभोळे आहोंत व फसवले जात आहोंत हें त्याला मुळी मान्यच होत नाही. उलट दुकानदाराने चाळीस रुपयांला सांगितलेला जिन्नस त्याला बनवून आपण तीस रुपयांस कसा घेतला या आपल्या धूर्तपणावरच स्वारी खुष असते. पण मूळ त्या पदार्थाची किंमत पंचवीसपेक्षा जास्त नाही हें मात्र त्याच्या लक्षांत येत नाही. माझ्या दुसऱ्या एका मित्राला आपण गाण्याचें अगदी मर्मज्ञ आहोंत असा अभिमान आहे. गांवांतील प्रत्येक गाण्याच्या बैठकीला तो हजर असतो व गवयाच्या पुढे बसून रसिकतेने जोरजोरांत माना डोलवीत असतो. अमक्या गवयाची गायकी कशी आहे, तमक्या गवयाची तयारी कशी आहे, अमक्या अमक्या बैठकीला हिराबाईंनी कसा रंग भरला इत्यादि अनेक गोष्टींची चर्चा तो मोठ्या अधिकारवाणीने करीत असे. त्याच्याशिवाय कोणतीहि संगीताची बैठक पूर्ण व्हावयाची नाही असा लौकिक त्याने आपल्या गांवांत मिळून ठेवला होता. पण एका जाणकार कलावंताकडून मला असें कळलें की संगीताचें त्याचें ज्ञान अगदीच जुजबी आहे–जें आहें ते शब्दावडंबर आहे. निरनिराळ्या रागांची त्याला स्थूल माहिती आहे–पण त्यांतील बारकावे त्याला अजीबात अवगत नाहीत. आणि याच भांडवलावर आपण संगीताचे मर्मज्ञ आहोंत अशी त्याने समजूत करून घेतली आहे व इतरांची करून दिली आहे. त्यांत तो दुसऱ्यांची फसवणूक करतो आहे असें मात्र बिलकूल नाही. त्याला स्वतःचीच नीट ओळख पटलेली नाही, त्याला तो तरी काय करणार?

माझ्या मित्राची गोष्ट कशाला पाहिजे ? माझी मलाच अद्याप नीट ओळख पटलेली नाही. माझ्याविषयी मी जों जों अधिक विचार करावयास लागतों तों तों मी म्हणजे खरोखरच एक गूढ आहे असें मला पटूं लागते. 'मी कसा आहे ?' याचें उत्तर माझें मलाच अद्याप सापडलें नाही. अनेकांनी अनेक रीतीनें माझ्या स्वभावाचें विश्लेषण करावयाचा प्रयत्न केला आहे, पण त्यांना तर 'मी' सांपडलों नाहींच, पण मलासुद्धा अजून 'मी' सांपडलों नाही. या बाबतींत मला गडकऱ्यांच्या 'माझा मृत्युलेख' या कवितेची आठवण होते. त्यांत ते म्हणतात–

यावज्जीवहि 'काय मी' न कळलें आप्तांप्रती नीटसें ।
मित्रांतेंहि कळे न गूढ–नकळे माझें मलाही तसें ।।

माझीहि अगदी तशीच अवस्था झाली आहे. माझ्या मित्रांनी माझें अनेक रीतीने वर्णन केलें आहे–नातेवाईकांनीहि तसा प्रयत्न केला आहे आणि विद्यार्थी वर्ग तर नेहमीच करतात. माझी पत्नी तर नेहमीच 'मी कसा आहें' याची जाणीव मला देत असते. तें सर्व वर्णन माझ्या कानांवर येऊनसुद्धा 'माझा' मला थांग लागत नाही.

याचें खरें कारण असें असावें की मनुष्य स्वतःचें कठोरपणाने परीक्षणच करूं शकत नाही. किंबहुना स्वतःचें कठोर परीक्षण करण्याचें धैर्य माणसाच्या ठिकाणीं नसतें. आणि म्हणून त्याला स्वतःची खरी ओळख पटत नाही. कारण असें परीक्षण करावयास लागलों तर आपल्या अन्तरंगाचें चित्र कसें दिसेल याची त्याला सतत भीति वाटत असते. काम, क्रोध, मत्सर, लोभ इत्यादि षड्रिपूंचें उघड्या नागड्या स्वरूपांत होणारें भयानक दर्शन आपणाला तेथे घडेल, स्वार्थाची भावना तिथे तुम्हाला दवा धरून बसलेली दिसेल व या आसुरी संपत्तीचे दैवी संपत्तीशीं सतत होणारे संघर्ष तुम्हाला तेथे पाहावयास मिळतील. माणसाचें मन म्हणजे एक समरभूमि आहे याचा प्रत्यय तुम्हाला तेथे

येईल व या संघर्षांत आसुरी संपत्तीनेच दैवी संपत्तीवर विजय मिळविला असल्याचें दृश्यहि तुम्हाला तिथे पहावें लागेल. या सर्व गोष्टींमुळे मनुष्याला स्वतःचें कठोर आत्मपरीक्षण करण्याचें धैर्यच होत नाही. आपण अतिशय स्वार्थी आहोंत, अतिशय भित्रे आहोंत, अतिशय मत्सरी आहोंत अशी आपली स्वतःची ओळख कुणाला आवडेल? त्यामुळे आपल्या ठिकाणीं असलेल्या चांगल्या गुणांवर आपलें लक्ष अधिक केन्द्रित होतें व त्या गुणाशींच आपलें व्यक्तित्व निगडित करण्याचा आपण प्रयत्न करतों, आणि त्याच्या साहाय्याने आपल्या निरनिराळ्या कृतीचें समर्थन करण्याची व त्याला मोहक आवरण देण्याची आपली खटपट चालू असते. भित्रेपणांतून निर्माण झालेल्या कृतीवर आपण चांगुलपणाचा छाप मारतों. कीर्तीच्या लालसेंतून उत्पन्न झालेल्या कृतीवर स्वार्थत्यागाचा शिक्कामोर्तब करतों व कामुकतेंतून निर्माण झालेल्या कृतीला 'प्रेम' या नांवाने गौरवतों. आपल्या प्रत्येक स्वार्थमूलक कृतीला कांहीतरी गौरवपूर्वक नांव देऊन आपण स्वतःची फसवणूक करून घेत असतों.

आपण स्वतःलाहि नीट ओळखत नाही आणि दुसऱ्यांनाहि नीट ओळखत नाही. खरं म्हणजे आपण स्वतःला नीट ओळखत नाही म्हणूनच दुसऱ्यांना नीट ओळखूं शकत नाही असें म्हटलें तर तें अधिक योग्य होईल. आपली आपणाला नीट ओळख पटली, आपल्यामधील दोषांची, उणीवांची आपणाला जाणीव झाली म्हणजे दुसऱ्यांच्या दोषांकडे व उणीवांकडे आपण सहिष्णुतेने पाहूं शकतों व त्यांच्या वृत्तीचा गैरसमज करून घेत नाही. जो स्वतःला ओळखतो त्याला इतराची ओळखहि चटकन् होते. 'इंदू काळे व सरला भोळे' या वामनराव जोश्यांच्या कादंबरीचा नायक विनायकराव एके ठिकाणीं म्हणतो, "To understand all is to forgive all." त्यांत थोडी दुरुस्ती सुचवून मी असें म्हणेन की, "To understand one's self,

is to forgive all. " ज्याला स्वतःची खरी ओळख पटलेली असते, त्याची दृष्टि अधिक व्यापक होते; इतरांनी केलेल्या अपराधांकडे तो सहिष्णु नजरेने पाहूं शकतो. त्यामुळे त्यावद्दल त्याच्या मनांत गैरसमज होत नाहीत. 'Know thyself and thou knowest all' या सूत्रांतील रहस्य तेंच आहे. स्वतःची खरी ओळख पटली की सर्व जगाची आपणाला ओळख पटते. पूर्वीच्या साधुसंतांना ती ओळख पटली होती आणि म्हणूनच स्वतःच्या ठिकाणीं ते परब्रह्म पाहूं शकले आणि 'हें विश्वचि माझें घर' असे विश्वबंधुतेचे व्यापक भाव त्यांच्या काव्यांतून दरवळूं शकले.

पण आपणाला तीच तर स्वतःची ओळख पटत नाही. चार दिवस घरीं राहिलेला पाहुणा आपल्या यजमानाला जितका ओळखेल तितकेच आपण आपल्या स्वतःला ओळखतों. आणि मग स्वतःभोवती आभास-मय खोटें वलय निर्माण करून व तो आभास म्हणजेच 'मी' असें समजून स्वतःची फसवणूक करून घेत असतो. आभासाच्या अशा या कृत्रिम वलयांत स्वतःचीं क्षुद्र सुखदुःखें, मानापमान, रागलोभ, समज गैरसमज यांचा संसार थाटीत असतो. अशीं अनेकांचीं आभासमय वलयें एकत्र आलीं की त्यांतून संघर्षाची ठिणगी निघते व हां हां म्हणतां तिचें वणव्यांत रूपान्तर होतें. मनुष्याला जोंपर्यंत स्वतःची नीट ओळख पटली नाही व स्वतःची नीट ओळख पटून तो जोंपर्यंत दुसऱ्याची ओळख नीट पटवून घेत नाही तोंपर्यंत मानवतेच्या, विश्वबंधुत्वाच्या आणि जागतिक शांततेच्या गोष्टी आपण करणें म्हणजे आपली स्वतःची पुन्हा एकदा फसवणूक करणें नाही का?

• • •

माझ्या मित्राला मला पडलेलें चमत्कारिक स्वप्न वर्णन करून सांगण्यांत मी अगदी रंगून गेलों होतों.

त्या माझ्या स्वप्नांत एस्. एस्. सी. च्या परीक्षेचा मी कंडक्टर होतों. छापखान्यांत पेपर छापण्याची जबाबदारी संपल्यावर मी ते पेपर घेऊन कॉलेजच्या इमारतींत आलों होतों. तेवढ्यांत १५-२० एस्. एस्. सी.च्या विद्यार्थ्यांनी मला घेरलें आणि मला बळजबरीने एका वर्गांत नेऊन माझ्यापुढे संस्कृतचा पेपर ठेवला आणि सर्वजण ओरडले, "तुम्ही तरी सोडवून दाखवा हा पेपर—नाही–तुम्हाला हा सोडवलाच पाहिजे. त्याशिवाय या हॉलच्या बाहेर तुम्हाला जातां येणार नाही." तो संस्कृतचा पेपर पाहून माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला. परोक्षभूत–अनद्यतन भूत–इत्यादि भूतांचे अनियमित प्रकार माझ्या डोळ्यांसमोर नाचूं लागले. सामासिक शब्दांची प्रभावळ डोळ्यांसमोर उभी राहिली. माझ्या तोंडाला कोरड पडली. पेपर टाकून वर्गांतून पळून जावें म्हणून आजूबाजूला पाहिलें तों ते सर्व विद्यार्थी दुष्टपणाने खदखदा हसत भोवताली उभे आहेत असें दिसलें. इतक्यांत चीफ कंडक्टर वर्गांत आले. आता तरी माझी सुटका होईल अशा कल्पनेने मीं त्यांच्याकडे पाहिलें. तों त्यांनी हातांतील तार पुढे करून म्हटलें, "एस्. एस्. सी. बोर्डाकडून आत्ताच तार आली आहे. आतापर्यंत तुम्हीं विद्यार्थ्यांचे पेपर्स तपासले. आता विद्यार्थ्यांनी तुमचे पेपर्स तपासावेत असें बोर्डाने ठरविलें आहे. तेव्हा तुम्ही हा पेपर लिहिलाच पाहिजे." तें ऐकतांच सर्व विद्यार्थ्यांनी दुष्टपणाने टाळ्यांचा कडकडाट केला. मीं पेपर फेकून दिला व ओरडलों, "नाहीं नाही! मी कदापि पेपर सोडविणार नाही." "तुम्हाला

सोडवलाच पाहिजे." सर्व विद्यार्थी-वर्ग ओरडला, "आम्हा विद्यार्थ्यांना छळतांना तुम्हाला बरें वाटतें, नाही का? आमच्यासाठी मुद्दाम अनियमित आणि अवघड धातु निवडतांना तुम्हाला मोठा आनंद होतो ना? आता घ्या हीं अवघड रूपं." असें म्हणून शक्ल्, पच्, मुच्, रिच्, इत्यादि अनियमित धातूंची माळ त्यांनी माझ्या गळ्यांत घातली आणि टाळ्या पिटीत म्हटलें, "आता मुकाट्याने पेपर सोडवितां की नाही? नाही तर तो पाहा........" असें म्हणून त्यांनी एका कोपऱ्यांत बोट दाखविलें. तिथे पंचतंत्रांतील पहिल्याच उताऱ्यांतला सिंह गुरगुरत डोळे लाल करून माझ्याकडे पाहात होता. त्याला पाहतांच मी खूप मोठ्याने ओरडलों, घामाने थबथबून गेलों. तेवढ्यांत तो सिंह जवळ येऊन आपल्या पंजाने मला घुसळत असल्याचा भास झाला. मीं डोळे घट्ट मिटून घेतले. पण पुन्हा डोळे उघडून पाहतों तों मी माझ्या खोलींतच होतों व आमच्या सौभाग्यवती जोरजोरांत हालवून मला जागे करीत होत्या.

माझें हें सारें स्वप्न माझ्या मित्राने शांतपणें ऐकून घेतलें आणि नंतर तो म्हणाला, "हें पाहा पंडितराव, तुम्ही आपली प्रकृति एखाद्या चांगल्या डॉक्टरांना दाखवा. तुम्हाला शांत झोप येत नसावी असें दिसतें. म्हणूनच तुमची शरीरयष्टि अशी किडकिडीत आहे. माणसाला झोप कशी शांत यावयास पाहिजे. एकदा बिछान्याला पाठ टेकली की आठ तास जग आपणाला व आपण जगाला पूर्णपणें मेलों अशी खरी झोप हवी. स्वप्नंबिप्नं कांही पडतां कामा नयेत. तुम्हाला स्वप्नं पडतात याचा अर्थ तुमच्या प्रकृतींत कांही तरी विकृति झालेली असावी."

हें सर्व माझ्या मित्राचें भाषण ऐकून एखाद्या टेकडीवरून खालीं दरींत कोसळल्यासारखें मला झालें. मला पडलेल्या स्वप्नाची हकीकत ऐकतांना त्याला गंमत वाटेल अशा कल्पनेने मी त्याला स्वप्न वर्णन

करून सांगत होतों आणि माझ्या मित्राने प्रकृति सुधारण्याचा सल्ला मोठ्या कळकळीने देऊं केला होता.

"तुला स्वप्नं कधीच पडत नाहीत?" मी आश्चर्याने माझ्या मित्राला विचारलें.

"बिलकुल नाहीं." तो म्हणाला, "एकदा बिछान्यावर पडलों की आठ तास मला जगाची जाणीव नसते. आणि एखाद्या रात्रीं स्वप्न पडलंच तर माझा कोठा बिघडला असावा असें समजून मी सकाळीं एरंडेल घेतों."

एरंडेल घेतल्यासारखा चेहेरा करीत मीं ती चर्चा तेथेच संपवली. स्वप्नाचें सौंदर्य ज्याला कळत नाही त्या माणसापुढे स्वप्नासंबंधी काय किंवा स्वप्नसृष्टिसंबंधी काय अधिक चर्चा करण्यांत कांहीच अर्थ नव्हता.

या मित्रानेच नव्हे, तर अनेकांनी मला आपली प्रकृति डॉक्टरांना दाखविण्याचा सल्ला दिला होता. कुणी भरपूर व्यायाम करण्याचा उपदेश केला होता, तर कुणी आहाराचें नियमन करावें असेंहि सुचविलें होतें. त्यांच्या प्रत्येकाच्या भाषणांत एकच सूर होता. ज्याअर्थीं झोपेंत मला स्वप्नें पडतात त्याअर्थीं मला गाढ झोप येत नसली पाहिजे—आणि गाढ झोप आली नाही म्हणजे दिवसभर काम करावयास तरतरी वाटत नाही. व त्याचा परिणाम नकळत प्रकृतीवर होऊं लागतो. बहुधा माझ्या किडकिडीत शरीरयष्टीला उद्देशून माझ्या या सर्व मित्रांनी हे उद्‌गार काढले असावेत. गाढ झोपेसारखं दुसरं सुख नाही असें त्यांचें प्रामाणिक मत त्यांनी अनेकवेळां मला ऐकवलें आहे व उदाहरण म्हणून स्वतःच्या प्रकृतीचा हवाला द्यावयासहि त्यांनी कमी केलें नाही.

त्यांचा हा उपदेश मी ऐकतों व मनाशींच हंसतों. मला गाढ झोप लागत नाही आणि म्हणून मी अतिशय दुःखी आहें अशी त्यांनी

स्वतःची समजूत करून घेतलेली दिसते. वास्तविक खरा प्रकार उलट आहे. गाढ झोपेच्या आहारीं गेल्यामुळे स्वप्नसृष्टीचें खरें सौंदर्य त्यांना कळत नाही असें मला वाटतें, व त्यांची एकप्रकारें कींवहि येते. कींव अशाकरिता की गाढ झोपेचें कौतुक करण्याच्या भरांत जीवनांतील केवढ्या तरी मोठ्या आनंदाला ते मुकले आहेत. रात्रीची सुंदर वेळ मुळी स्वप्नें पाहण्याकरिता असते याची 'गाढ झोपे' पुढे त्यांना जाणीवहि नाही. दिवसाच्या प्रखर व्यवहारवादानंतर व रुक्ष बुद्धिवादानंतर येणारी काव्यात्म रात्र म्हणजे दिवसाच्या प्रखर उन्हानंतर येणारी कौमुदीच नव्हे काय? रात्र म्हणजे परमेश्वराचें एक सुरम्य स्वप्न आहे. अशा वेळीं आपण स्वप्नाच्या दुनियेंत विहार करावयाचा नाही तर काय नुसती गाढ झोप घ्यावयाची?

मी मुळी झोपतों तो स्वप्नाच्या दुनियेंत विहार करण्यासाठीच. आणि माझी स्वप्नसृष्टीहि किती विविध व बहुरंगी आहे! अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टींतील अद्भुतरम्य सृष्टीपासून आजच्या अगदी वास्तव सृष्टीपर्यंत सर्वत्र माझा विहार असतो. साहित्याप्रमाणे माझी स्वप्नसृष्टीहि नवरसात्मक आहे. साहित्यांतील नऊहि रसांचा आस्वाद मला माझ्या स्वप्नाच्या दुनियेंत घेतां येतो. याशिवाय तिला काळाचीं बंधनेंहि नाहीत. कधी ती भूतकाळांत विहार करील, कधी भविष्यकाळाचीं दृश्यें माझ्या-पुढे उभी करील, तर कधी वर्तमानकाळांतील प्रखर वास्तवामध्ये मला बुडवील. विशेष म्हणजे काळाने माझ्यापासून दूर नेलेल्या, किंबहुना कधीहि न पाहिलेल्या अशा मला प्रिय असलेल्या व्यक्तींच्या सहवासाचा लाभहि मला स्वप्नसृष्टींत घेतां येतो. जें वास्तव जीवनांत शक्य नाही तें ही स्वप्नसृष्टि शक्य करून दाखविते; हा स्वप्नसृष्टीचा आपणावर केवढा उपकार आहे!

मला आठवतें की, एका स्वप्नांत मी ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या प्रसंगीं हजर होतों. आदल्या दिवशीं ज्ञानेश्वरांच्या जीवनावर वर्गात व्याख्यान

दिल्यामुळे असो की इतर कांही कारणाने असो, त्या दिवशीं स्वप्नसृष्टीने मला ज्ञानेश्वराच्या काळांत एकदम् ओढून नेलें. अद्याप तीं सर्व चित्रें माझ्या मनश्चक्षूंसमोर दिसतात व चित्त कसें थरारून जातें. ज्ञानेश्वरांच्या समाधीची सर्व सिद्धता झाली आहे. सर्व संतांचा मेळावा आळंदीला जमला आहे. आणि ज्ञानेश्वर आपणामधून जाणार म्हणून सर्वांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात आहेत. नामदेव तर लहान मुलासारखा ढसाढसा रडत आहे. ज्ञानेश्वर मात्र स्थितप्रज्ञ आहेत–त्यांच्या मनाची शांति यत्किंचितहि ढळलेली नाही. सर्वांचा निरोप घेत, प्रत्येकाचें समाधान करीत ते संतमेळाव्यांतून हिंडत आहेत. पण

कासावीस प्राण मन तळमळी। जैसी का मासोळी या जीवनाविण ॥
दाही दिशा ओस वाटती उदास। करिताती सोस मनामाजी ॥
घातियेली घोण प्राण आला कंठीं। ज्ञानदेवासाठी तळमळी ॥

अशी नामाप्रमाणे सर्वांची स्थिति झाली आहे. संतमंडळांतून हिंडतां हिंडतां एका कोपऱ्यांत मी स्फुंदत उभा होतों त्या ठिकाणीं ज्ञानेश्वर आले. माझ्या पाठीवरून हात फिरवीत ते म्हणाले, "रडतोस कशा-साठी? खरोखरच मी तुमच्यामधून जातों आहे असं तुला वाटतं काय?" आणि ते पुढे गेले. त्या एकाच क्षणांत स्वप्नांतील माझं जीवन फुलून निघालं. त्या स्पर्शाच्या संवेदना विद्युल्लहरीप्रमाणे नसानसांतून संचारल्या. ज्ञानेश्वरांच्या मागोमाग संतमेळ्यासमवेत मी जाऊं लागलों. ज्ञानेश्वरांच्या समाधीचें ठिकाण केळीचे खुंट, तोरणें, पताका वगैरे लावून सुशोभित केलें होतें. जवळच निवृत्ति बसले होते. त्यांचा चेहेरा धीरगंभीर व शांत होता. पण मनांतील भावनांची खळखळ मधूनच त्यांच्याहि चेहेऱ्यावर प्रकट होते आहे व डोळ्यांत येणारा अश्रुबिंदु कुणाला नकळत पुसण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. मुक्ताबाई व सोपान स्फुंदून स्फुंदून रडत आहेत. तेवढ्यांत ज्ञानेश्वर निवृत्तींपाशी आले आणि त्यांच्या चरणाला त्यांनी मिठी घातली. गुरुशिष्यांचें तें संमीलन कांही अपूर्व

होतें. प्रत्येकाचें हृदय त्या दृश्याने थरारून गेलें. ज्ञानेशांनी नंतर सोपान व मुक्ताई यांना जवळ घेऊन त्यांच्या पाठीवरून हात फिरविला. मागे वळून त्यांनी सर्व संतमंडळाला नमस्कार केला, व निवृत्तीचा हात धरून समाधिस्थानीं त्यांनी प्रवेश केला. टाळ, वीणा, मृदंग व हरिनामाचा गजर यांच्या बरोबरच संतमंडळीचें स्फुंदणेंहि स्पष्ट ऐकूं येत होतें. ज्ञानेश्वर आसनस्थ झाले. समोर नीरांजन व ज्ञानेश्वरी ठेवलेल्या व डोळे मिटून समाधिस्थ झालेल्या ज्ञानेश्वरांचें शेवटचें दर्शन घेण्यासाठी एकच गर्दी झाली. हा तेजस्वी महात्मा आता पुन्हा केव्हाहि आपणाला दिसणार नाहीं या कल्पनेने सर्वांचीं अंतःकरणें व्याकुळ झालीं होतीं. या धडपडींत त्या समाधिस्थ ज्ञानेशांच्या मूर्तीचें मीं शेवटचें दर्शन घेतलें. तेवढ्यांत निवृत्ति बाहेर आले व समाधीला त्यांनी शिळा घातली. त्याबरोबर एकच गगनभेदी आरोळी उठली. अनावर दुःखाने मीहि मुसमुसून रडूं लागलों. आणि तेवढयांत माझ्या पत्नीने मला जागें केलें. 'झोपेंत रडायला काय झालं? कांही वाईट स्वप्न पडलं की काय?' असें ती मला हालवून विचारींत होती. मी पूर्ण जागा झालों. पण ज्ञानेश्वरांच्या समाधीचें तें दृश्य माझ्या डोळ्यापुढून जाईना. नंतर तीनचार दिवस मी या स्वप्नामुळे अगदी बेचैन होतों. आणि आजहि त्यांचा तो तेजस्वी चेहेरा, माझ्या पाठीवर हात फिरवीत असतांना 'रडतोस कशासाठी? मी खरोखरच तुमच्यामधून जातों आहे असं तुला वाटतं काय?' असे त्यांनी काढलेले उद्गार मला स्पष्टपणें आठवतात. स्वप्नांत का होईना, पण ज्ञानेश्वरासारख्या विभूतीचें मला दर्शन झालें व सहवास लाभला याबद्दल मला आज धन्य वाटतें. ज्या स्वप्नसृष्टीने मला हा लाभ मिळवून दिला त्या स्वप्नसृष्टींविषयीं मी कृतज्ञ असूं नव्हे काय?

'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' ही म्हण माझ्या पुष्कळशा स्वप्नांच्या बाबतींत खरी ठरली आहे. दिवसा जें पुस्तक मीं वाचलें असेल किंवा जो विषय माझ्या डोक्यांत घोळत असेल तो तो माझ्या स्वप्नाच्या दुनियेंत

साकार होतो. व तें तें जीवन मी पुन्हा एकदा स्वप्नसृष्टींत अनुभवतों. त्यामुळे हरि नारायण आपट्यांचा भावानंद, शिवरामपंत, शंकरमामंजी, यमू, यशवंतराव इत्यादि अनेक व्यक्तींचा स्वप्नसृष्टीच्या द्वारें माझा दाट परिचय झालेला आहे. वामन मल्हारांची रागिणी, उत्तरा, सुशीला, इंदु काळे, सरला भोळे ही स्त्री सृष्टि व भय्यासाहेब, आनंदराव,सुनंदा, विनायकराव ही पुरुषसृष्टि किती वेळां माझ्या स्वप्नांत आली असेल याची गणतीच नाही. विशेषतः फटकळ उत्तरा, त्यागी सरला, आणि ध्येयनिष्ठ विनायकराव हे तर पुन्हा पुन्हा माझ्या स्वप्नांत येतात. विनायकरावांबरोबर कितीतरी वेळां पांचबावडीला मीं फेरफटका केला असेन. उत्तरा व आनंदरावाबरोबर कारिसेनी लोकांच्या टोळींत सांपडून कटोहाच्या भयानक प्रसंगाचा अनुभवहि मीं अनेकदा घेतला असेन. त्याबरोबरच पाश्चिमात्य लेखकाचे ग्रंथ वाचल्यानंतर त्या त्या वैचित्र्ययुक्त नव्या जीवनाचा आस्वादहि मीं कितींदा घेतला हें सांगणें कठीण आहे. मॉम्च्या कथा वाचतांना त्यांच्याबरोबर मीं मलाया, चायना इत्यादि अनेक नवीन नवीन प्रदेशांतून विहार केला आहे आणि विविध मानवी स्वभावाच्या व्यक्तींची गांठभेटहि घेतली आहे. माझ्या स्वप्नसृष्टींतील जीवन विविधरंगी व नवरसात्मक असतें असें मीं जें म्हटलें त्याचें कारण हेंच की मीं वाचलेल्या साहित्यांतील सर्व वैचित्र्याचा व सर्व रसांचा अनुभव मी माझ्या स्वप्नाच्या दुनियेंत घेत असतों. एका दृष्टीने मला हा पुनःप्रत्ययाचा आनंदच मिळत असतो असें मला वाटतें. या अनुभवांत भयानक रसांचा अनुभवहि अर्थातच येत असतो. विशेषतः एखादी इंग्रजीमधील रहस्यकथा वाचली की त्या रात्रीं निश्चित ते सर्व देखावे स्वप्नांत येतात. एकदा एका स्वप्नांत एका दरवडेखोरांच्या टोळीने मला पकडून एका भयानक अरण्यांतील गुहेंत नेलें होतें. (स्वप्नांतसुद्धा एखाद्या दरिद्री प्राध्यापकाला पकडण्याचा दरोडेखोराला कां मोह झाला हें मला गूढच आहे.) आणि तेथे मला गोळी घालून ठार करावयाचें

की शेजारच्या झाडावर टांगून ठार करावयाचें यासंबंधी त्यांची चर्चा सुरू झाली. मी त्यांचा तसा काय गुन्हा केला होता देव जाणे. शेवटीं मला गोळी घालून ठार मारण्याचें त्यांनी ठरविलें—त्यांनी माझे डोळे बांधले आणि भिंतीशीं उभें केलें. आता थोड्याच वेळांत गोळ्यांची फैर ऐकूं येणार व इहलोकांतील यात्रा आपणाला संपवावी लागणार या कल्पनेंने माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला होता. गोळ्यांची फैर झाली आणि मी एकदम जागा झालों. प्रथम कुठे गोळी लागली नाही ना म्हणून मी माझें सर्व अंग चाचपून पाहिलें. भीतीमुळे मी घामाने अगदी डबडबून गेलों होतों. त्या दरवडेखोरांचे ते भयानक चेहेरे—तें घनदाट अरण्य व गुहेंतील तें भयानक वातावरण माझ्या डोळ्यांसमोरून अजीबात जाईनात. आणि गंमत म्हणजे त्यानंतर मी झोपलोंच नाहीं. झोप घेण्याची मला भीतीच वाटूं लागली. न जाणो मला झोप लागली आणि पुन्हा त्या दरवडेखोरांच्या तावडींत सापडलों तर! पण त्या भयाचाहि अनुभव सुखद होता. आपल्या जीवनांत कुठून असले भयानक रसाला तोंड द्यावयाचे प्रसंग यावयाचे आहेत? पण स्वप्नसृष्टि मला त्याहि रसाचा अनुभव देते व रुक्ष जीवनाच्या चाकोरींत ज्या घटना घडणें अशक्य आहे अशा प्रकारच्या घटनाहि आपल्या स्वप्नाच्या दुनियेंत घडवून आणते.

'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' हें माझ्या पुष्कळशा स्वप्नांच्या बाबतींत खरें असलें तर अनेकदा मनीं नसतें तेंहि मला स्वप्नांत दिसलें आहे. जागेपणीं ज्यासंबंधीं विचारहि माझ्या मनांत नव्हता अशा गोष्टी व घटना अनेकदा माझ्या स्वप्नसृष्टींत आल्या आहेत. अशा स्वप्नांत घटनांची वा विचारांची कोणत्याहि प्रकारची संगति असतेच असें नाही. माझ्या सुप्त, दडपलेल्या वा नेणिवेंत दडलेल्या भावनांना यांत स्वप्नस्वरूप मिळतें असें म्हणावें तर तेंहि खरें वाटत नाही. कारण ही स्वप्नें इतकीं अद्‌भुत व अघटित असतात की जीवनांतील कोणत्याहि घटनेचा वा भावनेचा त्याच्याशीं

संबंध जोडतां येत नाही. रॉकेटमध्ये बसून मी मंगळावर निघालों आहें. मध्येच रॉकेट फुटतें. त्यांतील एका तुकड्याला धरून मी शनीवर उतरतों आणि डोक्यावर शिंगें असलेलीं माणसें माझ्या भोवतीं जमतात— या स्वप्नाला काय अर्थ आहे? कोणत्या सुप्त भावना यांत प्रगट होतात? पण अशीं स्वप्नें मला फार प्रिय वाटतात. एका नव्या अद्भुत सृष्टींत प्रवेश केला असून जीवनाचा अगदी निराळा व नवा अनुभव आपण घेत आहोंत असें मला वाटतें. त्यांतील विसंगति व विघटना तर मला फारच आवडतात. संगति व घटना या आपल्या वाट्याला जीवनांत तर नित्य येत असतातच. स्वप्नांत तरी निदान विसंगतीचा व विघटनाचा अनुभव आपणाला यावा व नव्या सृष्टीचें दर्शन आपणाला व्हावें असें मला तरी नित्य वाटतें.

माझ्या स्वप्नसृष्टींत अशी विविधता आहे. त्यांत संगति आहे व विसंगतीहि आहे. घटना आहेत व विघटनाहि आहेत. वास्तवता आहे व अवास्तवताहि आहे. विशेष म्हणजे त्यांत अनपेक्षितता आहे. मी झोपेच्या आधीन होऊं लागलों म्हणजे माझ्या स्वप्नाच्या दुनियेंत मी कुठे विहार करणार आहें याची मला अगोदर कल्पना नसते. जीवनांत सतत अपेक्षित गोष्टी घडलेल्या पाहण्याची सवय असलेल्या माझ्या मनाला स्वप्नाची अनपेक्षितता विशेषच प्रिय वाटते. त्यामुळे झोपेच्या वेळेची मी अधीरतेने प्रतीक्षा करीत असतों. 'आज कोणतें स्वप्न पडणार?' अशी उत्कंठा त्या अधीरतेमध्ये असते. किंबहुना मी झोपतों तो स्वप्नसृष्टींत विहार करण्याकरिताच. त्यामुळे झोपेंतहि मी जीवन जगत असतों. स्वप्नें माणसाला स्वप्नांतहि जगवतात. त्या दृष्टीने गाढ झोप घेणारे माझे मित्र हे दुर्दैवीच म्हटले पाहिजेत. कारण त्यांच्या जीवनांतील आठ तास दररोज फुकटच नाही का जात? ज्या काळांत आम्ही स्वप्नप्रिय लोक साऱ्या विश्वांत संचार करून येतों, विविध भावनांचा व घटनांचा अनुभव घेतों व जीवनांत नवी सृष्टि निर्माण करतों त्या वेळीं हे गाढ झोप

घेणारे लोक खुशाल घोरत पडलेले असतात. आपल्या जीवनाचा तृतीयांश काळ फुकट जात असल्याबद्दल त्यांना खंत कशी वाटत नाही कोण जाणे?

स्वप्नाला अर्थ असतो काय? कुणास ठाऊक? माझ्या स्वप्नाला तरी नसतो. मनोविश्लेषणशास्त्र आज स्वप्नाची मीमांसा करावयास पुढे सरसावलें आहे. त्याच्या मतें समाजांत आपल्या दडपल्या गेलेल्या व नेणिवेंत दबा धरून बसलेल्या भावना स्वप्नांत डोकें वर काढतात. स्वप्नावरून त्या व्यक्तीच्या जीवनांतील विकृतीचा ते छडाहि लावतात म्हणे. पण मला स्वप्नाला कोणताच अर्थ देणें मान्य नाही. 'स्वप्ना-करिता स्वप्न' अशी माझी या बाबतींत भूमिका आहे. 'स्वैरता' हा मुळी स्वप्नाचा आत्मा. त्याला तुम्ही अर्थाचें व संकेताचें बंधन घालूं लागलांत म्हणजे त्याचा आत्माच नाही का नष्ट होणार? पार्थिव व व्यावहारिक जीवनाचीं कोणतींच बंधनें स्वप्नसृष्टीला मान्य नसतात. त्यांतच तर त्यांचें वैशिष्टय आहे. त्यामुळे स्वप्नाचा अर्थ लावणाऱ्या माणसांचें मला हसूं येतें. पहाटेच्या स्वाप्नासंबंधी असाच एक संकेत निर्माण केला गेला आहे. पहाटेचीं स्वप्नें खरीं होतात म्हणे. माझीं पहाटेचीं सर्व स्वप्नें खरीं झालीं असतीं तर अरेबियन् नाईट्स मधील सिंदबादच्या जीवनावरहि मीं मात केली असती. पण तसें एकदाहि झालें नाही. स्वप्नें हीं भविष्याचीं सूचकहि नसतात किंवा भूतकालाचें गमकहि नसतात. स्वप्नें हीं स्वप्नें असतात. त्यांतून मानवी मनाची विकृति पाहण्याचा प्रयत्न करणाऱ्याचा दृष्टिकोनच विकृत असतो. स्वप्नाचें खरें रहस्य त्याला समजलेंच नसतें.

प्रकृतीच्या किंवा इतर गौण सबबीवर स्वप्नांवर आक्षेप घेणाऱ्या लोकांच्या लक्षांत हें येत नाही की आज केवळ स्वप्नांनीच अनेकांच्या जीवनांत आनंदाची फुलबाग निर्माण केली आहे. तेंच त्यांचें आज वैभव आहे. जे लोक जीवनांत आज अतिशय दुःखी आहेत, दुर्दैवी आहेत व निराश आहेत अशांसाठीं स्वप्नाची दुनिया नवें जग निर्माण करतें. जें

सुख त्यांना जागेपणीं मिळत नाही त्याचा उपभोग ते स्वप्नांत घेऊन सुखी होतात. वैधव्याच्या खाईत होरपळत पडलेल्या विधवेला स्वप्नांत घडणारें पतीचें दर्शन हाच खरा दिलासा नाही काय? दारिद्र्याने पिचून निघालेल्या माणसाला स्वप्नांत का होईना लक्षाधीश झाल्याचा जो आनंद मिळतो तोच त्याच्या जीवनांत हिरवळ उत्पन्न करीत नाही काय? दुर्दैवी व्यक्तीचा स्वप्न हाच एक विरंगुळा आहे-तोहि प्रकृतीच्या वा विकृतीच्या सबबीवर त्यांच्यापासून आपण हिरावून घेणार आहोंत काय?

पण याहीपेक्षा पुढे जाऊन मी असें म्हणेन की माणसाला स्वप्नें फक्त रात्रीं झोपेंतच पडत नाहीत तर दिवसा जागेपणीं सुद्धा पडतात. त्या स्वप्नांतूनच कलावंताची कला साकार होते व शास्त्रज्ञांचे शोध जगाला मिळतात. प्रतिभावंताच्या कलेचा आविष्कार म्हणजे त्याला पडलेलें गोड स्वप्नच नव्हे काय? अशा स्वप्नांतूनच कालिदासाने 'शकुंतला निर्माण केली; शेक्सपियरने 'हॅम्लेट' निर्माण केला; किंवा हरि नारायण आपट्यांनी 'भावानंद' निर्माण केला असें नाही तुम्हाला वाटत? आणि शास्त्रज्ञांच्या स्वप्नांनी तर जगाच्या सुखांत किती भर घातली आहे हें मीं सांगावयास हवें असें नाही. जीवनाच्या प्रत्येक शाखेंत आज शास्त्रज्ञांचें स्वप्न या ना त्या स्वरूपांत साकार झालेलें आढळेल. स्वप्नामध्ये दृष्टान्त झाल्यामुळे कवींना काव्यरचनेची स्फूर्ति मिळाल्याचीं उदाहरणेंहि कमी नाहीत. तुकारामांना अभंग-रचनेची स्फूर्ति स्वप्नांत झालेल्या साक्षात्कारानेच मिळाली. स्वतः तुकारामांनी या बाबतींत कबुली दिली आहे. ते म्हणतात-

नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें। सवें पांडुरंगें घेऊनिया ।।
सांगितलें काम करावें कवित्व। वाउगें निमित्त बोलूं नये ।।

स्वप्नें नसतीं तर तुकारामाच्या अभंगाचा अमोल ठेवा आपणाला लाभला असता का? महीपतीला तुकारामांनी स्वप्नांत येऊन संतचरित्रें

वर्णन करण्याची आज्ञा केली आणि तोच गुरूपदेश मानून महीपतीने संतचरित्रें वर्णन केलीं. पूर्वी संतांना जे दृष्टान्त होत होते तीं सुद्धां स्वप्नेंच नाहीत तर काय? एकनाथांना ज्ञानेश्वरांनी स्वप्नांत येऊन आपल्याभोवती आवळलेली अश्वत्थ वृक्षाची मुळी सोडवावयास सांगितली–त्याच आदेशानुसार एकनाथांनी ज्ञानेश्वरीच्या समाधीचा जीर्णोद्धार केला आणि ज्ञानेश्वरीचें संशोधन केलें नाही काय? शिवाजीमहाराजांना भवानी मातेचा जो दृष्टान्त होई त्यामुळे स्वराज्याचें ध्येय त्यांनी आपल्या डोळ्यासमोर ठेवलें व त्याप्रमाणे स्वतंत्र राज्याची स्थापना केली.

आणि म्हणूनच मला वाटतें की, श्रेष्ठ विभूतींच्या स्वप्नांतून त्यांचीं ध्येय निश्चित होतात आणि त्या ध्येयाच्या सिद्धींतून जगाचें पाऊल पुढे पडतें. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू इत्यादि विभूतींना स्वातंत्र्याचें स्वप्न दिसत होतें–आणि त्या स्वप्नांतून त्यांचें ध्येयें साकार झालें, त्याला रंगरूप आलें आणि कालान्तराने त्या स्वप्नसृष्टीचें रूपान्तर सत्यसृष्टींत झालें. स्वप्नांना साकार करण्याचें, त्यांना मूर्त स्वरूप देण्याचें सामर्थ्य ज्या विभूतींत असतें त्यांचीं स्वप्नें मानवजातीला निश्चित उपकारक ठरतात असें नाही तुम्हाला वाटत? असें आहे तर विनाकारण स्वप्नांना कां नांवें ठेवावयाचीं? उलट तांबे कवींच्या कवितेंतील एका ओळींत बदल करून मी असें म्हणेन—

" स्वप्नेंच पुढे पाउल बढतें. "

अर्थात् मोठ्या माणसांचीं स्वप्नें मोठीं असलीं तर लहान माणसांचीं स्वप्नें लहान असतील. लहानांचीं स्वप्नें कदाचित् साकार होतहि नसतील. म्हणून लहानांचीं स्वप्नें पाहूं नये थोडींच? कुणास ठाऊक? त्या स्वप्नांतूनहि लहानांना कांही साक्षात्कार होण्याचा संभव आहे. आणि तो नाही झाला तरी 'स्वप्नाकरिता स्वप्न' पाहण्यांत व एका नव्या जीवनाचा अनुभव घेण्यांत त्यांना होणारा आनंद हा काय कमी लाभ आहे? मला तर वाटतें की

मनुष्य हा स्वप्नांवरच जगतो. त्यांतील कांहीं स्वप्नें झोपेंत पडलेलीं असतील तर कांही जागेपणाचीं असतील. जागेपणींच्या स्वप्नांत सुद्धा केवढा आनंद सामावला आहे! स्वप्नांना विकृति म्हणणाऱ्या व स्वप्नावर आक्षेप घेणाऱ्या माझ्या 'गाढनिद्रावादी' मित्रांनासुद्धा हीं जागेपणाचीं स्वप्नें पडत असतात व तीं पाहण्यांत त्यांना मोठा आनंद वाटत असतो हें सांगितलें तर नवल वाटेल तुम्हाला? पण ज्या वेळीं हे आमचे मित्र उद्याच्या जीवनाचीं चित्रें रंगवीत असतात, भावी जीवनाविषयी आशेचे मनोरे उभे करीत असतात व उद्याच्या सौख्याचा व आनंदाचा कल्पनेने आजच आस्वाद घेत असतात त्या वेळीं ते सुद्धा स्वप्नेंच पाहात नाहीत काय? मग आमच्याच स्वप्नांना हसण्याचा त्यांना काय अधिकार आहे?

आणि ते हसले तरी माझी स्वप्नसृष्टि सोडण्यास मी तयार होईन थोडाच? उद्या जरी त्यांनी माझ्या स्वप्नांच्या मोबदल्यांत निरोगी प्रकृति व थोडा लठ्ठपणा देण्याचें आमिष दाखविलें तरी तें मी स्वीकारणार नाही. माझी स्वप्नाची दुनिया या सर्व गोष्टींपेक्षा मला कितीतरी प्रिय आहे. स्वप्नाच्या चंदेरी सृष्टींत विहार करीत करीत अननुभूत जीवनाचा अनुभव घ्यावयाचा, वर्तमान, भूत व भविष्यकाळांत स्वैर फेरफटका करावयाचा, आपल्या प्रिय व्यक्तींची स्थळकाळाच्या सीमा ओलांडूनहि भेट घ्यावयाची आणि अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टीपेक्षाहि अद्‌भुत घटनांचा आस्वाद घ्यावयाचा यांत जें काव्य आहे ते 'गाढ झोपवादी' लोकांना मीं कितीहि पटवून दिले तरी पटणार आहे थोडेंच? गाढ झोपेपुढे जीवनांतील या मोठ्या सौख्याकडे मुद्दामच पाठ फिरवावयाचें त्यांनी ठरविलें असलें तर त्याला कोण काय करणार?

राज्य ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वनाम
अनुक्रम ७४८५१ वि: निबंध
क्रमांक 2032

৫৫৬৭
REFBK-0008871